# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

सत्र–४ : पेपर क्रमांक SOE 40

# समाजशास्त्र आणि समाजकार्य

**(Sociology and Social Work)**

**एम. ए. भाग–२ : समाजशास्त्र**

(शैक्षणिक वर्ष २०१९–२० पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१५
**द्वितीय आवृत्ती :** २०१६
**तृतीय आवृत्ती :** २०१७
**चतुर्थ सुधारित आवृत्ती :** २०२१
एम. ए. भाग २ (सत्र ४ : समाजशास्त्र आणि समाजकार्य) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ७००**

■

**प्रकाशक**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-8486-652-0

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. सरवदे** (सदस्य सचिव)
I/c संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ समाजशास्त्र अभ्यासमंडळ ■

अध्यक्ष – **डॉ. मच्छिंद्र सकटे**

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला कॉलेज, उंब्रज, जि. सातारा

- **डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज (के.एम.सी.)
  कोल्हापूर

- **प्रा. डॉ. जे. एच. कराड**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती प्रतिमा शहाजीराव पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. संजय हिंदुराव शिंदे**
  सरदार बाबासाहेब माने कॉलेज,
  रहिमतपूर, जि. सातारा

- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती के.आर.पी. कन्या महाविद्यालय,
  उरुण–इस्लामपूर, जि. सांगली.

- **डॉ. सतीश सर्जेराव देसाई**
  एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज,
  मिरज, जि. सांगली

# प्रस्तावना

एम. ए. भाग-२, सत्र ४ साठी 'समाजशास्त्र आणि समाजकार्य' या ऐच्छिक पेपरची निवड करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मी मनःपूर्वक स्वागत करतो.

''समाजशास्त्र आणि समाजकार्य'' या पेपरमध्ये चार घटकांचा समावेश केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने समाजकार्य, मूलभूत संकल्पना आणि पद्धती, समाजकार्याची क्षेत्रे विविध घटकांमध्ये उपयोजन, समाजकार्य करणाऱ्या संस्थांना दिशादर्शक भेटी या घटकांचा समावेश केला आहे.

शेवटी मी सर्वप्रथम मा. कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दूरशिक्षण केंद्राचे संचालक, अभ्यासमंडळाचे अध्यक्ष प्रा. मच्छिंद्र सकटे व अभ्यास मंडळाचे सर्व सदस्य, हा पेपर पूर्ण करणारे इतर सहकारी प्राध्यापक आणि दूरशिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाले. वरील सर्वांना त्यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

■ **संपादक** ■

**प्रा. प्रकाश जगताप**
सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय, रहिमतपूर,
कोरेगाव, जि. सातारा

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

| | |
|---|---|
| दूरशिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ,<br>कोल्हापूर | **समाजशास्त्र आणि समाजकार्य**<br>**एम. ए. भाग–२ : समाजशास्त्र** |

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–३ घटक क्रमांक |
|---|---|
| **प्रा. व्ही. जी. पानस्कर**<br>के. बी. पी. कॉलेज, उरूण इस्लामपूर | १ |
| **प्रा. प्रकाश जगताप**<br>सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय, रहिमतपूर | १, २ |
| **प्रा. अमोल मिणचेकर**<br>एम.एस.डब्ल्यू विभाग, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ |
| **प्रा. योगेश कुदळे**<br>क्षेत्र समन्वयक, शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | ४ |

**■ संपादक ■**

**प्रा. प्रकाश जगताप**
सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय, रहिमतपूर,
कोरेगाव, जि. सातारा

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | समाजशास्त्र आणि समाजकार्य | १ |
| २. | समाजकार्य – मूलभूत संकल्पना आणि पद्धती | २४ |
| ३. | समाजकार्याची क्षेत्रे : विविध घटकांमध्ये उपयोजन | ६३ |
| ४. | समाजकार्य करणाऱ्या संस्थाना दिशादर्शक भेटी | ७७ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक – १

# समाजशास्त्र आणि समाजकार्य

**(Sociology and Social Work)**

**अनुक्रमणिका :**

१.१ प्रास्ताविक

१.२ उद्दिष्टे

१.३ विषय विवेचन

१.३.१ समाजकार्य - व्याख्या, अर्थ आणि समाजकार्याची मुलतत्त्वे

१.३.२ इंग्लंड, अमेरिका आणि भारतातील समाजकार्याचा इतिहास

१.३.३ समाजकार्य - समाजकार्याची तत्त्वे, मूल्ये आणि नितीतत्त्वे

१.३.४ समाजशास्त्र आणि समाजकार्य यांच्यातील संबंध

१.४ सरावासाठी प्रश्न

१.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.१ प्रास्ताविक :

सामाजिक समस्यांचे अस्तित्व पुरातन काळापासून प्रत्येक समाजामध्ये आढळते. म्हणूनच, अशा समस्यांच्या निवारणासाठी समाजसेवा हा प्रत्येक समाजाचा घटक आहे. साथीदाराबद्दल प्रेम, बंधुभावाची भावना, आपल्या समुदायातील लोकांची सेवा करण्याची गरज यासारखे घटक समाजसेवेचे मानले जातात. थोडक्यात, या समस्या हाताळण्यासाठी वापरण्यात आलेल्या पद्धती ह्या समाजाच्या गरजा आणि संसाधने यावर अवलंबून असतात.

## १.२ उद्दिष्टे

१) समाजातील विविध समस्या सोडविण्यासाठी समाजकार्याची मदत होईल.

२) समाजकार्याच्या आधारे समस्यांचे निदान करून उपचार शोधता येईल.

## १.३ विषय विवेचन :

सामाजिक समस्यांच्या निर्मुलनासाठी समाजकार्याचा विकास झाला आहे. समाजातील विविध समस्या शारीरिक, आर्थिक, सामाजिक, मानसिक यासारख्या घटकांच्यामुळे होतात. समस्याग्रस्त व्यक्तींच्या समस्या सोडविणे व त्यांच्या गरजा पूर्ण करणे व साहाय्य करणे हे समाजकार्यांचे प्रमुख उद्दिष्ट्य आहे. याच

अनुषंगाने समाजकार्याच्या इतिहासाचा आढावा घेणे गरजेचे वाटते तो खालीलप्रमाणे-

### १.३.१ समाजकार्य – व्याख्या, अर्थ आणि समाजकार्याची मुलतत्त्वे

**(i) समाजकार्य व्याख्या** (Definition of Social Work) **:**

विसाव्या शतकात सामाजिक बांधिलकीच्या जाणीवा जागृत होउन त्यांचा प्रसार व विकास झाला त्यातून समाजकार्य ही एक संकल्पना भरभराटीस आली. समाजातील गरीब, दुःखी- कष्टी, दुबळे आणि रंजलेले गांजलेले लोक किंवा जनसमूह यांना खाजगी किंवा सार्वजनिकरित्या मदतीप्रित्यर्थ पुरविलेली सेवा म्हणजे समाजकार्य होय. युरोपमध्ये खाजगी औदार्याला संघटीत व संस्थात्मक स्वरूप देण्याचे प्रयत्न इंग्लीश पुअर लॉद्वारे इ.स. १६०१ मध्ये करण्यात आले. या कृतीचा प्रत्यक्ष विकास ग्रेट ब्रिटन जर्मनी व अमेरिका या देशात एकोणिसाव्या शतकात झाला.

समाजकार्य ही समाजाचे हित व विकासासाठी असलेली एक मोठी व व्यापक संकल्पना आहे. या संकल्पनेत समाजाजील दीनदुबळया लोकांच्या कल्याणासाठी केलेले कार्य अभिप्रेत असून विविध प्रकारे हे सेवाकार्य करण्यात येते.

केवळ स्वतःला पुण्य लाभावे म्हणून समाजातील वंचित गटांना सहाय्य करणे किंवा भूतदयेपोटी दीनदुबळयांची सेवा करणे म्हणजे समाजकार्य नव्हे समाजसेवा, समाजसुधारणा, सामाजिक सुरक्षितता, समाजकार्य आणि समाजकल्याण हे शब्द अनेकदा समान अर्थाने वापरले जातात. याबाबत काहीसा गोंधळ व संदिग्धता निर्माण होण्यामागे एक कारण असे आहे की, या सर्व संकल्पनांचे ध्येय समान असून ते लोककल्याण किंवा जनस्वास्थ्य होय.

विसाव्या शतकात समाजकल्याण या संकल्पनेवर सर्वांगिण विचार विनिमय झाला आहे. अनेक समाजशास्त्रज्ञांनी या संकल्पनेची व्याख्या केली असून तिचा उहापोहही केला आहे. त्यापैकी कांही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत -

१) फ्रिडलॅटर यांनी पुढील शब्दात समाजकार्य या संज्ञेची व्याख्या केली आहे. ''समाजकार्य ही एक व्यावसायिक सेवा आहे. हा व्यवसाय शास्त्रीय ज्ञानावर व मानवी संबंधाच्या कौशल्यावर आधारीत आहे. एखाद्या व्यक्तिला किंवा गटाला अशी मदत केली जाते. जेणेकरून त्यांच्यात वैयक्तिक व सामाजिक समाधान निर्माण होऊन स्वावलंबनाची प्रक्रिया सुरू होईल. समाजकार्य हे एखाद्या संस्थेमार्फत किंवा संघटनेमार्फत केले जाते.''

२) स्ट्राईप यांच्या मते, समाजकार्य हे जसे शास्त्र आहे तसेच ती एक कला ही आहे. त्यांच्या मते ''व्यक्ति, गट किंवा समुदायांच्या गरजांच्या पूर्तीसाठी सर्व प्रकारच्या साधनांचा एकत्रित वापर करून लोकांना स्वतःचे प्रश्न स्वतः सोडविण्यास सक्षम करणे म्हणजे समाजकार्य होय.''

३) सामाजिक कार्य करणाऱ्या भारतीय परिषदेने १९५७ मध्ये समाजकार्याची व्याख्या अशी केली आहे की, ''समाजकार्य ही कल्याणकारी कृती आहे समाजकार्य हे मानवतावाद, शास्त्रीय ज्ञान व तांत्रिक कौशल्ये

यावर आधारीत आहे. व्यक्ति समूह किंवा समुदायाचे आयुष्य अधिक परिपूर्ण करण्याचा प्रयत्न त्यात आहे.''

४) डॉ. विटमर – व्यक्तिच्या संदर्भात ज्या गंभीर अडचणी किंवा समस्या उदभवतात अशा समस्यांचे निर्मुलन करून संबंधित व्यक्तिना मदत करणे म्हणजे समाजकार्य होय.

**(ii) समाजकार्याचा अर्थ** (Meaning of Social Work) **:**

समाजकार्याच्या व्याख्यावरून असे दिसून येते की, समाजकार्य ही एक संघटीत व्यावसायिक सेवा आहे. मात्र समाजकार्याचा अर्थ त्यापेक्षाही व्यापक आहे. कारण समाजकार्याचा विकास सर्व देशात समान व एकसारखा असा झालेला नाही. आजही काही देशात समाजकार्य म्हणजे केवळ आर्थिक मदत एवढयापुरतेच मर्यादित आहे. तर कांही देशात समाजकार्य हे व्यावसायिक सेवेच्या स्वरूपात प्रचलित आहे. प्रो. क्लार्क यांच्या मते, फार थोडया लेखकांनी समाजाकार्याच्या व्याख्या व अर्थ स्पष्ट केला आहे. बहुतांशी लेखाकांनी समाजकार्याचा इतिहास, कार्ये व प्रक्रिया यांचे विवेचन केले आहे तर काही लेखक समाजकार्य व समाजकल्याण यात काही फरक मानीत नाहीत. इतर व्यवसायांच्या तुलनेत समाजकार्य हा एक नवीन व्यवसाय असल्यामुळे त्याची वैशिष्टये व अभ्यासविषय याबाबत वेगवेगळी मते असणे स्वाभाविक आहे. प्रो. क्लार्क यांनी समाजकार्याचा अर्थ पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

**१) सर्वसामान्य लोकांचा दृष्टीकोन :**

एखादी व्यक्ति सर्वमान्य व कांही चांगले काम करीत असेल तर ती सामाजिक कार्यकर्ता आहे असे सर्वसामान्य लोक मानतात. तरीसुध्दा सामाजिक कार्य करणारी एखादी व्यक्ति आणि कल्याणकारी कार्ये करणारी व्यक्ति यामध्ये फरक केला जातो. कल्याणकारी कार्ये करणाऱ्या लोकांना त्यासाठी वेतन मिळते. ते दानशूर व धार्मिक व्यक्तिंचा आदर करतात. मात्र जे लोक दानशूर लोकांच्या सहानभुतीवर आपली उपजिविका करतात अशा गरीब लोकांचा ते तिरस्कार करतात. सर्वसामान्य लोकांच्या मनात उदार व दानशूर लोकाबद्दल आदराची भवना असते. मात्र ते समाजकार्य व समाजकल्याण यात कमी जास्त असा फरक मानीत नाहीत.

**२) अर्धव्यावसायिक अर्थ :**

समाजकल्याणाची कार्ये करणाऱ्या संस्थेत काम करणाऱ्या अप्रशिक्षित व्यक्तिंच्या दृष्टीने समाजकार्य हे त्यांच्या चरितार्थाचे साधन असते. त्यांच्या मते, अशा कल्याणकारी संस्थेत सेवा करणारे लोक सामाजिक कार्येकर्तेच असतात कारण ते समाजकल्याणाच्या कार्यात गुंतलेले असतात. प्रो. क्लार्क यांनी याबाबत असे व्यक्त केले आहे की, ज्या अनेक व्यक्ति मोठमोठया संस्थात काम करतात त्या समाजकार्यकर्तेच असल्या पाहिजेत असे नाही. कारण त्या व्यक्ति घरकाम, मनोरंजन, रूग्णसेवा, सामाजिक विमा, हिशेब, लेखा या विषयातील तज्ज्ञ असू शकतात. तसेच व्यक्तिला व्यावसायिक व्यक्ति बनविणारी तत्वे कोणती असतात याचाही विचार केला पाहिजे. कारण आई जेव्हा आपल्या आजारी मुलाची शूश्रूषा करते तेव्हा ती डॉक्टर असते असे नाही. कारण व्यवसायाबदलचे विशिष्ट ज्ञान याबरोबरच दक्षता आणि नैतिकताही त्यात समाविष्ट असते.

**३) शास्त्रीय अर्थ –**

डॉ. हेलन विटमर हिने समाजकार्याबदल असे म्हटले आहे की, अडचणीत, संकटात असलेल्या व्यक्तिना

मदत करणे हा समाजकार्याचा उद्देश आहे, अशी मदत संघटित समूहांच्या सेवाद्वारे केली जाते किंवा अशा व्यक्तिना त्या समूहाचा सदस्य म्हणून घेऊन त्या समूहाद्वारे त्यांच्या समस्या सोडविल्या जातात. असे समूह म्हणजे कुटुंब, शेजारी, शाळा, दवाखाने, करमणूक केंद्रे, राज्य, राष्ट्र आणि लोकांच्या सहाय्याने चालणाऱ्या संस्था होत. डॉ. हेलन विटमर समाजकल्याणकारी अशा सर्व संस्थाना समाजकार्याच्या संस्था मानीत नाहीत. कारण लोक कल्याणकारी अशा संस्था विशिष्ट पात्रता असणाऱ्या व्यक्तिना विशिष्ट पातळीवरून मदत करीत असतात.

**४) व्यावसायिक अर्थ :**

व्यावसायिक समाजकार्य म्हणजे विशिष्ट विचारांनी, दृष्टिकोनानी, सिद्धांतानुसार वागून विशिष्ट भावनांनी मदत देण्याचे कार्य करणे होय. ही मदत देण्याचे निश्चित उद्देश असल्याने व विशेष पद्धतीने देण्यात आलेल्या पद्धतीमुळे, विशेष असे परिणाम साधने शक्य होते. सेवा देणाऱ्याजवळ समाजकार्याची, मानव समाजाचे, सहसंबंधाचे ज्ञान असणे गरजेचे असते. सेवेचा आधार लोकशाही विचार प्रणाली असून ही सेवा व्यावसायिक, कायम स्वरूपात प्रभाव साधणारी, काम करण्याची विशिष्ट पद्धत असणारी असावी.

**(iii) समाजकार्याची मूलतत्वे** (Principles of Social Work) : –

संयुक्त राष्ट्रसंघाच्या तिसऱ्या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणात काही मूलतत्वे व नैतिक नियम मान्य करण्यात आले त्यावरच समाजकार्य प्रत्यक्ष व्यवहारात कार्यरत आहे. ही मूलतत्वे पुढीलप्रमाणे –

१) व्यक्तिचा धर्म, दर्जा, जात व राजकीय विचार आणि स्वभाव यावर अधिक भर देण्याऐवजी एक मानव म्हणून व्यक्तिकडे पहाणे आणि व्यक्तिचा गौरव, सन्मान, चारित्र्य व स्वाभिमान वृध्दिंगत करणे.

२) व्यक्ति, समूह आणि समूदाय यांच्यामध्ये असलेल्या भिन्नत्वाकडे आदराने पहाणे आणि त्यांच्यात समन्वय वाढवून त्यातून सामुदायिक कल्याण साधणे.

३) व्यक्तिमध्ये स्वावलंबनाची भावना वाढविण्यासाठी शक्ती व प्रोत्साहन देणे, ज्यामुळे व्यक्तिंचा आत्मविश्वास वाढेल आणि व्यक्ति आपल्या जबाबदा-या पार पाडू शकतील.

४) व्यक्ति, समूह आणि समूदाय यांना आपत्ती काळात, संकटकाळात अशी मदत करणे ज्यामुळे त्यांचे जीवन सुसहय होईल.

५) समाजकार्याचे ज्ञान व तत्वज्ञानावर आधारीत निती नियमांची प्रत्यक्ष कार्यवाही करण्याची व्यावसायिक जबाबदारी स्विकारणे, ज्यामुळे व्यक्तिना आपल्या अपेक्षा व गरजांची पूर्तता करण्यासाठी चांगले वातावरण आणि कालावधी प्राप्त होईल आणि त्यांना आपल्या क्षमतेचा पूर्ण वापर करता येईल व ते समाधानी राहतील.

६) व्यावसायिक संबंधातील गुप्तता सांभाळणे.

७) आपल्या व्यावसायिक संबंधाचा उपयोग समस्याग्रस्त व्यक्ति आणि समूहाना अधिक स्वतंत्र व स्वावलंबी बनविण्यासाठी करणे.

८) व्यक्ति आणि समाज यांच्या जास्तीत जास्त भल्यासाठी व्यावसायिक संबंधाचा वापर करणे.

**प्रा. हर्बर्ट किस्नो यांनी समाजकार्याच्या तत्वांचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे –**

१) प्रत्येक व्यक्तिचे महत्व हे केवळ तिच्या अस्तित्वावर आहे.

२) मानवाचे कष्ट आणि गैरसोयी अनपेक्षित आहेत त्या दूर केल्या पाहिजेत, किमान त्यांची तिव्रता शक्य तेवढी कमी केली पाहिजे.

३) प्रत्येक व्यक्तिचे वर्तन, स्वभाव आणि शरीर प्रकृती यावर सभोवतालच्या वातावरणाचा प्रभाव असतो.

४) व्यक्ति व्यक्तिमध्ये अनेक बाबतीत भिन्नता असू शकते आणि तिचा स्विकार केला पाहिजे.

५) दुर्बल घटकांच्या पिळवणुकीला समाजकार्य मान्यता देत नाही उलट त्याला विरोध करते.

६) श्रीमंत आणि सामर्थ्यवान लोक उपयुक्त असतील असे नाही तसेच गरीब व दुर्बल व्यक्ति उपयुक्त नसतात असेही म्हणता येणार नाही.

७) व्यक्तिंच्या सदस्यांच्या कल्याणाची सर्वाधिक जबाबदारी समुदायावर असते.

८) समाजातील सर्व वर्गांच्या सदस्याना सामाजिक सेवा मिळविण्याचा समान अधिकार आहे. प्रत्येक व्यक्तिला कोणताही भेदभाव न करता मदत मिळाली पाहिजे, ही समुदायाची जबाबदारी असते.

९) आरोग्य, घरबांधणी, रोजगार, शिक्षण, सामाजिक सुरक्षितता व मदतकार्य याबाबतचे विविध कार्यक्रम राबविणे ही केंद्र सरकारची जबाबदारी मानली जाते.

## १.३.२ इंग्लंड, अमेरिका आणि भारतातील समाजकार्याचा इतिहास

### (i) इंग्लंडमधील समाजकार्याचा अभ्यास History of Social Work in England (U.K.)

जागतिक पातळीवरील मानव, समाजाचा विचार करता असे समजून येते की, वेगवेगळ्या ठिकाणचा मानवी समाज वेगवेगळ्या कालखंडात वेगवगळ्या विचारधारांनी प्रभावित झाला होता. या वेगवेगळ्या विचारधारांमुळे सामाजिक परिवर्तन घडून आलेली आहेत. या पार्श्वभूमीवर नवनव्या विचारधारांचाही उदय झालेला पहावयास मिळतो. अशा नवनवीन विचारधारा पाश्चात्त्य समाजानेदेखिल स्विकारल्या आहेत. यातूनच इंग्लंडमधील समाजकार्याचा इतिहास पुढीलप्रमाणे विशद करता येईल.–

**१) प्रारंभिक काळ :**

या काळामध्ये कुटुंबाकडूनच कुटुंब सदस्यांचे, शत्रू व हिंस्र पशूपासून रक्षण केले जात होते. जंगलामध्ये असलेला समूह शत्रूपासून आपल्या कुटुंबाचे रक्षण करत असत. याचबरोबर समूहातील व

कुटुंबातील अपंग, अंध, वृद्ध, कमकुवत आणि रोगी यांची सुश्रुषा पार पाडली जात होती. परंतु ते त्या कुटुंबावर बोझ ठरत होती.

### २) इ.स. १२०० ते इ.स. १५००

इंग्लंडमधील आर्थिक संस्थाद्वारा कुटुंबातील सदस्यांचे रक्षण करण्यात येत होते. तसेच रोगी, कमकुवत व्यक्ती, अपंग अशा लोकांना धर्मगुरू सहाय्य करत होते. तसेच ख्रिश्चन सदस्यही अशा लोकांना मदत व त्यांचे रक्षण करत होते. १५ व्या शतकामध्ये श्रीमंत व्यक्ती, मठ, गिरीजा यासारख्या घटकाकडून निर्धन, भिकारी यांना जेवण, कपडेलत्ते, राहण्याची व्यवस्था यासारख्या मदती केल्या जाऊ लागल्या. थोडक्यात, धार्मिक भावनेने प्रेरित होवून निराश्रीत व समस्याग्रस्त व्यक्तींना मदत केली जाऊ लागली.

### ३) इ. स. १५०१ ते इ.स. १६००

१४ व्या शतकामध्ये शासनाने असहाय्य व्यक्ती व भिकारी यांना मदतीपासून दूर ठेवले. इतकेच नव्हे तर या काळात जहागीरदारी नष्ट होवून दास प्रथाही बंद करण्यात आली. याचवेळेस प्लेगासारख्या रोगाने इंग्लंडमध्ये थैमान घातले होते. पर्यायाने अनेक लोक मृत्यूमुखी पडले व कामगारांची संख्याही कमी झाली. यातूनच शासनाने १३४६ मध्ये कायद्याने सदृढ व्यक्तींना काम करणे सक्तीचे केले.

१५३१ च्या हेनरी अष्टम कायद्यानुसार निर्धन व गरीब लोकांना मदत मिळू लागली. त्याचवेळेस भिकाऱ्यांना भीक मागण्याकरिता परवाना पद्धत सुरू केली.

### ४) इ.स. १६०१ ते इ.स. १८३४

या कालखंडामध्ये गरीब, निर्धन, अपंग, मंदबुद्धी व अंध अशासारख्या लोकांच्यासाठी भिक्षागृहे निर्माण केली व त्यांच्यामार्फत त्यांना सहाय्य केले जावू लागले. इतकेच नव्हे तर प्रत्येक युवकाने आपल्या आई-वडिलांचा उदरनिर्वाह करणे सक्तीचे करण्यात आले. त्याचबरोबर निराश्रीत बालकांना दानशूर व्यक्ती दत्तक घेऊ लागले. यासाठी शासनाने ''एलिझाबेथ गरीब कायदा'' अंमलात आणला. यासाठी शासनाने १६६६, १६७२, १७६१, १८३४ व १९०५ मध्ये वेगवेगळ्या प्रकारचे कायदे करून अशा लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी मदत केली.

### ५) इ.स. १८३४ ते इ.स. १९०५

या कालखंडामध्ये भिकाऱ्याची संख्या वाढल्यामुळे त्यांच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी व अध्ययन करण्यासाठी Royal Commission for inquiring in to the Administration and Practical Operation of the Poor Law नेमण्यात आला. या आयोगाने अनेक शिफारशी केल्या व पुढे १८३४ मध्ये या शिफारशींचे The New Poor Law या कायद्यात रुपांतर केले. त्याचबरोबर १८४८ मध्ये लोक आरोग्य कायदा पास करून General Board of the Health ची स्थापना करून Social Legislation Act तयार केला गेला.

याच कालखंडामध्ये बालकामगारांची समस्या मोठ्या प्रमाणात समोर आली. यातून लहान मुलांच्या आरोग्याची समस्या वाढू लागली. यासाठी शासनाने 'आरोग्य आणि नैतिक कायदा' तयार केला. तसेच लहान मुलांना कारखान्यामध्ये नोकरी करण्यासाठी प्रतिबंध म्हणून १८३३ मध्ये Factory Act निर्माण केला

भिकारी, कैदी, अपंग, बेरोजगार या व्यक्तींच्याकडे शासनाने विशेष लक्ष दिले. यासाठी शासनाने १८६७ मध्ये Society for the relief of distress ची स्थापना केली.

### ६) इ.स. १९०५ ते इ.स. १९४४ पर्यंतचा कालखंड

या कालखंडामध्ये इंग्लंडमध्ये बेरोजगारीत वाढ झाली व कोळसा व खान उद्योग धोक्यात आले. पर्यायाने त्यांना मदत करणे आवश्यक होते. यासाठी शासनाने वेगवेगळ्या प्रकारचे आयोग निर्माण केले व त्या आयोगाच्या शिफारशीनुसार मदत करण्यात येऊ लागली. गलिच्छ वस्ती व सुधार, बालकांना दुपारच्या जेवणाची सोय, शालेय बालकांची वैद्यकिय तपासणी, बेरोजगारांना विमा योजना यासारख्या सुविधा शासनाने कायद्यांतर्गत निर्माण केल्या.

### ७) इ.स. १९४४ नंतरचा कालखंड

या कालखंडात लॉर्ड विल्यम बेबरीज यांच्या नेतृत्वाखाली सुविधांच्या कार्यक्षमतेचे सर्वेक्षण करून शासनास अहवाल देण्यात आला. यामध्ये सामाजिक सुरक्षेवर भर देण्यात आला. त्यासाठी सामाजिक विमा, कौटुंबिक भत्ता सुविधा, लोक सहाय्यता, कल्याण कार्यक्रम, स्वास्थ्य सेवा, बेरोजगारी विमा यासारख्या योजनांची अंमलबजावणी करण्यात आली. वृद्ध, अपंग, विधवा, निराधार यासारख्या लोकांना निर्वाहभत्ता देण्यात आला.

त्याचबरोबर ऐच्छिक संस्थेमार्फत आरोग्य सेवा, बालक व महिलांची सुश्रुषा, बालकांचे उत्तरदायित्व स्विकारणे, मातांना योग्य आहार, आरोग्य सेवा यासारखी कामे केली जाऊ लागली.

### (ii) अमेरिकेतील समाजकार्याचा इतिहास History of Social Work in America (U.S.A.)

प्रत्येक कालखंडात समाजाचे स्वरूप आणि रचना वैशिष्ट्यपूर्ण असते. प्रत्येक समाजाची जीवनशैली ही काळानुरूप बदलत असते. प्रत्येक काळातील समाजाच्या गरजा आणि समस्या यामध्ये भिन्नता पहावयास मिळते म्हणूनच इंग्लंडमधील समाजकार्य व अमेरिकेतील समाजकार्य यामध्ये भिन्नता पहावयास मिळते.

इंग्लंडमधील समाजकार्याच्या उदयानंतरच अमेरिकेतील समाजकार्यास सुरुवात झालेली दिसते. २० व्या शतकाच्या सुरुवातीस अमेरिकेतील समाजकार्यामध्ये बदल झालेले पहावयास मिळतील. अमेरिकेमध्ये स्वतंत्र व व्यावसायिक समाजकार्य होते परंतु यामध्ये आरोग्य चिकित्सक सेवेचा अंतर्भाव नव्हता.

### १) इ.स. १९०० पर्यंतचा कालखंड

सुरुवातीच्या काळामध्ये इंग्लंडमधून बरेच नागरिक अमेरिकेमध्ये स्थायिक झाले. त्यांनी अमेरिकेतील प्रथा व नियमाप्रमाणे वागणे चालू ठेवले. उदा. भिक्षेकऱ्यास भिक्षा न देणे, निर्धन व्यक्तीस मदत न करणे इ. त्याचबरोबर इंग्लंडमध्ये अनेक सेवाभावी संस्था कार्य करत होत्या. परंतु अशा सेवा देणाऱ्या संस्था अमेरिकेमध्ये अस्तित्वात नव्हत्या. परंतु कालांतराने अमेरिकेमध्ये अशा सेवाभावी संस्थांचा उदय झालेला दिसून येतो. यामध्ये १६५७ मध्ये न्यूयार्क शहरात भिक्षागृहाची स्थापना करण्यात आली. यातूनच भिक्षेकरांची वर्गवारी ठरविण्यात आली. याबरोबरच अमेरिकेमध्ये कांही गैरसरकारी दान संस्था स्थापन करून आर्थिक समस्याग्रस्त व्यक्तींना मदत करणे चालू केले.

त्याचबरोबर ''न्यूयॉर्क निर्धनता निवारण समितीची'' स्थापना १८१७ मध्ये करण्यात आली. या संस्थेमार्फत दारिद्र्य व भिक्षावृत्ती निर्मूलन करणे शक्य झाले. तसेच त्यांचे पुन:र्वसन करून त्याना सक्षम बनविण्यात येत होते. तसेच १८८७ मध्ये Charity Organization स्थापन करून दारिद्र्य निर्मूलन करण्याचा प्रयत्न अमेरिकेमध्ये झालेला दिसून येतो.

अमेरिकेमध्ये अशा प्रकारचे समाजकार्य होत असताना समाजातील कांही सेवाभावी संस्थांनी दान संघटना संस्थांना विरोध केलेला पहावयास मिळतो. याच सुमारास अमेरिकेमध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगिकरणात वाढ झाली. पर्यायाने शहरांची संख्या व त्यातील लोकसंख्या झपाट्याने वाढू लागली आणि लोकांच्या जीवनस्तरामध्ये फरक पडू लागला. गलिच्छ वस्त्या वाढू लागल्या व लोकांच्या निम्नस्तरामध्ये भर पडून नैतिकता ढासळू लागली.

या कालखंडामध्ये महिलांचा आर्थिक विकास करण्याकरिता महिला उद्योगांना मोठ्या प्रमाणात चालना देण्यात आली. त्यासाठी त्यांना घरच्या घरी कच्चा माल पुरविण्यात येत होता.

**२) इ.स. १९०१ ते १९३५ पर्यंतचा कालखंड**

या कालखंडामध्ये अमेरिकेमध्ये भारतीयांच्यासाठी bureau of Indian affairs या नावाचा नवीन विभाग स्थापन करण्यात आला. याच्या आधारे सरकारी व निमसरकारी संस्थांच्या कार्याला राष्ट्रीय स्तरावर मान्यता देणे व केंद्र शासनाने समाजकार्याला प्रत्यक्ष स्वरूपात सहकार्य करावे अशी धोरणे ठरविण्यात आली. प्रवासांचे आरोग्य, जहाजावरील कर्मचाऱ्यांचे आरोग्य चिकित्सांची सुविधा उपलब्ध करण्यात आली. त्याचबरोबर अपराधी लोकांच्यासाठी Parole a Probation ची व्यवस्था करण्यात आली. याच्याआधारे कैद्यांना प्रशिक्षण देण्यात येवू लागले. औद्योगिक व तांत्रिक शिक्षाची सोय त्यांच्यासाठी निर्माण केली. याबरोबरच त्यांना मनोरंजनाची सुद्धा सुविधा देण्यात आली.

विधवा स्त्रिया व घटस्फोटित स्त्रियांच्या मुलांच्या पालन पोषणासाठी Mother Pension Act लागू केला. १९२६ च्या दरम्यान अमेरिकेत दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली. यावेळी शासनामार्फत कांही योजना सुरू केल्या. परंतु या योजनांमुळे कांहीही फरक पडला नाही. ऊलट या काळामध्ये बेरोजगारांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. त्यामुळे १९३२ ला ''आणीबाणी मदत निर्माण कायदा'' पास करण्यात आला. बेरोजगार सहाय्य, बेरोजगारांना अनुदान, ग्रामीण पुन:र्वसन, कामगारांना मदत इत्यादी कार्ये शासनामार्फत मोठ्या प्रमाणात होवू लागली.

१९०९ साली राष्ट्रपती रुजवेल्टने बाल कल्याण क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या संस्था व कार्यकर्ते यांना गरीबीच्या कारणामुळे माता-पित्यापासून वेगळी होणारी बालके बालगृहात ठेवण्यात यावी असे सांगितले.

**३) इ.स. १९३५ नंतरचा कालखंड**

१९३८ मध्ये Work project administration यांच्यामार्फत बेरोजगारांना रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्यात येवू लागल्या व नवीन रोजगार निर्माण केले जावू लागले. त्याचबरोबर Civil Conservation Crops (C.C.C.) द्वारा जे युवक शिक्षणापासून वंचित होते असे युवक CCC मध्ये सहभागी होऊ शकत होते. अशा युवकांना मासिक वेतन देण्यात येवू लागले. याबरोबरच शाळा, महाविद्यालयांनाही कांही कामे

उपलब्ध करून देण्यात आली. ग्राम कल्याण कार्यक्रम व सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक सुरक्षा या संबंधात संशोधन करण्याकरिता १९३५ मध्ये सामाजिक सुरक्षा कायदा करण्यात आला. या कायद्यांतर्गत–

**१) सामाजिक विमा** (Social Insurance) : बेरोजगारांना व वृद्धांना विमा योजना सुरू केली. या अंतर्गत वृद्धांचा मृत्यू, नोकरी समाप्ती झाल्यानंतर आर्थिक सहाय्य त्याच्या कुटुंबाला प्रदान करण्यात येवू लागले.

**२) नागरी सहाय्यता कार्यक्रम** (Programme of urban help) : यांच्या आधारे वृद्ध सहाय्यता, बेवारस बालके, अंध, अपंग व निर्धन यांच्याकरिता शासन मदत देवू लागले.

**३) आरोग्य कल्याण कार्यक्रम** (Health Welfare Programme) : वृद्ध, अपंग व रोगी यांच्यासाठी शासनामार्फत आरोग्य सेवा उपलब्ध करण्यात आली. याचबरोबर देशांतर्गत अनेक सामाजिक संस्था स्थापन करून व विविध कायदे तयार करून अमेरिकेने आपले समाजकल्याण अबाधित ठेवले.

**४) सामाजिक सुरक्षा** (Social Security) : १४ ऑगस्ट १९३५ रोजी अमेरिकेमध्ये सामाजिक सुरक्षा अधिनियम लागू केला. या नियमाद्वारे अपंग, वृद्ध, निराश्रीत यांना आरोग्य सेवा पुरविण्यात आली. इतकेच नव्हेतर वृद्धांना वेतन सुविधा पुरविण्यात आली. वृद्ध व कारखान्यातील मजूर यांना आर्थिक लाभ देण्यात येवू लागले.

**५) दान संघटना** (Charity Organization) : अमेरिकेमध्ये समाजकार्याचा विकास होताना दान संघटनासुद्धा उदयास येवू लागल्या. यांच्यामार्फत मदत कार्य करण्यास प्रारंभ झाला. दान संघटनांच्यामार्फत निवास व्यवस्था व क्षयरोग प्रतिबंध कार्यक्रम राबविण्यात येवू लागले.

थोडक्यात अमेरिकेमध्ये व्यावसायिक समाजकार्याच्या विकासामध्ये खाजगी संस्था व गिरीजाघर यांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे दिसून येते.

**(iii) भारतातील समाजकार्याचा इतिहास** (History of Social Work in India) :

समाजकार्य, परस्पर सहाय्य, दान आणि विश्वबंधुत्व याबाबत भारताची परंपरा जगातील इतर देशाइतकीच प्राचीन आहे. इंग्लंड अमेरिकेसारख्या देशात समाजकार्याचा विकास संस्थात्मक सेवा किंवा सामाजिक सुरक्षिततेच्या योजनांच्या रूपात झाला आहे. मात्र भारतात १९ व्या शतकात इंग्रजी राजवटीतच नव्हे तर स्वातंत्रप्राप्ती पर्यंत समाजकार्याचा आवश्यक इतका विकास होऊ शकला नाही. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव तसेच आर्थिक व सामाजिक कारणामुळे ते होऊ शकले नाही.

स्वातंत्रप्राप्तीनंतर समाजकल्याणाच्या क्षेत्राात एका नव्या पर्वाचा प्रारंभ झाला तरी सुध्दा एक व्यवसाय म्हणून त्याचा देशभर अजून प्रसार झाला नाही. भारतातील समाजकल्याणाच्या इतिहासाचा आढावा तीन कालखंडाच्या संदर्भात घेता येईल –

१) प्राचीन व मध्ययुगीन काळ

२) ब्रिटीश राजवटीचा काळ

३) स्वातंत्र्योत्तर काळ

- **प्राचीन व मध्ययुगीन काळ :**

आपल्या जवळपास असणा-या परिचित, गरीब व दिनदुबळया लोकासाठी काही चांगले काम करण्याची भावना हे प्राचीन काळापासूनच भारतीयांचे एक वेगळे वैशिष्टये दिसून आले आहे. सर्वच धर्मानी दान विश्वबंधुत्व, परस्पर सहकार्य या मूल्यांना महत्व दिले आहे. अपंग व भिकारी यांच्या उपजिविकेसाठी मदत करणे, त्यांची काळजी घेणे म्हणजे धार्मिक कार्यच समजले जात असे, विशिष्ट अशा मदतीची ज्यांना गरज आहे त्यांची जबाबदारी राज्यकर्ते, श्रीमंत लोक आणि समुदायातील सदस्यांनी स्विकारली होती.

राजे महाराजे, व्यापारी, जमीनदार व इतर सहाय्यकारी मंडळे यांच्यात आपापल्या साधन सामुग्रीनुसार धर्मात पवित्र मानलेली कार्ये करण्याची चढाओढ लागलेली असे. उदा. मंदिरांची व आश्रमांची उभारणी, त्यांच्या खर्चासाठी पैशाची तरतूद , साधुसंताच्या रहाण्याची व भोजनाची व्यवस्था यासाठी कायम स्वरूपाची सोय केली होती. त्यामुळेच मंदिर मठ, आश्रम इ. धार्मिक संस्था व्यापक अर्थाने समाजसेवा केंद्रेच बनली होती. याशिवाय खेडयापाडयात संयुक्त कुटुंब, जातीव्यवस्था, पंचायती व मंडळे यांनी आजारी, अपंग व वयोवृध्दांच्या गरजांची पूर्तता केली होती.

प्राचीन काळात दानधर्म, विश्वप्रेम व परस्पर सहाय्य या धार्मिक मूल्याना महत्व दिले होते. भिक्षा देणे, निराधाराना अन्नदान करणे, त्यांची देखभाल करणे ही धार्मिक कार्येच मानली होती. बेघराना मंदीरात आश्रय दिला जात असे. वयोवृध्द, आजारी आणि समुदायातील इतर निराधार लोकांच्या गरजांची पूर्तता सामाजिक संस्थामार्फत केली जात होती. एकत्र कुटुंबात वयोवृध्द, शारिरीकदृष्टया दुर्बल, रोगी आणि मनोदुर्बल व्यक्तिंची काळजी घेतली जात होती. जातींच्या व समुदायांच्या संघटनानी गरजू, निराधार लोकांची जबाबदारी घेतली होती सरंजामदारांनी त्यांच्या नोकरांवर नियंत्रण ठेवले असले तरी त्यांच्या चरितार्थांची व्यवस्था ही केली होती.

बौध्द काळातील कुलवाक जातक कथेमध्ये असे सांगितले आहे की, भगवान बुध्दाने तरूणपणी मगध प्रांतातील गांवातील तीस लोकांना एकत्र करून त्यांना जनतेच्या कल्याणासाठी काम करण्याची प्रेरणा दिली होती. ते सर्वजण गदा, कु-हाडी शस्त्रे घेउन बाहेर पडत गावातील प्रमुख रस्त्यावर पडलेले दगड फोडून रस्ते सपाट करीत आणि रथाच्या मार्गात येणारी झाडे तोडून टाकीत. मोकळया पडलेल्या जागा स्वच्छ करून तेथे मोठ्या खोल्या त्यांनी उभ्या केल्या होत्या तसेच पाण्यासाठी तलाव खोदले होते.

मौर्य काळात ग्रामपंचायतीनी खेडयातील लोकांना एकत्र करून लोकांच्या कल्याणासाठी केलेल्या कामांचा उल्लेख कौटील्याच्या अर्थशास्त्रात आहे. बालके, वयोवृध्द, व्यक्ति आणि आजारी व निराधार यांची काळजी घेतली जात होती. पोरक्या बालकांची व त्यांच्या मालमत्तेचे संरक्षण वयोवृध्द लोक करीत होते. सज्ञान झाल्यानंतर त्यांची संपत्ती त्याना इतर फायद्यासह दिली जायची. विद्वान, शिक्षक गोरगरीब मुलांच्या भोजनाची सोय करीत आणि फी न घेता त्यांना शिक्षण देत होते. विद्याज्ञान हे सर्वश्रेष्ठ मानले जात होते. गरीब लोकसुध्दा आपल्या दारी आलेल्या विद्यार्थ्यांना यथाशक्ती मदत करायचे. काही श्रीमंत लोकांनी आपल्या पूर्वजांच्या

स्मरणार्थ मोफत शिक्षण देणा-या संस्था चालवल्या होत्या.

शिक्षणाबरोबरच धर्माबाबतची अनेक कामे प्राचीन काळात झाली होती, राजे व्यापारी,जमीनदार आणि सामुदायिक मंडळांनी आपापल्या पध्दतीने धार्मिक कार्ये केली होती. मंदिर आणि मठांची उभारणी करून त्यांच्या देखभालीचा खर्च व मठवासियांच्या रहाण्याची सुविधा केली जात होती. फिरस्त्या साधु सन्याशांची अन्न, वस्त्र व इतर गरजांची पूर्तता केली जात होती.

श्रीमंत व्यापाऱ्यांनी मोठी मंदिरे बांधली होती. बौध्द चैत्य उभारले होते. काही ठिकाणी मंदिरात शैक्षणिक कामकाज चालत असे. धार्मिक स्मारकांच्या उभारणसीसाठी लोक स्वेच्छेने आर्थिक मदत करीत होते. रांची येथील बौध्द स्तुपांच्या उभारणीत आर्थिक मदत करणा-यांची नांवे कोरली आहेत.

मध्ययुगीन काळात हिंदूच्या बरोबरच मुस्लीम देखील समाजसेवेच्या भावनेने प्रेरीत झाले होते. गोरगरीबांना मदत करण्यासाठी जकात देण्याची पध्दती होती. आपल्या उत्पन्नातील वाटा गरीबाना द्यावा ही इस्लामची शिकवण आहे. मसजीदींची उभारणी करून तेथे मुलांच्या शिक्षणाची सोय करणे हे पवित्र कर्तव्य समजले जाई हिंदु आणि मुस्लिम धार्मिक नेत्यांनी लोकांना गोरगरीबांविषयी बंधुभावाची शिकवण दिली होती. गुरूनानकाने श्रीमंतांनी गोरगरीबांना मदत करण्याचे आवाहन केले होते. अबुलफझलने गोरगरीब व अडचणीत सापडलेल्या अनोळखी लोकांना मदत करण्याच्या भारतीयांच्या भूमिकेचे कौतुक केले होते. भारतीय लोक प्रवाशांच्या रहाण्या खाण्याची आनंदाने सोय करीत होते.

रस्त्याच्या कडेला पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे हे पुण्यकर्म समजले जाई. सम्राट जहांगीरने आग्रा दिल्ली मार्गावर विहीरी खोदण्याचे काम केले होते. प्रवाशांच्या सोयीसाठी सराईमध्ये जेवणखाण्याची सोय करणे हे धर्मादाय काम मानले जात होते. परकीय प्रवाशानी त्याबाबत वर्णन केली आहेत. पशूपक्षी व प्राणीमात्राबद्दल ही भूतदयेची भावना होती. उत्तर पूर्वेकडील कूचबिहारमध्ये शेळयामेंढया आणि पक्षासाठी औषधोपचाराची व्यवस्था केली होती.

सुलतान फिरोज तुघलखाने आपल्या अधिकाऱ्यांना बेरोजगार लोकांची माहिती घेउन दिवाणामार्फत त्यांच्या क्षमतेप्रमाणे रोजगार मिळवून दिला होता. त्याने दिवाण ई खैरातची निर्मिती करून गोरगरीब गरजू मुस्लीमांच्या मुलींच्या विवाहासाठी मदत केली होती त्याने आजारी व पिडीत लोकांसाठी दवाखाने सुरू केले होते. त्याने विद्वानाना आणि पवित्र कुराणाचे पठण करणा-यांना मानधन दिले होते. त्याने गुलामांच्या सुधारणेसाठी आणि त्यांना कारागिरी शिकवण्यासाठी व्यवस्था केली होती.

मध्ययुगीन काळात अनेक प्रकारे समाजकार्य प्रचलित असल्याचे दाखले सापडतात धार्मिक व शैक्षणिक संस्थाना देणग्या देणे, मंदिर व मसजीदींची उभारणी, प्रवाशासाठी रहाण्या-जेवण्याची सोय असलेल्या धर्मशाळा याबाबतच्या नोंदी व संदर्भ त्या काळच्या कागदपत्रात मिळतात. शिक्षण व अध्ययना विषयी आदर हे भारतीयांचे वैशिष्टय आहे. लोभी सावकार, दुष्ट राज्यकर्ते देखील दानधर्म करून पापमुक्त होण्यासाठी धडपडत होते. मंदीर, मसजीद व धर्मशाळातून धार्मिक शिक्षण दिले जात होते. श्रीमंत लोक मौलवी, पंडीत व गुरू यांचे आदरातिथ्य करीत. आदरणीय गुरूजन, शिक्षकाना लोक देणगी स्वरूपात सहाय्य करीत होते.

- **ब्रिटीश काळातील समाजकार्य** (Social Work is British Period) :

इ. स. १४९८ पासून पोर्तुगीज व डच यांचे भारतात व्यापारी हेतुने आगमन झाले. त्यानंतर इंग्रज आले इंग्रजानी भारतीय राज्यातील अंतर्गत दुहीचा लाभ उठवत. १८५० च्या दरम्यान संपूर्ण हिंदुस्थानवर अंमल बसविला त्या काळात ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी भारतातील मूर्तीपूजा व जातीव्यवस्थेवर टिका केली आणि ख्रिश्चन धर्मातील समानतेकडे लोकांचे लक्ष वेधले. पाश्चिमात्य इंग्रजी शिक्षणाचा भारतीयावर प्रभाव पडला. युरोपीयन समााजातील स्त्रीपुरूष समानता व विचारस्वातंत्र्यावर आधारीत समाजरचनेचे भारतातील सुशिक्षीताना आकर्षण वाटू लागले. या काळात बालविवाह व पडदा पध्दती यामुळे स्त्रियांचे जीवन हलाखीचे बनले होते. स्त्रियांच्या शिक्षणाचा विचार ही त्या काळात नव्हता. सती प्रथा,विधवांच्या पुनर्विवाहास बंदी,बहुपत्नीत्व. इ. प्रथा होत्या. साधारण १७८० च्या दरम्यान बंगालमध्ये सेरामपूर मिशनचा प्रारंभ झाला आणि नवीन विचारांचे वारे वाहू लागले. धर्मप्रसारकानी हिंदू समाज व्यवस्थेतील बालविवाह, बहुविवाह, स्त्रीभ्रूण हत्या इ. बाबत सुधारणा करण्याची गरज असल्याचे सांगितले. इ.स.१८१३ च्या चार्टर कायद्यानुसार पाश्चिमात्य शिक्षणाला प्रोत्साहन मिळाले. त्यातून नवीन विचारांचा प्रसार झाला. अनिष्ट रूढी परंपरावर टिका होऊ लागली.

राजा राममोहनराय यांनी इ.स. १८२५ साली ब्राम्हो समाजाची स्थापना केली. मूर्तीपूजेस व सतीप्रथेस विरोध केला. अस्पृश्य लोकांना ब्राम्हो समाजात सामावून घेतले. अनेक शिक्षणसंस्था स्थापन केल्या. बंगालमध्ये द्वारकानाथ टागोर, देवेन्द्रनाथ टागोर, शशीपद बॅनर्जी व केशवचंद्र सेन यांनी त्यांचे अनुकरण केले. ब्राम्हो समाजाने मुलींचे शिक्षण,विधवांचे शिक्षण व जातीप्रथेचे निर्मूलन यासाठी चळवळी केल्या. केशवचंद्रसेन यांनी स्त्रियांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. पंडीत ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या प्रयत्नाने इ.स. १८५६ साली हिंदू पुनर्विवाह कायदा सम्मत झाला. न्यायमूर्ती म.गो. रानडे यांनी इ.स.१८७१मध्ये पुणे येथे सार्वजनिक सभेची स्थापना केली. १८८५ साली स्थापन झालेल्या काँग्रेसचे ते प्रभावी नेते होते. मात्र काँग्रेसने राजकीय कार्याला प्राधान्य दिल्यामुळे त्यांनी १८८७ साली समाजसुधारणेसाठी भारतीय समाज परिषदेची निर्मिती केली. त्यांच्या कार्याचे क्षेत्र व्यापक होते. बालविवाह व हुंडापध्दती दूर करणे, विधवांची स्थिती सुधारणे, मुलींचे शिक्षण, आंतरजातीय विवाह, दलित वर्गाची सुधारणा, हिंदू मुस्लिम ऐक्य इ. क्षेत्रात त्यांनी मोलाची कामगिरी केली. म्हणूनच त्यांना सामाजिक सुधारणेचे प्रणेते मानले जाते. त्याकाळात महाराष्ट्रात आगरकर, तेलंग, कर्वे यांनी समाजसुधारणेचे काम केले. महर्षी कर्वेनी स्त्रीशिक्षणास वाहून घेतले. समाजसुधारणेचे दुसरे आंदोलन म्हणून आर्य समाजाचा उल्लेख केला जातो. १८७७ मध्ये स्वामी दयानंद सरस्वती यांनी मुंबई येथे त्याची सुरूवात केली. पंजाबमध्येही आर्य समाजाचा प्रसार झाला. त्यांनी जीतीप्रथा, बालविवाह, विधवांची स्थिती, धर्मांतरांतांचे पुनर्वसन इ. क्षेत्रात काम केले. अल्प फी घेउन नैतिक चारित्र्यावर भर देणाऱ्या शिक्षणाची सोय केली. स्वामी विवेकानंद यांनी १८९७ साली रामकृष्ण मिशनची स्थापना केली. शैक्षणिक, सामाजिक व दलित कल्याणाची कार्ये त्यांनी केली.

मुस्लीम समाजसुधारक सर सय्यद अहमद खान यांनी १८७५ साली एका शिक्षणसंस्थेची स्थापना केली. त्यातूनच पुढे अलिगढ विद्यापीठ निर्माण झाले.

इंग्रजी शिक्षणातून भारतीयांना लोकशाही स्वातंत्र्य आणि विवेकी विचार यांची ओळख झाली. इ. स. १९०० च्या दरम्यान देशाच्या आर्थिक जीवनात मोठे बदल झाले. बलुतेदारी,कारागिरी व स्वयंपूर्ण ग्रामीण

अर्थव्यवस्था विस्कळीत होऊ लागली खेडयापाड्यातील लोक रोजगारासाठी औद्योगिक शहराकडे जाऊ लागले. शहरात लोकांची गर्दी, दारिद्र्य,व्यसनाधिनता, स्त्रिया व बालकांचे शोषण, झोपडपट्ट्या इ. समस्या निर्माण झाल्या.

महाराष्ट्रात पुणे येथे इ. स. १८७५ साली महात्मा जोतीबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यांनी ब्राम्हणेत्तर समाजाचे शिक्षण, अनाथाश्रम व मुलींच्यासाठी शाळा सुरू केल्या. कनिष्ठ जातींच्या उध्दारासाठी त्यांनी मोठे कष्ट घेतले. इ. स. १८८२ मध्ये पंडिता रमाबाई यांनी हिंदू स्त्रियांच्या कल्याणासाठी काम केले. १८८७ साली शशिपाद बॅनर्जी यांनी बंगालमध्ये हिंदू विधवासाठी एक संस्था स्थापन केली. मुंबई व मद्रास येथेही अशा संस्था काम करू लागल्या १८९६ साली महर्षी कर्वे यांनी पुणे येथे विधवागृहाची स्थापना केली.

- **१९०० ते १९४७ :**

विसाव्या शतकात समाजकार्याच्या क्षेत्राात चैतन्य आले. १९०४ साली भारतातील मुस्लीम, शिख, बौध्द, आर्य समाज, ब्राम्हो समाज आणि बुध्दीवादी एका संम्मेलनात एकत्र आले. देशातील सर्व सुधारणा संघांचे एकत्रीकरण करण्याचा निर्णय झाला. १९०६ मध्ये महर्षी वि.रा.शिंदे यांनी भारत दलित वर्ग मिशन समाज या संस्थेची स्थापना केली व शिक्षणप्रसार आणि अस्पृश्यता निर्मूलनाचे काम केले. १९०६ ते १९१२ या काळात म्हैसूर, कलकत्ता, बेंगलोर, फिरोजपूर व मुंबई येथे विधवागृहांची स्थापना झाली.

१९१९ साली सामाजिक कार्यकर्त्यांच्या संम्मेलनात असा संदेश देण्यात आला की, लोकशिक्षण, देशाची स्वच्छता, गरीबासाठी निवारा, आजारी, दुर्बल लोकांची देखभाल,मागेल त्याला काम, क्रिडा व मंनोरंजनाची व्यवस्था, खेडयांची स्वच्छता व शिक्षण या सर्वांचा समाजसुधारणेच्या संदर्भात विचार केला पाहिजे. या काळात वि. रा. शिंदे, डॉ. ॲनी बेझंट, मार्गारेट कुशन्स यांनी समाजकार्य केले. मद्रास येथे वुमन्स इंडियन असोसिएशन ची स्थापना झाली. १९२५ मध्ये नॅशनल कौन्सिल ऑफ वुमन ची स्थापना झाली.

- **महात्मा गांधी व समाजकार्य :**

१९२० पासून कॉंग्रेसचे नेतृत्व महात्मा गांधीकडे आले.त्यांनी अस्पृश्यता निवारण कार्यास प्राधान्य दिले. स्वराज्याची मागणी त्याशिवाय व्यर्थ आहे असे त्यांचे मत होते. हिंदूंच्या सर्व मंदीरात दलिताना प्रवेश देण्याचा ठराव कॉंग्रेसने केला. गांधीजींच्या प्रेरणेने अनेक सेवाभावी कार्यकर्त्यानी अस्पृश्यता निवारण कार्यास वाहून घेतले. गांधीजींनी हरिजन सेवक संघ, आरवेल भारतीय ग्रामउदयोग संघ, नयी तालीम संघ या संस्थांच्या माध्यमातून अस्पृश्यता निवारणाचे कार्य केले. स्वदेशी,खादी,संयम,जातीय सलोखा व राष्ट्रीय शिक्षण या माध्यमातून समाजसुधारणेस चालना दिली. १९२९ मध्ये पंडित मालवीय आणि जमनलाल बजाज यांनी हिंदुंच्या मंदिरात सर्व हिंदुंना म्हणजेच अस्पृश्यांना प्रवेश मिळवून दिला.

१९३० मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विधानसभेमध्ये दलित वर्गाच्या प्रतिनिधीत्वाबाबतचा प्रस्ताव सायमन कमिशनकडून मान्य करून घेतला त्यामुळे दलितांचा राजकीय दर्जा सुधारला. त्यांनी आपल्या समाजबांधवांना शिका,संघटित व्हा आणि संघर्ष करा असा संदेश दिला. दलितांच्या उध्दारासाठी त्यांनी आपले

उभे आयुष्य झोकून दिले.

१९२० पासून स्त्रिया व बालकांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणणारे कायदे अनेक राज्यात झाले. मद्रास,मुंबई व बंगाल प्रांतात बालकायदे संम्मत झाले. हिंदू उत्तराधिकार कायद्यामुळे स्त्रियांना पित्याच्या संपत्तीत हक्क मिळाला. १९२३ मध्ये भारतीय दंड विधाननुसार मुलींचा अनैतिक व्यवसायासाठी वापर करणे हा गुन्हा ठरविण्यात आला. वेश्या व्यवसायास प्रतिबंध करण्यासाठी अनेक राज्यानी कायदे केले १९२७ साली बालविवाह प्रतिबंध कायदा करण्यात आला.

आर्य समाजाने राष्ट्रीय शिक्षणाचा कार्यक्रम राबविणा-या संस्थांची स्थापना केली. भारतीय रेडक्रॉस वाय.एम.सी.ए. या संस्थांनी बालसुरक्षा व ग्रामीण पुनर्रचना याबाबत काम केले.

१९२३ साली मद्रास सेवा सदन, अखिल भारतीय महिला परिषद यांनी महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले. मात्र त्यांचे कार्य शहरी मध्यमवर्गीय लोक पुरते मर्यादीत होते. १९३७ मध्ये कॉंग्रेस मंत्रीमंडळानी मद्यपान बंदीचे धोरण राबविले

१९२२ मध्ये कारखाना विषयक कायदे व खाण विषयक कायदे संम्मत करण्यात आले. कामगारांच्या नुकसान भरपाई, कामगार कलह निवारणाबाबत कायदे झाले. तरीसुध्दा त्या काळात कामगार कल्याणाबाबत सरकारने खास तरतुदी केल्या नाहीत.

१९३६ साली सर दोराबजी टाटा यांनी ग्रॅज्युएट स्कूल ऑफ सोशल वर्कची स्थापना केली. १९३७ नंतर कॉंग्रेस मंत्रीमंडळानी आर्थिक कार्यक्रमांच्या बरोबरच सामाजिक कार्यक्रमांची सुरूवात केली. कांही राज्यात ग्रामीण विकास खाते, महिला कल्याण खाते निर्माण करण्यात आले. मुंबई इलाख्यात खाणावळी व इतर सार्वजनिक ठिकाणी सर्वांना मुक्त प्रवेश मिळेल, जातीच्या आधारावर भेदभाव केला जाणार नाही असा कायदा झाला. राज्य सरकारांनी हरीजन, आदीवासी, गुन्हेगार जाती व इतर मागासवर्गांच्या समस्याकडे विशेष लक्ष दिले.

१९४० च्या दरम्यान देशात राजकीय चळवळींची व्याप्ती वाढली. स्त्रिया नोकरीसाठी आणि राजकीय चळवळीसाठी घराबाहेर पडल्या. भारत सरकारने १९४१ साली बी.एन.राव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. या समितीने स्त्रियांचा वारसा हक्क, स्त्रियांचा संपत्तीत वाटा, एकविवाह, घटस्फोट इ.बाबत शिफारशी केल्या. या काळात खाण कामगारांच्या कल्याणासाठी कायदा करण्यात आला. तरीसुध्दा स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी इंग्रज सरकारने केवळ काही कायदे करणे आणि शिक्षण, आरोग्य यासाठी अनुदान देणे एवढया मर्यादेतच समाजकार्याचे धोरण राबविले, अपंग आणि अल्पउत्पन्न गटातील लोकांच्यासाठी इंग्लंड अमेरिकेसारखी व्यवस्था त्यांनी केली नाही या संदर्भात स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच चांगले प्रयत्न करण्यात आले.

- **स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळातील समाजकार्य :**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कॉंग्रेस सरकारने कल्याणकारी राज्याचा आदर्श स्विकारला, तेव्हा दलित वर्गाच्या सुधारणेसाठी सक्रिय सहाय्य केले. अनेक सामाजिक कायदे करून दुर्बल घटकांच्या कल्याणाला चालना दिली. समाजकल्याण खाते, समुदाय विकास व सहकार खाते तसेच केंद्रीय समाजकल्याण मंडळ पुनर्वसन विभाग यांची

स्थापना करून समाजकार्याची व्याप्ती वाढवली

**स्वातंत्र्योत्तर काळात झालेले प्रमुख सामाजिक कायदे पुढीलप्रमाणे आहेत**

**१) विशेष विवाह कायदा १९५४ :** या कायदयानुसार विवाहावरील धार्मिक बंधने दूर करण्यात आली भिन्न भिन्न धर्माच्या व्यक्तिनी विवाहबध्द होण्यास मान्यता मिळाली. तसेच घटस्फोट हा पतीपत्नी या दोघांचाही अधिकार मानण्यात आला.

**२) हिंदू विवाह विच्छेद कायदा १९५५ :** या कायद्यानुसार विवाहाबाबतचे पूर्वीचे सर्व कायदे रद्द झाले. हिंदू, बौध्द, जैन, शिख यांना हा कायदा लागू होतो. या कायदयात हिंदू विवाहाच्या अटी, न्यायिक पृथ्थ:करण विवाह विच्छेद याबाबतचे स्पष्टीकरण केले आहे.

**३) हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ :** हिंदू स्त्रियांना कुटुंबाच्या संपत्तीत,मालमत्तेत अधिकार देणारा हा महत्वाचा कायदा आहे. या कायद्यामुळे स्त्रीला मुलगी,पत्नी व माता म्हणून संपत्तीत अधिकार मिळाला.

**४) अस्पृश्यता अपराध अधिनियम १९५५ :** अस्पृश्यता मानणे,पाळणे याबाबत कडक निर्बंध घालणारा हा कायदा आहे. सध्या नागरीक संरक्षण अधिनियम म्हणून हा कायदा संबोधला जातो.

**५) हिंदू अज्ञान पालक संरक्षण कायदा १९५६ :** ज्या मुलांच्या आई वडीलांचा मृत्यु झाला आहे आणि ज्यांचे वय १८ वर्षापेक्षा कमी आहे अशा अज्ञान मुलांची संपत्ती, मुलांचे पालनपोषण व शिक्षण याबाबत त्यांच्या नातेवाईकाना अधिकार देणारा हा कायदा अनाथ मुलांच्या कल्याणासाठी केला आहे.

**६) हिंदू दत्तक विधान १९५६ :** ज्या पतीपत्नीना अपत्याचा लाभ झाला नाही त्यांनी त्यांच्या इच्छेनुसार मुलगा किंवा मुलगी दत्तक घेण्याचा अधिकार देणारा हा कायदा आहे.

**७) वेश्या व्यवसाय निवारण कायदा १९५६ :** समाजातील अनिष्ट अशा वेश्यावृत्तीला प्रतिबंध करणारा हा कायदा आहे. कोणत्याही स्त्रिला तिच्या इच्छेविरूध्द अनैतिक व्यवसाय करण्यास भाग पाडणे हा गंभीर गुन्हा मानला असून त्याबाबत कठोर शिक्षेची तरतूद केली आहे. तसेच अनेक ठिकाणी अशा स्त्रियांसयाठी संरक्षण गृहांची व सुधारगृहांची स्थापना केली आहे.

**८) सतीप्रथा निवारण कायदा १९८७ :** थोर समाजसुधारक राजाराममोहन राय यांनी सतीप्रथेविरूध्द बंगालमध्ये सर्वप्रथम आंदोलन केले. त्यांच्या प्रयत्नामुळेच १८२९ साली सतीप्रथा निवारण कायदा झाला १९८७ साली या कायद्यात दुरूस्त्या करून तो अधिक कडक करण्यात आला. याबाबत आता अनुकूल लोकमत तयार झाले असून सतीप्रथा संपुष्टात आली आहे.

**९) बालविवाह प्रतिबंध कायदा १९२९-१९७८ :** १९२९ साली संम्मत झालेला बालविवाह प्रतिबंध कायदा शारदा कायदा म्हणून ओळखला जातो.१९७८ साली या कायद्यात केलेल्या दुरूस्तीनुसार मुलीचे विवाहाचे किमान १८ वर्षे व मुलाचे वय २१ वर्षे निश्चित करण्यात आले आहे. बालविवाहाची प्रथा आता पूर्वीसारखी राहिली नाही.

**१०) हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१, १९८४, १९८६ :** या कायद्यानुसार हुंडा देणे घेणे बेकायदेशीर असून त्याबाबतच्या गुन्हयात कडक शिक्षेची तरतूद केली आहे.

**११) मुस्लिम महिला संरक्षण अधिनियम १९८६ :** मुस्लिम महिला विशेषता तलाक पिडीत महिलांना संरक्षण देण्यासाठी हा कायदा महत्वाचा मानला जातो.

**१२) कामगारांचा नुकसान भरपाई कायदा :** हा कायदा संम्मत झाल्यानंतर सामाजिक सुरक्षिततेच्या उपाययोजनांची सुरूवात झाली. कामगार कामावर असताना अपघात होऊन अपंगत्व आल्यास त्याला किंवा मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना भरपाई देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

**१३) कर्मचा-यांचा भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ :**

कामगारांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने हा कायदा महत्वाचा मानला जातो. या कायदयानुसार मालक व कामगार यांच्या संयुक्त सहभागातुन कामगाराला अडचणीच्या प्रसंगी आर्थिक तरतूद होते. तसेच सेवानिवृत्तीनंतर एकरक्कमी आर्थिक लाभ मिळतो.

### १.३.३ समाजकार्ये – तत्त्वे, मूल्ये आणि समाजकार्याची नितीतत्त्वे (Social Work - Principles, Values and Ethics)

**प्रस्तावना :**

समाज हीच समाजकार्याची प्रयोगशाळा असल्यामुळे समाजातील निरनिराळ्या समस्यांवर निष्कर्ष काढून त्यावर उपाय सुचविणे शक्य होते. परंतु असे असूनही वेगवेगळ्या समाजातील समस्या या सारख्याच नसतात म्हणून एका समस्येसाठी सांगितलेले उपाय दुसऱ्या समस्येला लागू पडू शकत नाही. पर्यायाने परिस्थितीनुरूप समस्या व त्यावर उपाय योजावे लागतात. समाजकार्याबरोबरच दानधर्म, परोपकार या गोष्ठीसुद्धा गरजेच्या होत्या. समाजकार्य म्हणजे सेवा असा अर्थ प्राचीनकाळी घेतला जात होता. परंतु अलिकडील काळामध्ये समाजकार्य म्हणजे एक कला झाली आहे. यासाठी विविध तंत्राचा व ज्ञानाचा उपयोग केला जाऊ लागला. इतकेच नव्हेतर वैयक्तिक व सामुहिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी शास्त्रशुद्ध पद्धतीचा वापर केला जाऊ लागला. यातूनच समाजसेवा हा एक प्रगतशिल व्यवसाय झाला आहे. त्यामुळे संपूर्ण जगाने व्यावसायिक समाजकार्याला मान्यता दिलेली दिसून येते.

**१) समाजकार्याची व्याख्या** (Definition of Social Work)

१) फ्रेन्डलँडर यांच्या मते, ''समाजकार्य व्यावसायिक सेवा असून शास्त्रीयज्ञान आणि मानवी कौशल्यावर आधारित आहे. ज्यामध्ये वैयक्तिक स्वातंत्र्य व गटाला मदत करून सामाजिक आणि वैयक्तिक समाधान व स्वातंत्र्य प्राप्त करते.''

२) स्ट्रप यांच्या मते, ''समाजकार्य ही लोकांना स्वतःच स्वतःची मदत करण्याची वैज्ञानिक पद्धत उपयोगात आणून व्यक्ती, गट व समुहांच्या गरजा विविध स्त्रोतांनी पूर्ण करण्याची कला होय.''

३) पींकस आणि मिनहान यांच्यामते, ''समाजकार्य समाजातील लोक आणि त्यांचे सामाजिक वातावरण यातील आंतरक्रियेशी संबंधीत असून जे लोकांच्या जीवनातील कामांवर परिणाम करते आणि लोकांना त्यांचे मूल्य जाणून घेण्यास मदत करते.''

## २) **समाजकार्याची तत्त्वे** (Principles of Social Work) -

समाजकार्य विविध क्षेत्रात सेवा देते. मानव आणि त्यांचे वातावरण यांच्यातील समाजकार्य विशेष लक्ष देते. सेवा देणे, सामाजिक न्यायांची स्थापना करणे, सहभागाला मान्यता देणे, मानवी नातेसंबंधांना महत्त्वाचे मानणे ही समाजकार्याची वैशिष्ट्येपूर्ण दृष्टिकोन लक्षात घेवून प्रत्येक समाजकार्य करताना व्यक्ती किंवा संस्था यांना कांही स्वतःची तत्त्वे पाळावयाची असतात. त्याच्याआधारे समाजकार्य करावे लागते. अशी तत्त्वे खालीलप्रमाणे–

**१) व्यक्तीच्या पात्रतेवर विश्वास** (Convication of Dignity) : व्यक्तीच्या पात्रतेनुसार सामाजिक कार्यकर्ता कार्यपद्धती करत असतो. यामध्ये प्रत्येक व्यक्तीच्या योग्यतेस महत्त्व दिले जाते. यामध्ये व्यक्तीच्या वैयक्तिकरणास महत्त्व दिले जाते. त्याचबरोबर व्यक्तीच्या योग्यतेवर विश्वास ठेवून वातावरण सुखमय करण्याचा प्रयत्न केला जातो.

**२) स्वातंत्र्य :** व्यक्तीला स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याचा अधिकार असतो. यामध्ये व्यक्तीला सामाजिक, आर्थिक व व्यक्तीगत गरजा असू शकतात. त्या पूर्ण करण्यासाठी ती व्यक्ती कोणत्याही साधनांचा वापर करू शकतो. यामध्ये स्वयंनिर्णयास फार महत्त्व असून स्वतःची मदत स्वतः करायची असते.

**३) आत्मविश्वास** (Confidence) : यामध्ये व्यक्ती स्वतःचा उद्देश व व्यवहारामध्ये बदल करण्यास सक्षम असतो त्यामुळे कार्यकर्ता व्यक्तीच्या उद्देश बदलाला सहाय्य करतो. थोडक्यात कार्यकर्त्यांच्या सहाय्याने स्वतःची समस्या सोडविण्यात यश प्राप्त होण्यासाठी त्यांच्यात आत्मविश्वास पुन्हा निर्माण होतो.

**४) समूह प्रयत्नांचा विकास** (Development of Collective efforts) : समूहामध्ये सामूहिक कार्यांच्या साधनांना निश्चित करण्यासाठी कार्यकर्त्यांना अधिकार दिलेला असतो. यामुळे कार्यकर्ता त्याचवेळी सहकार्य करतो ज्यावेळी समुहातील व्यक्ती स्वतःला मदत करण्यास असमर्थ ठरते.

**५) सर्वांकरिता समान संधी :** लोकशाही समाजामध्ये सर्व सदस्यांना समान संधी असते कारण समाजातील प्रत्येक व्यक्तीमध्ये क्षमता ह्या भिन्न-भिन्न स्वरूपाच्या असतात. परंतु विकासात्मक गरज जेंव्हा निर्माण होते तेव्हा सर्वांना समान संधी दिली जाते. यामध्ये कार्यकर्ता समुदायातील योग्य साधनानुसार व्यक्तीला सहाय्य करतो. त्यामुळे व्यक्ती आपल्या समस्या सोडवू शकते. यामध्ये कार्यकर्ता धर्म, जात, वर्ग यांचा विचार करत नाही. थोडक्यात कार्यकर्ता समुदायातील प्रत्येक व्यक्तीस समान संधी देवून प्रोत्साहन देतो.

## ३) **समाजकार्याची मूल्ये** (Values of Social Work)

मूल्ये या शब्दाचा अर्थ अनेक प्रकारे घेतला जातो. नितीतत्त्वविषयक सिद्धांत असाही मूल्यांचा अर्थ घेतला जातो. मूल्ये आदर्श घालून देतात. आचारसंहिता व सिद्धांत यांचा अंतर्भाव मूल्यात होतो. त्यांची निर्मिती मूल्यांतून होते. बंधने पाळण्याची मानसिकता, भावना माणसात आतून यावी लागते. थोडक्यात

समाजकार्याने कोणती पातळी गाठणे अपेक्षित आहे हे मूल्ये स्पष्ट करतात.

समाजकार्य हे विविध क्षेत्रात कार्य करत असतात. मानवाचा विकास करण्यावर समाजकार्य लक्ष देत असतात. समाजातील शोषीत, समस्याग्रस्त व समाजाने बहिष्कृत केलेली समाजाची आचारसंहिता अबाधित ठेवून समाजकार्य केले जाते. नितीमुल्याशिवाय समाजकार्य होत नाही. प्राचीन काळामध्ये समाजकार्य धार्मिक संस्थांच्याद्वारे केले जात होते. परंतु कालांतराने असे समाजकार्य धार्मिक संस्थाबरोबरच ऐच्छिक संस्था उदयास आल्या. समाजकार्याची मूल्ये समाजकार्याला बळकट बनवतात. मूल्यांमुळे चांगले जीवन जगण्याचे व विकास करण्याचे सामर्थ्य मिळते. थोडक्यात मुल्यामुळेच समाजकार्याला गती प्राप्त होते व दुसऱ्याप्रती सहकार्य करण्याची भावना मनामध्ये निर्माण होते अशी मूल्ये खालीलप्रमाणे –

१) समाज व व्यक्ती परस्पर असल्यामुळे दोघांचेही हित साधले जाते.

२) समाजातील साधनांचा उपयोग करून गरजांची पूर्तता केली जाते.

३) व्यक्तींचा आदर केला जातो.

४) समाज कोणताही असो, तिचा स्विकार केला जातो.

५) लोकशाही मार्गांनी समस्या सोडविण्याचे अधिकार व्यक्तीस दिले जातात.

६) व्यक्तीच्या क्षमतेचा विकास साधला जातो.

७) कार्यकर्त्यांच्या आवडी-निवडीला महत्त्व नसून गरजेला महत्त्व आहे.

८) स्वयंनिर्णयाच्या अधिकारासोबत गुप्तता पाळणे गरजेचे असते.

९) समाजकार्यामध्ये सकारात्मक दृष्टिकोनास महत्त्व दिले जाते.

१०) कोणताही विकास स्वतःहून लादला जात नाही.

११) व्यक्तीचा विकास साधण्याकरिता मानवी क्षमतांचा शोध घेतला जातो.

१२) समस्यांचा अभ्यास करून आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे.

१३) व्यक्तीच्या क्षमतेचा विकास साधला जातो.

१४) व्यक्तींच्या कल्याणासाठी कार्यकर्ता बरोबर असतो.

थोडक्यात, समाजकार्यामध्ये योग्य दिशा व चौकटीत काम करावयाचे असेल तर मूल्यांचा आधार घेणे गरजेचे असते. कारण मूल्ये ही समाजकार्याच्या गतीला प्रभावित करत असता.

### ४) **समाजकार्याची नितीतत्त्वे** (Ethics of Social Work)

**प्रस्तावना :**

प्रथा, सवयी असा नितितत्त्वे याचा अर्थ होतो. कांही तज्ञ यांना बाहेरून लादलेली बंधने मानतात. नितितत्त्वे माणसाचे शील, चारित्र्य, स्वभाव व वृत्ती कशा असाव्यात याबद्दल सांगतात. वर्तणूक, सभ्यता, संस्कृती, संस्कृतपणा याबद्दल मार्गदर्शन करतात. निती हे ज्ञान आहे. ते कृतींना मार्गदर्शन करतात. थोडक्यात, नितीतत्त्वाची बंधने जेव्हा पाळली जातात तेंव्हाच नीतितत्त्व प्रत्यक्षात उतरले जाते. म्हणूनच

नीतित्वामध्ये नैतिक तत्त्वज्ञान व नैतिक आदर्श यांचा अंतर्भाव होतो.

रूपांतरीत नीतितत्त्वे, आदर्श नमुना प्रस्तुत करणारी नीतितत्त्वे, वर्णनात्मक नीतितत्त्वे असे तीन प्रकार पहावयास मिळतात. नैतिक तत्त्वज्ञान हे वेळोवेळी रचले जाते तर कांही तत्त्वज्ञान त्रिकालाबाधित असते. ती आदर्श व अढळ असतात तशीच ती शाश्वत असतात.

नितीतत्त्वांची समाजकार्याला एक व्यवसाय म्हणून समाजात दर्जा मिळवतांना गरज आहे. सतत निर्णय घेतांना व उद्‌भवणारे पेच सोडवितांना नीतिमूल्यांच्या मार्गदर्शनाची गरज असते. भारतातील व्यावसायिक समाजकार्याने आचारसंहिता स्विकारून वेळोवेळी त्या त्याप्रमाणे बदल केले आहेत, यातूनच १९९७ साली नितीतत्त्वे पुढील मुद्द्यांवर भर देतात.

१) मानवाचे, मानवतेचे महत्त्व

२) मानवाच्या महत्तेला उच्चतम स्थान

३) प्रत्येकात आपले आयुष्य जगण्याची उपजत क्षमता.

४) निर्णय व निदान यात सहभाग असा सहभाग हा प्रत्येकाचा अबाधित अधिकार असतो.

IFSW व IASSW या आंतरराष्ट्रीय संघटनांनी नीतितत्त्वांच्या बांधणीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. अशा नीतितत्त्वांची गरज भारतात जाणवू लागल्यानंतर १९९१ पासून त्या दिशेने प्रयत्न सुरू झालेत. १९९७ साली ASSWI ने या नितीतत्त्वांना पुरस्कृत केले ते खालीलप्रमाणे-

अ) स्वतःत, व्यवसायात आणि समाजात मूल्यांचा पुरस्कार करण्याची शपथ समाजकार्यकर्ते घेतात.

आ) स्वतःप्रती व व्यवसायप्रती नैतिक जबाबदारी.

इ) गरजू व शोषितांप्रती नैतिक जबाबदारी.

ई) समाज व राज्य यांच्याप्रति नैतिक जबाबदारी.

उ) सहकार्यकर्ते व काम देणाऱ्या संघटनेप्रति नैतिक जबाबदारी.

ऊ) समाजकार्य शिक्षण व संशोधनाप्रति नैतिक जबाबदारी.

वरील नीतितत्त्वांचा भाग काटेकोरपणे आचरणात आणला तरी होणारे समाजकार्य सखोल व प्रगल्भ व समाजाभिमुख होणार आहे.

### १.३.४ समाजशास्त्र व समाजकार्य यांच्यातील संबंध :

समाजशास्त्र व समाजकार्य या दोहोमध्ये अनेक बाबी समान असलेल्या दिसून येतात. माणसावर त्याच्या सहसंबंधाचा, संघटनांचा परिणाम होतो. तसेच माणूस हा सहसंबंधाना व संघटनेला प्रभावित करत असतो. म्हणजेच मानव हा एक सामाजिक प्राणी आहे. अशा या सामाजिक प्राण्याचा म्हणजे मानवाचा अभ्यास समाजशास्त्र करते तर समाजशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग समाज, त्यातील व्यक्तींना समजून घेण्यासाठी समाजकार्य कार्य करते.

समाजशास्त्र व समाजकार्य या दोन्ही शास्त्रांचा अभ्यासविषय हा लोक, त्यांचे परस्परसंबंध, त्यांच्यामध्ये

घडून येणाऱ्या आंतरक्रिया व या आंतरक्रियांचे स्वरूप समजून घेणे हा आहे. यांच्या आधारेच समाजकार्य सहसंबंधातील समस्या व भूमिकातील समस्यांचा अभास करून त्यावर उपाय शोधते. थोडक्यात समाजातील लोक कसे, केंव्हा व का वागतात याचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो. तर सामाजिक समस्या जाणून घेणे व त्यावर संशोधन करण्याचे काम समाजकार्य करते. समाजकार्यात लोकांच्या समस्या सोडवण्यात त्यांचे सहसंबंध सुधारण्यात व सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडण्यास मदत करते. इतकेच नव्हे तर त्या समस्या समजून घेवून व त्यावर उपाय सांगून समस्या सोडविण्यासाठी कामाची रूपरेषा आखण्याचे व त्यानुसार काम करण्याचे कार्यकर्ता समाजकार्यात करतो.

समाजशास्त्रामध्ये सामाजिक संबंध, आंतरक्रिया यांचा अभ्यास केला जातो. सामाजिक संबंधांचे संतुलन, सामाजिक बदलामुळे बदलते. पर्यायाने माणसाचे वर्तन बदलते आणि त्यामुळे संस्थातील संबधावर परिणाम होतो. जुन्या मूल्यांच्या जागी नवीन जीवन पद्धती येते. यातूनच नवनवीन सामाजिक समस्या व प्रश्नांची निर्मिती होते आणि या समस्या व प्रश्न सोडविण्याचे काम समाजशास्त्रातील ज्ञानाच्या आधारे समाजकार्य करते. समाजकार्य सामाजिक समस्या, शास्त्रीय पद्धतीने सोडविते. सामाजिक समस्यांचे ज्ञान समाजकार्याला समाजशास्त्रातून प्राप्त होत असते.

समाजशास्त्रात मानवाचा अभ्यास त्यांच्या संस्कृतीच्या व वातावरणाच्या संदर्भात केला जातो. मानवाचे वर्तन, त्याचे समाजीकरण, सत्ता, स्पर्धा, संघर्ष, एकात्मता, सामाजिक नियंत्रण, सामाजिक परिवर्तन, विघटन यांचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो आणि याचा उपयोग समाजकार्याच्या पद्धतीमध्ये होत असतो. पर्यायाने ह्या ज्ञानाचा उपयोग करून समाजाला सेवा देण्याचे कार्य समाजकार्य करते.

समुदाय संघटनासाठी समुदाय, समुदायाची संस्कृती, समस्या यांचे ज्ञान उपयोगी ठरत असते. समाजातील औपचारिक व अनौपचारिक संघटना, संस्था व त्यांच्या कामकाजाचा अभ्यास समाजकल्याण प्रशासनास सहाय्य करत असतो. प्रामुख्याने सामाजिक परिवर्तनाच्या अभ्यासाने सामाजिक क्रियाही समाजकार्याची पद्धत कार्यरत होते.

समाजशास्त्रीय संशोधनाची बैठक समाजकल्याण संशोधनाला उपयोगी ठरत असते. इतकेच नव्हे तर समाजशास्त्रामधील वेगवेगळे विषय किंवा समाजशास्त्राच्या वेगवेगळ्या शाखा समाजकार्याच्या वेगवेगळ्या क्षेत्रात काम करताना उपयोगी पडतात. थोडक्यात, समाजशास्त्र सामाजिक समस्यांचे शास्त्रशुद्ध विश्लेषण करते. तर समाजकार्य सामाजिक समस्या सोडविण्यासाठी शास्त्रशुद्ध मार्ग व साधने पुरवत असते.

● **सारांश :**

समाजशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र आहे. परंतु अनेक लोकांची सामाजिक कार्याची समाजशास्त्राशी सांगड घालताना संभ्रमावस्था होते. कारण समाजकार्याचे कार्य हे थोडे वेगळे कार्य आहे. समाजशास्त्रामध्ये मानवी प्राण्यांच्या एकमेकांशी होणाऱ्या आंतरक्रियांचे परीक्षण केले जाते. तसेच मोठ्या समाजाशी वर्तनाचे संघटन कसे साधले जाते हे पाहिले जाते. तर समाजकार्यात समाजशास्त्रातील माहितीचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. समाजकार्य हा असा एक पेशा आहे ज्यामध्ये मदत करणाऱ्या लोकांची माहिती मदत

करण्यासाठी पुरविली जाते. थोडक्यात, समाजशास्त्राने निर्माण केलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजकार्य आणि इतर मानवी सेवा व्यवसायांच्या प्रत्यक्षिकांमध्ये वापरली जाते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

**एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) श्रीमंतांनी गोरगरीबांना मदत करण्याचे आव्हान कोणी केले.

२) ब्राह्मो समाजाची स्थापना कोणी केली.

३) स्वामी विवेकानंद यांनी कोणत्या साली रामकृष्ण मिशन स्थापन केली.

४) हिंदु स्त्रियांच्या कल्याणासाठी कोणी काम केले.

५) विधानसभेमध्ये दलित वर्गाच्या प्रतिनिधीत्वाबाबतचा प्रस्ताव सायमन कमिशनकडून कोणी मान्य करून घेतला.

६) ग्रॅज्युएट स्कूल ऑफ सोशल वर्कची स्थापना कोणी केली.

७) अस्पृश्यता अपराध अधिनियम कायदा कधी पास झाला.

८) नॅशनल असोसिएशन ऑफ सोशल वर्क्सने समाजकार्याची मुल्ये कधी स्विकारली.

९) मानव हा सामाजिक प्राणी आहे असे कोणी म्हटले आहे.

१०) सेवार्थीला देण्यात येणाऱ्या सेवेच्या दर्जाची जबाबदारी कोणावर असते.

- **स्वयं अध्ययनाची उत्तरे.**

१) गुरुनानक

२) राजाराम मोहन रॉय

३) १८९७

४) पंडिता रमाबाई.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

६) सर दोराबजी टाटा

७) १९५५

८) १३ ऑक्टोबर १९६०

९) ॲरिस्टॉटल.

१०) कार्यकर्त्यावर

## १.४ सरावासाठी प्रश्न

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. इंग्लंडमधील समाजकार्याचा इतिहास लिहा.

२. अमेरिकेतील समाजकार्याच्या इतिहासाचा आढावा घ्या.

३. भारतातील समाजकार्यांचा इतिहास स्पष्ट करा.

४. समाजकार्यांची तत्त्वे विशद करा.

५. समाजकार्याची मूल्ये स्पष्ट करा.

६. समाजकार्याची नितीतत्त्वे सांगा.

८. समाजशास्त्र व समाजकार्य यांच्यातील संबंध स्पष्ट करा.

९. समाजकार्याची व्याख्या सांगा? समाजकार्याची मुलतत्त्वे स्पष्ट करा.

१०. भारतातील समाजकार्याचा इतिहास विषद करा.

**ब) टीपा लिहा.**

१. समाजकार्याची तत्त्वे

२. समाजकार्याची मूल्ये

३. समाजकार्याची नीतितत्त्वे

४. समाजशास्त्र व समाज कार्य संबंध.

५. समाजकार्याचा अर्थ.

६. प्राचीन व मध्ययुगीन काळ.

७. ब्रिटीश कार्यातील समाजकार्य.

८. महात्मा गांधी व समाजकार्य.

९. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळातील समाजकार्य.

## १.५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१) Principles of Sociology - R. N. Sharma

२) Human Society - Kingsley Davis

३) Careers in Social-work (2nd edition) - Leon H. Ginshberg.

४) Choudhari D. Paul - Introduction to Social Work, Atmaram and sons, 1964.

५) Divekar V. D. (VI[ed]) Social Reform Movement in India, Historical Perspective, Sangam Books, London-91.

६) भांडारकर पु. ल., वैद्य, समाजशास्त्रीय सिद्धांत, विद्या प्रकाशन, नागपूर १९७९.

७) भागवत विद्युत, स्त्री-प्रश्नाची वाटचाल, पुणे, प्रतिमा प्रकाशन, २००४.

८) टांकसाळे डॉ. प्राजक्ता, व्यावसायिक समाजकार्य विचारधारा व इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००७.

९) साळवेकर डॉ. संजय, समाजकार्य-पद्धती, क्षेत्र, विचारधारा व समाजसुधार, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २०१५.

❑❑❑

# घटक – २

# समाजकार्य – मूलभूत संकल्पना आणि पद्धती

## Social Work : Basic Concepts and Methods

**घटक संरचना :**

२.१ प्रास्ताविक

२.२ उद्दिष्ट्ये

२.३ विषय विवेचन

२.३.१ मूलभूत संकल्पना –

अ) समाजकल्याण

ब) सामाजिक सेवा

क) सामाजिक सुरक्षितता

ड) मानवी अधिकार

इ) सामाजिक वंचितता आणि सामाजिक समावेशन

फ) सामाजिक विकास व समाजकल्याण

२.३.२ अ) व्यक्ती सहाय्य कार्य

ब) गट कार्य

२.३.३ अ) समुदाय संघटन

ब) समाज कल्याण प्रशासन

२.३.४ अ) समाजकार्य संशोधन

ब) सामाजिक क्रिया

२.४ सरावासाठी प्रश्न.

२.५ संदर्भ ग्रंथ

**२.१ प्रस्तावना** (Introduction) :

व्यावसायिक समाजकार्याच्या प्रशिक्षणांतर्गत येणाऱ्या विविध संकल्पनांचा या पाठामध्ये आपण अभ्यास करणार आहोत. तसेच या पाठामध्ये आपण समाजकार्याच्या विविध पद्धतींचा थोडक्यात आढावा घेणार आहोत.

मूलत: समाजकार्याच्या पद्धती दोन गटामध्ये विभागल्या गेल्या आहेत. ज्यांना प्राथमिक अभ्यासाच्या पद्धती व द्वितीय अभ्यासाच्या पद्धती असे म्हटले जाते. व्यक्तीकार्य, गटकार्य आणि समूह कार्य या प्राथमिक पद्धती आहेत. तर समूह कार्य, समाजकल्याण प्रशासन व समाजकार्य संशोधनाच्या पद्धती या द्वितीय पद्धती आहेत. याचबरोबर या घटकांमध्ये आपण मानवी अधिकार, सामाजिक सेवा, सामाजिक सुरक्षितता इत्यादी संकल्पनांची माहिती घेणार आहोत.

## २.२ **उद्दिष्ट्ये** (Objective) :

या घटकांचा अभ्यास केल्यानंतर आपण –

१) विविध सामाजिक संकल्पनांची माहिती समजून घेणार आहोत.

२) समाजकार्यांच्या प्राथमिक पद्धतीचा अभ्यास करणे व तिची व्याप्ती समजून घेणे.

३) समाजकार्यांच्या द्वितीय पद्धतीचा अभ्यास करणे व तिची व्याप्ती समजून घेणे.

## २.३ विषय विवेचन :

मानवी इतिहासामध्ये मानवी सामाजिक विघटनाला दारिद्र्य, दैन्य, दु:ख, धर्म, प्रांत यासारखे विविध प्रश्न कारणीभूत होते. परंतु १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत कुटुंब, धर्म, विवाह यासारख्या संस्था हे विघटन टाळण्यासाठी कार्यरत होत्या. औद्योगिक क्रांतीनंतर आणि शहरीकरणाची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात समाजामध्ये बदल अनुभवण्यास येवू लागले. लोकसंख्या वाढीमुळे माहिती आणि तंत्रज्ञानाच्या विकासामुळे, औद्योगिकरणामुळे, पर्यावरणाच्या प्रदूषणामुळे विविध प्रकारच्या नवनवीन समस्या देखील उदयाला येवू लागल्या आहेत.

या सर्व परिस्थितीमुळे लोकांना शास्त्रशुद्ध पद्धतीने मदत करण्यासाठी समाजकार्याची एक नवीन शाखा उदयास आली. भारतामध्ये १९३६ साली या अभ्यासक्रमाची सुरूवात झाली. इतर सर्व विद्याशाखांपेक्षा समाजकार्याची विद्याशाखा ही सर्वात तरूण व सातत्याने विकसित होणारी आहे.

## २.४ **मूलभूत संकल्पना** (Basic Concepts) :

### अ) **समाजकल्याण** (Social Welfare) :

● **प्रस्तावना :**

समाजकल्याण ही एक व्यवस्था आहे. ज्यामध्ये समाजातील उपेक्षित वर्गाच्या विकासासाठी फार मोठ्या प्रमाणात विविध कायदे, कार्यक्रम आणि सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न याद्वारे केला आहे. समाजाच्या चांगल्या नियमनासाठी व वंचित वर्गाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात शासकीय पातळीवरून सहकार्य केले जाते. सातत्याने बदलणाऱ्या सामाजिक प्रश्नांचा आढावा घेवून त्यावर हुकूम सामाजिक कल्याण करण्यासाठी शासन कार्यतत्पर राहते.

सामाजिक संस्थांना तोंड देण्यासाठी व सामाजिक समस्या सोडवण्यासाठी करावी लागणारी कार्ये व प्रक्रिया यांचा व ही कार्ये करणाऱ्य संस्था यांचा समाजकल्याणात अंतर्भाव होतो. समाजकल्याणात १) व्यक्तीला महत्त्व असते. २) व्यक्तींना परस्पर आंतरक्रियामधून वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक समस्या निर्माण होतात हे मान्य असते. ३) समस्या दूर करून व व्यक्तीचे जीवन समृद्ध करण्यासाठी कांही करता येते हा विश्वास असतो. समाजकल्याण उपेक्षित निराधाराकरीता सेवा प्रदान करते.

आपल्या देशात स्वातंत्र्यपूर्व काळात समाजकल्याणाचा विचार मर्यादित स्वरूपात केला जात असे. शासकीय स्तरावर वेगळे खाते किंवा विभाग नव्हता. समाजाची व मागास घयकांची उन्नती, विकास करण्यासाठी व त्याचा जीवनस्तर इतर समाजघटकांच्या बरोबरीने आणण्यासाठी व त्याचे शोषण रोखण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात तरतूदी होऊ लागल्या. केंद्रिय समाजकल्याण बोर्डाची स्थापना झाली. भारत कल्याणकारी राज्य व लोकशाही राज्य असल्याने या घटकांच्या प्रगतीचे, देशाच्या विकासातील महत्त्व लक्षात घेवून शासन व स्वयंसेवी संस्था कार्य करतात. प्रगती व्हावी म्हणून योजना व कार्यक्रम आखले जातात. या योजना आखत असताना प्रत्येक देशांतील सामाजिक व संस्थात्मक रचना आणि तेथील राजकीय व आर्थिक मतप्रणालीमुळे प्रभावित झालेली असते. राष्ट्रीय कल्याणकारी कार्यक्रमांचे विविध प्रकारात वर्गीकरण करण्याचा धोका असतो. तथापी, कल्याणकारी व्यवस्थेत कांही देशातील त्या त्या देशाच्या सामाजिक अग्रक्रमांची वैशिष्ट्ये उमटलेली असतात. तसेच त्यातूनच समाजकल्याणाचा अधिक सर्वसाधारण दृष्टिकोनही व्यक्त होतो. समाजकल्याण क्षेत्रात तरतूद केलेली असते ती खालीलप्रमाणे –

**१) कुटुंबाशी संबंधित प्रारुप :**

सर्व समाजामध्ये समाजकल्याण तरतुदीत कुटुंब महत्त्वाची भूमिका बजावत असते. उदा. मुलांचे पालनपोषण आणि वृद्धांची काळजी यासाठी सार्वजनिक धोरणाचा कुटुंबावरील भार खूपच वेगळ्या प्रकारचा असतो. जिथे अद्यापही कुटुंबाच्या भूमिकेवर भर दिला जातो अशा प्रगत समाजाचे उदाहरण म्हणजे फ्रान्स देश होय. त्याचप्रमाणे विकसनशील देशाचा विचार करत भारतात एकत्र कुटुंब पद्धती अजूनही कांही भागात प्रचलित आहे. अनेक कारणामुळे जरी तिला उतरती कळा लागली असली तरी वृद्ध माणसे, मुले व बेरोजगारांना सुरक्षा देण्याचे तिचे कार्य चालू आहे.

**२) अवशेषात्मक प्रारूप :**

या प्रारूपाचे उत्तम उदाहरण म्हणून अमेरिकेकडे पाहिले जाते. गरीब गरजू मधील वृद्ध बेरोजगार व आजारी व्यक्तीपुरतीच ही योजना मर्यादित केली आहे. तर इतर लोकसंख्येला कल्याणकारी सेवा, खाजगी बाजार विशेषत: विम्यामार्फत उत्तम सुरक्षितता सेवा पुरवल्या जातात. म्हणून सर्वात वैशिष्ट्यपूर्ण असा अमेरिकेचा समाजकल्याण कार्यक्रम म्हणजे राज्याची सार्वजनिक कल्याण योजना होय.

**३) मिश्र अर्थव्यवस्था प्रारूप :**

पश्चिम जर्मनीतील समाजकल्याण यंत्रणेचा महत्त्वाचा भाग म्हणजे वर्गणीवर आधारीत विमा योजना

होय. जर्मनीतील सामाजिक विमा पद्धतीने व्यक्तीगत उद्योग प्रवर्तकांना सहकार्याचे एक यशस्वी चर्चापीठ पुरवले आहे. तर ब्रिटनमध्ये या प्रारूपाखाली दिली जाणारी रक्कम लाभ योजनेनुसार विम्याच्या मिळणाऱ्या रक्कमेइतकीच असते. केंद्र शासनातर्फे या योजनेसाठी अर्थसहाय्य पुरविले जाते. म्हणून जर्मनीच्या विमा योजनेच्या तुलनेत ब्रिटनमधील योजना कमी यशस्वी ठरली आहे.

**४) राज्यनियंत्रण प्रारूप :**

या प्रारूपाचे सोव्हियत युनियन हे अगदी ठळक उदाहरण आहे. रशियाने खाजगी कल्याणकारी सेवा पुर्णपणे नष्ट केलेल्या नाहीत. यामध्ये संपूर्ण सामाजिक विमा, अवशेषात्मक समाजकल्याण, व्यक्तीगत समाजसेवा आणि वैद्यकीय उपचारांचा मोठा हिस्सा यांचे संघटन स्थानिक परिषदांमार्फत केले जाते.

सोव्हिएत व्यवस्थेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अपंगांना सामावून घेणे, बाळंतपणाची विस्तारीत रजा आणि आई व छोटी बाळे यांना दिला जाणारा निर्वाह भत्ता व विशेष शहरी विभागात विस्तृत प्रमाणात शिशुशाळा व दिवस केंद्रे यांची केलेली तरतूद होय.

● **सारांश :**

समाजकल्याण कार्यक्रमाचे प्रमाण व गुणवत्ता वेगवेगळ्या देशात एकसारखी असू शकत नाही. कारण त्यांच्या लोकसंख्येत फरक असतो. त्या देशांचा विकासाचा टप्पा, आर्थिक संशोधने ज्यांना सेवा पुरवावयाच्या आहेत त्या ग्राहकांची संख्या व त्यांची व्याप्ती, शासन प्रकार व त्यांची धोरणे, लोकांच्या गरजा व आकांक्षा, त्यांच्या संघटनांचे स्वरूप समाजकल्याण कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी लागणारा प्रशासकीय लवाजमा व संघटनात्मक उपलब्धता यावरही ते कार्यक्रम ठरत असतात.

**ब) सामाजिक सेवा** (Social Services) :

सर्व सुसंस्कृत समाजव्यवस्थेमध्ये आपल्या समाजाला आरोग्य, शिक्षण, करमणूक इत्यादी सेवा पुरविण्यासाठी सुत्रबद्ध व्यवस्था निर्माण केलेली आहे. व्यापक अर्थाने समाज सेवा ही समाजाने आपल्या बांधवासाठी निर्माण केलेली अशी एक व्यवस्था आहे की, ज्यामाध्यमातून लोक आपले राहणीमान सुसह्य पद्धतीने जगू शकतील. या सेवांच्या माध्यमातून समाजामध्ये चांगल्या पद्धतीने सामाजिक आतंरक्रिया निर्माण होतील. तसेच व्यक्ती समूहामधील परस्परसंबंध देखील सकारात्तमक रूप घेतील. १९४३ साली कॅसेडी (Cassidy) यांच्यामते, या नियोजनबद्ध पद्धतीने प्रत्यक्षात मानवी संसाधनाच्या संरक्षणासाठी, संवर्धनासाठी आणि सुधारणासाठी दिल्या गेलेल्या सेवा आहेत. यामध्ये सामाजिक सहाय्य, बालकल्याण, मानसिक आरोग्य, शिक्षण, गृह प्रकल्प इत्यादी सेवांचा समावेश होतो.

फ्रिडलॅन्डर (Freed Lander) यांनी १९६३ साली स्पष्टपणे असे नमूद केले आहे की, सामाजिक सेवा या समाजातील सर्व घटकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सेवा आहेत. अशा या सामाजिक सेवांची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे -

● **विषय विवेचन :**

सामाजिक सेवा या सार्वजनिक सेवा असतात. संपूर्ण समाजाला खुल्या असणाऱ्या, सर्व नागरीकांना उपलब्ध असणाऱ्या या सेवांचा यात अंतर्भाव होतो. त्यांचा उद्देश पुनर्वसनाचा असलाच पाहिजे असे नाही.

समाजकल्याण, समाजसेवा व समाजकार्य यामध्ये सर्व ठिकाणच्या सर्व मानवाला त्याच्या आध्यात्मिक, अभिवृत्तीसाठी व आध्यात्मिक विकासासाठी त्यांनी घरी व घराबाहेर समाधानकारक सहसंबंध प्रस्थापित करण्यासाठी आरोग्य, शिक्षण, आल्हाददायक घर व राहण्याची व्यवस्था होण्यासाठी, त्यांना त्यांच्या आवडीचे रुचीचे काम मिळवण्यासाठी, मुबलक मनोरंजनाचा आस्वाद घेण्यासाठी, सांस्कृतिक प्रगती व विकासासाठी, सामाजिक सुरक्षिततेसाठी शक्य तितक्या जास्तीत जास्त संधी मिळणे व या सर्व बाबीकरीता व याप्रमाणे मानवजीवनातील इतर आवश्यक बाबीसाठी पुरेसे उत्पन्न मिळवण्याच्या संधी मिळणे व या सर्वांमुळे संपूर्ण मानव समाजाचे दैनंदिन जीवन व्यवस्थित राहण्यास मदत होते. सामाजिक सेवांच्या माध्यमांतून व्यव२स्थापनात व समाजकल्याण कार्यक्रमांच्या विकासात ज्ञान, कौशल्ये व मुल्ये वापरून व्यवस्थापन व विकासाचे कार्य केले जाते.

१) समाज / राज्याकडून सेवा पुरविल्या जातात व त्यांचे नियोजन केले जाते.

२) समाजातील सर्व स्तर या सेवांचे लाभ घेतात.

३) समाजसेवांच्या माध्यमातून समाजाचे जीवनमान उंचावणे व गुणवत्तापूर्ण आयुष्य जगण्यास सहाय्य होते.

४) समाजसेवांच्या माध्यमातून मानवी अधिकारांचे संरक्षण व संवर्धन करणे, सामाजिक विकास घडवून आणणे आणि लोकांच्यामध्ये आपल्या कर्तव्यबुद्धीची जागृती करणे हा आहे.

● **सारांश :**

सामाजिक सेवामध्ये लोकांना आवश्यक असणाऱ्या सेवांचा अंतर्भाव होतो. उदा. पोस्ट, दळणवळणाची साधने, पाणी योजना, दवाखाने या सर्वांमध्ये पुनर्वसनाचा उद्देश असलाच पाहिजे असे नाही. लोकांना योग्य व समाधानकारक जीवन जगता यावे म्हणून सेवा पुरवल्या जातात व या सेवा मधून लोकांचे कल्याण साधले जाते. या सेवा व गरजू यांच्यात समाजकार्य मध्यस्थ असते. समाजकल्याण, समाजसेवा व समाजकार्य यांचा परस्परसंबंध असतो.

**क) सामाजिक सुरक्षितता** (Social Security) :

प्रत्येक व्यक्तीला त्याच्या. आयुष्यामध्ये अनेक चांगल्या वाईट प्रसंगांना सामोरे जावे लागते. अशा प्रसंगांना सामोरे जाताना त्याला सामाजिक सुरक्षिततेची गरज असते. सामाजिक सुरक्षिततेच्या माध्यमातून त्याच्या किंवा त्याच्या कुटुंबाच्या जीवितास निर्माण झालेल्या अडचणीवर मात करता येते. अशा प्रकारच्या सामाजिक सुरक्षितता विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून पुरविल्या जातात.

सुरूवातीच्या काळामध्ये या सामाजिक सेवा कुटुंबाच्या माध्यमातून म्हणजेच एकत्र कुटुंब (Joint family) पद्धतीच्या माध्यमातून आणि भारताच्या बाबतीत जातीय व्यवस्थेच्या माध्यमातून पुरविल्या जात होत्या. २१ व्या शतकामध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे व्यापार व उद्योगधंद्याची वाढ झालेली आहे. अशा परिस्थितीत एकत्र कुटुंब पद्धती, जातीय व्यवस्था, धर्मव्यवस्था खिळखिळ्या झाल्या आहते. शहरीकरणाच्या प्रक्रियेमुळे तसेच वाढत्या औद्योगिकीकरणामुळे सामाजिक सुरक्षितता प्रधान करणाऱ्या वरील व्यवस्था आज लोप पावत आहेत. या सर्व परिस्थितीत नितीमुल्यांची व्याख्या व व्याप्ती बदलू लागली आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून समाजातील दुर्बल, विकलांग, उपेक्षित घटक आहेत. ते उपेक्षित जिणे जगत आहेत.

समाजाच्या विकासासाठी व उन्नतीसाठी कांही ठोस भूमिका व कार्यक्रमांचे नियोजन करणे गरजेचे आहे. हे लक्षात आल्यानंतर सर्व प्रथम इंग्लंड मध्ये १९३५ साली सर विल्यम ब्रेव्हिरीज (Sir Willam Beveridge) यांनी सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने मांडणी केली. त्यांच्या मते, सामाजिक सुरक्षितता प्रदान करताना मानवाचे रोगराई, अज्ञान, आळसीपणा, अपंग, गलिच्छ राहणीमान व त्यांच्या गरजांची क्रमवारी या पाच प्रश्नांवर मात करण्यासाठी सामाजिक सुरक्षितता प्रदान केली पाहिजे.

फ्रिडलॅन्डर यांनी १९६३ मध्ये सामाजिक सुरक्षितता हा समाजाने स्वत:च्या समाज बांधवासाठी तयार केलेला कार्यक्रम असे सूचित केले आहे. त्यांच्या मते, आधुनिक युगात निर्माण झालेली बेरोजगारी, वृद्धत्व, औद्योगिक अपघात, अनारोग्य अशा प्रकारच्या प्रश्नावर मात करणे वैयक्तिकदृष्ट्या शक्य नाही. म्हणून सामाजिक सुरक्षितता पूरविणाऱ्या संस्थांची निर्मिती झाली.

सामाजिक सुरक्षिततेची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे -

१) सामाजिक सुरक्षिततेसारख्या सेवा लोकांनी लोकांच्यासाठी जाणीवपूर्वक निर्माण केल्या आहेत.

२) शारीरिक, आर्थिक किंवा अनुषंगिक पण आकस्मिक उद्‌भवणाऱ्या सर्व समस्यावर मात करण्यासाठी सामाजिक सुरक्षितता प्रदान करण्यात आली आहे. थोडक्यात या सेवा मानवाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत अखंडितपणे पुरविली जाऊ शकते.

३) सामाजिक सुरक्षिततेचे लाभ पैसा व वस्तूच्या स्वरूपात किंवा दोन्हींच्या माध्यमातून उपलब्ध होतात.

४) सामाजिक सुरक्षितता व्यक्तीला संख्यात्मक व गुणात्मक पद्धतीने आत्मविश्वासपूर्ण आपले आयुष्य जगण्यास मदत करतात.

५) सामाजिक सुरक्षिततेच्या माध्यमातून पुरविल्या जाणाऱ्या सेवांसाठी लाभार्थ्यांनी परतावा केलाच पाहिजे असा दंडक नसतो.

वरील वैशिष्ट्यांच्या आधारे असे लक्षात येते की, मानवाला व्यक्तीगत व कौटुंबिक पातळीवर आकस्मिकपणे उद्‌भवणाऱ्या समस्येवर समाजाच्या सहाय्याने मात करता येते.

● **सामाजिक सुरक्षिततेच्या पद्धती** (Forms of Social Security) :

सामाजिक सुरक्षिततेच्या तीन पद्धती पहावयास मिळतात त्या पुढीलप्रमाणे –

१) सामाजिक विमा (Social Insurance)

२) सार्वजनिक सहाय्य (Public Assistance) व सामाजिक सहाय्य (Social Assistance)

३) सामाजिक व सार्वजनिक सेवा (Social and Public Services)

१) **सामाजिक विमा** (Social Insurance) :

या सेवेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्याला कांही स्वरूपात वैयक्तिक किंवा अंशिक योगदान द्यावे लागते. ज्यामुळे आपत्तीच्या काळात त्याला सुरक्षितता प्रदान केली जाते.

२) **सार्वजनिक सहाय्य व सामाजिक सहाय्य** (Public Assistance and Social Assistance)

या प्रकारच्या सुरक्षिततेमध्ये व्यक्तीला त्याच्या जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत गरजांची पुर्तता करण्यासाठी पैसा व वस्तूंच्या स्वरूपात सुरक्षितता प्रदान केली जाते. या सेवा शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक व खाजगी संस्था व संघटनांच्या माध्यमाद्वारे पुरविल्या जातात.

३) **सामाजिक व सार्वजनिक सेवा** (Social and Public Services)

मानवी व सामाजिक विकास साध्य करण्यासाठी राज्य व समाज यांच्याद्वारे या सेवा पुरविल्या जातात. या सेवा पुरविण्यासाठी शासकीय पातळीवर स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित असते. तर दुसऱ्या बाजूला समाजामध्ये असे कार्य करणाऱ्या कांही स्वयंसेवी संस्था व संघटना कार्यरत आहेत.

ड) **मानव अधिकार** (Human Rights) **:**

मानवी अधिकार ही तुलनेने फार नवीन संकल्पना आहे. जिचा उदय १९४५ साली झालेला दिसून येतो. मानवी हक्कांची व्याप्ती ही सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय क्षेत्रांशी विस्तृत प्रमाणात निगडीत आहे.

मानवी अधिकार ही संकल्पना आता बऱ्याच सामाजिक आणि राजकीय गटांकडून वारंवार वापरली जाऊ लागली आहे. कारण मानवी अधिकार हे व्यक्तीचे अधिकार आहेत आणि या अधिकाराशिवाय व्यक्तीचे अस्तित्व हे असून नसल्यासारखेच आहे. मानवी अधिकार हे कशावरही अवलंबून नाहीत. एखादी विधीव्यवस्था जर मानवी अधिकाराच्यादृष्टीने सकारात्मक नसेल तर तो निरर्थक कायदा असेल.

१) **मानवी अधिकाराचा उगम :**

मानवी अधिकारांची मुळे ही इतिहास तथा पुरातनात पार रूजलेली दिसतील. राज्यांच्या सर्वकष कारभारापासून या अधिकारांचे संरक्षण व्हायला हवे. नागरी आणि लोकशाही अधिकारांच्या यादीमध्ये या हक्कांचा समावेश करण्यात येतो. पुराणमतवाद्यांच्या मतानुसार, मानवी हक्कांचा समावेश हा धर्मामध्येच करण्यात आला आहे तर डाव्या विचारवंतांच्या आणि उदारमतवादी विचारवंतांच्या मते, माणसा-माणसांमधील समानता आणि सन्मानाचे जीवन जगण्याचा व्यक्तीला अधिकार म्हणजेच खऱ्या अर्थाने 'मानवी अधिकार' होय.

सन १६२८ मध्ये चार्लस् यांनी पहिली मानवाधिकार बाबतची याचिका मंजूर केली होती. त्यानुसार सभागृहाने जाहीरनामा काढून स्वातंत्र्याचे जतन केले होते. मानवी जीवन जगण्यासाठी असलेल्या मूलभूत अधिकारांच्या रक्षणासाठी मानवी समाज आणि शासनकर्त्यांनी नेहमी जागरूक असणे आवश्यक असल्याची भूमिका घेऊन संयुक्त राष्ट्र संघटनेने १० डिसेंबर १९४८ रोजी मानव अधिकाराबाबत जागतिक स्तरावर घोषणा केली.

**२) आयोगाची स्थापना :**

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या या परिस्थितीत भारतात 'मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३' अंमलात आला. मानवी अधिकार म्हणजे, ''जीवन स्वातंत्र्य, समानता आणि व्यक्तीचा सन्मानाने जगण्याचा अधिकार होय.

**३) अधिकार व उद्देशाचा जाहीरनामा :**

मानव अधिकाराबाबत संयुक्त राष्ट्र संघाने केलेल्या घोषणेमुळे कांही प्रमाणात का होईना संपूर्ण जगावर परिणाम झाला आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरूवातीच्या ५८ सदस्य राष्ट्रांची त्यांच्या सगळ्याच क्षेत्रात विविधता होती. त्यांच्यामध्ये राजकीय संरचना, धार्मिक आणि सांस्कृतिक भिन्नता असताना संयुक्त राष्ट्र संघटनेने सर्व सदस्य राष्ट्रांना मानव अधिकार व त्यांचे उद्देश कायम करण्याचा कार्यक्रम जाहीर केला.

संयुक्त राष्ट्र संघटनेने १९४८ मध्ये मानव अधिकार आयोगाची स्थापना केली. तेव्हा फक्त १८ राष्ट्रांनी या आयोगाचे सदस्यत्व स्विकारले होते.

**४) कायदा :**

भारतातील सामाजिक स्थिती विचारात घेता ''मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३'' पारित केला. या कायद्यान्वये मानव अधिकार आयोगाची स्थापना केली. या आयोगाद्वारे प्रत्येक वर्षी विविध ठिकाणच्या घडामोडींचा अभ्यास करून एक अहवाल केंद्र सरकारला सादर करण्यात येतो. यामध्ये कांही सूचना असतात आणि या सूचनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी राज्य सरकारची असते.

**५) मानवी हक्क जाहिरनामा :**

राज्याने कोणते नियम स्विकारावे याबाबतचे तत्व विशद करणाऱ्या मानवी हक्कांचा जाहिरनामा १९२९ मध्ये आंतरराष्ट्रीय विधी संस्थेने पुढीलबाबतीत पारित केला –

अ) प्रत्येकाच्या जिवित, मालमत्ता व स्वातंत्र्यासाठी समान हक्क असणे व त्याचा लिंग, धर्म, पंथ, भाषा किंवा राष्ट्रीयत्वाशी संबंध नसणे.

ब) जनहित व नैतिकतेला बाधा येत नसणारा कोणताही व्यवसाय करण्याची प्रत्येकाला मुभा देणे.

क) कोणतीही भाषा बोलण्याचे व ती शिकविण्याचे स्वातंत्र्य देणे.

ड) समानता ही केवळ औपचारिकता नसणे.

इ) धर्म, पंथ, लिंग व भाषा या कारणाने कोणाचेही राष्ट्रीयत्व न नाकारणे.

## इ) सामाजिक वंचितता आणि सामाजिक समावेशन :

**प्रस्तावना :**

सामाजिक वंचितता ही संकल्पना सर्वप्रथम फ्रान्समध्ये उदयास आली. कामगारांचा अभ्यास करणाऱ्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या कार्यातून तिचा हळूहळू संपूर्ण युरोपभर प्रसार झाला. सामाजिक वंचितता म्हणजे अशा स्वरूपाची एक प्रक्रिया की, ज्याद्वारे एखादी व्यक्ती अथवा समूह ती ज्या समाजामध्ये वास्तव्य करून असते, तिचा संपूर्ण सहभाग करून घेण्याऐवजी अंशत: अथवा पुर्णता वंचित ठेवली जाते.''

सामाजिक वंचितता ही संकल्पना प्रामुख्याने दोन कारणामुळे स्विकारलेली असते. ती म्हणजे १) ही संकल्पना सामाजिक दृष्ट्या वंचित असणाऱ्या समूहांचा विविध भागांनी अभ्यास करते. २) समाजामध्येही ही प्रक्रिया कशाप्रकारे घडून येते व ही प्रक्रिया कोणकोणत्या घटकांच्यामधून घडून येते व या प्रक्रियेअंतर्गत कोणकोणत्या घटकांकडून अथवा संस्थाकडून वंचित समूहातील व्यक्तींना वंचित ठेवण्याचा प्रयत्न होत असतो, हे स्पष्ट होते.

सामाजिक समावेशन म्हणजे वंचित समूहांना समाविष्ट करून घेण्याची प्रक्रिया होय. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये भारतीय समाजामध्ये वंचित समूह आढळून येत होते. कारण त्यामध्ये वंचित समूहांना समाजाच्या विविध क्षेत्रात वंचित ठेवण्यात येत होते. पर्यायाने अशा वंचित समूहांना समाजातील इतर नागरिकांप्रमाणे सामाजिक जीवनामध्ये सहभागी होता येत नव्हते. भारतामध्ये असणाऱ्या अस्पृश्य जाती व आदिवासी जमातींना वंचित समूहांचे जीवन जगावे लागत होते.

सामाजिकदृष्ट्या वंचित असणारे भारतातील विविध वंचित समूहांचे सामाजिक व आर्थिक जीवन आणि त्यांना समाविष्ठ करून घेण्याबाबतच्या धोरणाच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या कालखंडात लोकशाही संसदीय शासन पद्धतीद्वारे आदिवासी आणि अनुसूचित जातीना विशेष तरतूद देण्याचे मान्य करण्यात आले होते. त्यासाठी अशा वंचित समूहांना आरक्षण देण्याचे मान्य करण्यात आले.

**विषय विवेचन :**

भारतीय समाजव्यवस्था आणि त्या ठिकाणच्या एकूणच सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीचा विचार करता, त्यांचा अभ्यास करताना यामध्ये अनेक घटकांचा समावेश होतो. अशा अनेक घटकांना वंचितामध्ये समावेश करताना अपेक्षेइतक्या प्रमाणात शासनाला यश प्राप्त झालेले दिसून येत नाही.

अशा वंचित घटकांना समाविष्ट करून घेण्यासंदर्भात नवीन स्वरूपाचे समावेशनाचे धोरण कसे असावे, त्याचप्रमाणे समावेशन प्रक्रिया कशा प्रकारे घडून येते व या प्रक्रियेचे महत्त्व काय? याबद्दलचा अभ्यास समावेशनाच्या संकल्पनेतंर्गत विचारात घेतला आहे.

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये परिवर्तनाचा विचार करता, पारंपारीक समाजरचनेपासून ते आजच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेपर्यंत अनेक वंचित समूहांना स्वत:मध्ये बदल घडवून आणण्याची संधी मिळाली. परंतु समाजातील विविध समस्यांमुळे वंचित समूहांना समाजजीवनात समाविष्ट करून घेतले जात नाही.

**अ) सामाजिक वंचितता** (Social Exclusion) :

सामाजिक शास्त्राच्या अभ्यासात अनेक विचारवंतांनी सामाजिक वंचित समूहाच्या अभ्यासासाठी सामाजिक वंचितता ही संज्ञा वापरलेली दिसते. सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासामध्ये सामाजिक वंचिततेच्या वैशिष्ट्यांबाबत विचारवंतांच्यामध्ये एकमत आढळून येते. सामाजिकदृष्ट्या वंचित असणाऱ्या समूहांबाबतची चर्चा करताना या समूहाचा थेट संबंध हा दारिद्र्य व असमानता (Poverty and Enequality) यांच्याशी येतो.

**व्याख्या :**

१) ''व्यक्तीची समाजाच्या प्रमुख, राजकीय, आर्थिक, सामाजिक कार्यपद्धतीमध्ये सहभागी होण्याची अक्षमता म्हणजे सामाजिक वंचितता होय.''

२) ''सामाजिक वंचितता म्हणजे समाजातील कांही विशिष्ट समूहांनी इतरांना समान संधीचा वापर करण्याबाबत लादलेला नकार होयं.''

वरील व्याख्यांच्या आधारे सामाजिक वंचिततेची वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील ती खालीलप्रमाणे -

**१) सांस्कृतिक दृष्टीकोनातून सामाजिक वंचितता :**

प्रत्येक मानवी संस्कृतीमध्ये सामाजिक वंचित समूहांचे स्वरूप हे त्या समाजातील संस्कृतीचा परिणाम असतो. कारण प्रत्येक समाजाच्या संस्कृतीनुसार सामाजिक संबंधांचे स्वरूप निश्चित होत असते. आणि असे संबंधच ते समूह कायम किंवा अंशत: वंचित ठेवण्याचा प्रयत्न करतात. थोडक्यात, कोणत्याही मानवी समाजातील सामाजिक वंचिततेला त्या समाजाची संस्कृतीच कारणीभूत असते.

**२) उच्चतम प्रमाणात दारिद्र्य :**

ज्या समूहांचे दारिद्र्याचे प्रमाण अधिक असते त्याचे दरडोई उत्पन्न कमी असते. आर्थिक उत्पन्नांचे प्रमाण कमी असल्याने त्यांना स्वत:चा विकास करण्यामध्ये अडचणी निर्माण होतात.

**३) आर्थिक उत्पन्नाचे प्रमाण कमी :**

वंचित समूहांमधील व्यक्तींचे आर्थिक उत्पन्न फारच कमी असते. कारण अशा वंचित समूहांमध्ये बेरोजगारी व आर्थिक उत्पन्नाची साधने कमी असल्याने उत्पन्नामध्ये प्रमाण कमी असते. उदा. शेतमजूर, अल्पभूधारक इत्यादी. प्रामुख्याने आर्थिक उत्पन्न कमी असल्याने त्यांना स्वत:चा विकास करता येत नाही.

थोडक्यात, डॉ. अमर्त्यसेन या विचारवंतांच्यामते, समाजातील अशा स्वरूपाची परिस्थिती की, ज्यामध्ये समाजातील कांही व्यक्ती जवळपास दुर्लक्षित म्हणून कायमच्या बाजूला ठेवल्या जातात. त्यांनाच आपण वंचित समूह म्हणतो.

**ब) सामाजिक समावेशन** (Social Inclusion) :

**प्रस्तावना :**

औद्योगिक क्रांतीनंतर युरोपमध्ये अर्थव्यवस्थेच्या कल्याणकारी मॉडेलचा विचार सुरू झाला. बाजारीकरण व जागतिकीकरणातून निर्माण होणाऱ्या समस्यांवर चर्चा होवू लागली. १९९० च्या कालखंडामध्ये सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांना समाविष्ट करून घेण्यासंदर्भात चर्चा होऊ लागली.

आजच्या काळात सामाजिक व राजकीय अभ्यासकांच्या मते, समूहांचे हक्क आणि समूहांच्या संस्कृतीचे जतन करताना त्यांचे प्रगत संस्कृतीसोबत सम्मीलीकरण न करता त्यांची संस्कृती स्वतंत्रपणे जोपासावी.

**व्याख्या :**

१) ''जात, वंश, लिंग आणि धर्म इत्यादीसारख्या घटकांवर आधारित समाजातील जे समूह सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित समूह म्हणून ओळखले जातात. त्यांच्यासाठी आरक्षण धोरणाद्वारे समाविष्ठ करून घेण्याची प्रक्रिया म्हणजे सामाजिक समावेशन होय.''

२) ''वंचित समूहांना सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सबळ करण्याची व त्यांना समान संधी देण्याची प्रक्रिया म्हणजे सामाजिक समावेशन होय.''

थोडक्यता, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पंडित नेहरू यांनी ज्या समाजवादी अर्थव्यवस्थेचा स्विकार केला त्याचा प्रत्यक्ष वापर न झाल्यामुळे भारतीय समाजातील अनेक वंचित समूहावर परिणाम होवू लागले. अशावेळी सामाजिक समावेशनाची प्रक्रिया खालीलप्रमाणे आपण समजून घेणे आवश्यक आहे -

**१) वंचित समूहांचे सामाजिक आणि आर्थिक सबलीकरण :**

वंचित समूहांचे सामाजिक आणि आर्थिक सबलीकरण करताना त्यांचे कौशल्य, शैक्षणिक दर्जा, उद्योगासाठी पुरेसे भांडवल, शेतजमिनीचा ताबा व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून त्यांचे सबलीकरण करता येईल. त्यांचबरोबर भारतीय समाजात प्राचीन कालखंडापासून अस्पृश्य जाती, महिला व धार्मिक अल्पसंख्यांक समुदायांना समान आर्थिक हक्क डावलण्यात आलेले दिसतात. म्हणून त्यांना आरक्षणासारख्या धोरणांचा आधार घेवून त्यांचे समावेशन करण्याचा प्रयत्न होतो. त्यावेळी एकसुत्रीपणा दिसून येत नाही.

**२) जाती व्यवस्थेचे स्वरूप आणि समावेशनाची प्रक्रिया :**

जाती व्यवस्था ही केवळ असमानतेच्या तत्त्वावर आधारीत नसून ती श्रेणीबद्ध स्वरूपाची असलेली दिसते. त्यामुळे प्रत्येक जाती समुदायांना मिळणाऱ्या अधिकाराचे स्वरूप वेगवेगळे दिसून येते. पर्यायाने वंचित समूहांच्या समावेशनाबाबतचे धोरण निश्चित करताना विशिष्ट जाती डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक परिस्थितीचा विचार करणे गरजेचे आहे. भारतातील सामाजिक वंचितता आणि तिचे स्वरूप भिन्न भिन्न असलेले दिसून येते. जात, धर्म, वंश, लिंग यासारख्या समूहांना विविध क्षेत्रात वंचित ठेवले जात होते. त्यांना त्यांच्या या वंचिततेवर मात करण्यासाठी व त्यांचे समावेशन करण्याचे धोरण आवश्यक ठरते.

भारतामध्ये हिंदू समाजव्यवस्थेचा विचार करता जाती रचनेमध्ये ''श्रेणीबद्ध असमानता'' दिसून येते. याच्या आधारेच अधिकाराचे स्वरूप निश्चित झालेले आहे. जाती रचनेमधील सर्वात खालच्या स्तरावर असणाऱ्या अस्पृश्य जातींना 'अधिक वंचित' ठेवलेले होते.

**३) सर्वसाधारण दारिद्र्य व्यक्तींच्यासाठीचे समावेशन :**

समावेशनाचे धोरण निश्चित करताना अशा घटकातील व्यक्तींना विचारात घेवून ते निश्चित करावे लगाते. कारण या घटकांची संख्या मोठी असल्याने अशाच स्वरूपाचे धोरण निश्चित करावे लागते.

**४) समान संधीचे धोरण आणि समावेशन :**

वरील प्रकारच्या समावेशन धोरणामुळे वंचित समूहांना न्याय मिळेलच असे नाही. त्यासाठी त्याला कायदेशीर संरक्षण देणे गरजेचे असते इतकेच नव्हे तर त्यांना आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात योग्य त्या प्रमाणात वाटा देणे गरजेचे असते.

**५) निर्णय प्रक्रियेत आणि प्रतिनिधीत्व माध्यमातून समावेशन :**

वंचित समूहांना निर्णय प्रकिया व प्रशासन पद्धती यामध्ये त्यांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. तसेच शासनाच्या सर्वच प्रक्रियेमध्ये अशा वंचित घटकांना सामावून घेणे व त्याचबरोबर तशा प्रकारचे निर्णय घेवून राबविणे आवश्यक आहे.

- **सारांश :**

सामाजिक वंचितता आणि सामाजिक समावेशन या दोन्ही संकल्पना नवीन असून त्यांचे अलिकडच्या कालखंडात महत्त्व वाढत आहे. कारण समाजातील वंचित समूह व त्यांच्या विकासासाठी समाजामार्फत प्रयत्न होताना दिसून येत आहे.

प्राचीन काळापासून सामाजिक वंचित समूहांना जात, धर्म, वंश, लिंग व प्रादेशिकता अशा निकषावर अनेक व्यक्ती समूहांना वंचित राहावे लागते.

त्याचप्रमाणे कोणत्याही मानवी समाजात वंचित समूहांना, वंचित म्हणून वागणूक मिळत असेल तर त्यांच्या संरक्षणासाठी घटनात्मक आणि धोरणात्मक उपायांच्या सहाय्याने त्याची प्रगती, समान वागणूक, आरक्षण, राजेगार संधी व व्यवसायासाठी भांडवल यासारख्या उपायाद्वारे त्यांचे समावेशन करता येणे शक्य आहे.

## फ) सामाजिक विकास व समाजकल्याण :

**प्रस्तावना :**

विकास ही एक सामाजिक प्रक्रिया असून तिचा संबंध आर्थिक पैलूशी असलेला दिसून येतो. आर्थिक वृद्धी व आर्थिक विकास या संकल्पना भिन्न भिन्न आहेत. आर्थिक वृद्धाची संकल्पना संख्यात्मक

आहे. तर विकास संकल्पनेत गुणात्मकतेवर भर दिला जातो. अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा भागविणे एवढाच विकासाचा दृष्टिकोन नसून देशात नवे उद्योग, कारखानदारी विकसित होणे व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादनाबाबत आमूलाग्र बदल होणे गरजेचे आहे. यातून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि व्यक्तींचे जीवनमान व राहणीमान सुधारु शकेल. विकासाचा विचार करताना एकूण राष्ट्रीय उत्पन्न व सर्व स्तरातील लोकांच्या राहणीमानात सातत्याने वाढ होणे हे आर्थिक विकासाचे गमक असून समाजातील सर्व सदस्यांना विकासाची समान संधी मिळणे हा विकासाचा आधार आहे. थोडक्यात त्या समाजाची सांस्कृतिक पार्श्वभूमी, ऐतिहासिक परंपरेइतकेच नव्हे तर त्या समाजाची मानसिकता हे घटक सुद्धा विकासासाठी महत्त्वाचे आहेत.

**व्याख्या :**

i) व्ही. एस्. डीसुझा यांच्या मते, ''सामाजिक विकास ही एक अशी प्रक्रिया आहे की, ज्यामुळे अपेक्षाकृत सरळ समाज एका विकसित समाजाच्या स्वरूपात परिवर्तीत होतो.''

ii) डॉ. एम्. एन्. गुप्ता यांच्यामते, ''सामाजिक विकास हा समाजाचा विकासोन्मुख परिवर्तन आहे. ज्याच्यामध्ये निश्चित उद्देशाच्या पुर्ततेसाठी नियंत्रित व जागृत प्रयत्न केले जातात.''

- **सामाजिक विकासाची वैशिष्ट्ये :**

i) सामाजिक विकासाचे स्वरूप सरळ सामाजिक व्यवस्थेतून जटील सामाजिक व्यवस्थेमध्ये परिवर्तित होते.

ii) सामाजिक गतीशिलतेमध्ये वाढ होते.

iii) धर्माच्या प्रभावातील ऱ्हास.

iv) परिवर्तन हे प्रगतीच्या दिशेने होते.

v) सामाजिक विकास हा एक सरळ दिशेने होतो.

vi) सामाजिक विकासाची प्रक्रिया ही सार्वभौमिक असते.

थोडक्यता विकसित आणि अविकसित राष्ट्रांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार विकासाचे प्रारूप वेगवेगळे असू शकते. कारण प्रत्येक समाजाच्या विकासाचा आरंभबिंदू वेगवेगळा असू शकतो. समाजाचा सामाजिक व सांस्कृतिक स्तर लक्षात घेवून आरंभबिंदू निश्चित केला जातो.

- **सामाजिक विकासाचे घटक :**

सामाजिक विकासाचा विचार करताना विकास घडवून आणणाऱ्या किंवा गतीमान करणाऱ्या घटकांचा विचार करणे आवश्यक आहे. मिरडल, हॉबहाऊस व ऑगबर्न यांनी विविध सामाजिक घटकांचा विचार केला आहे ते घटक खालीलप्रमाणे -

**१) सामंज्यस्य :**

समाजाचा सामाजिक विकास घडवून आणताना समाजातील विभिन्न भागामध्ये सामंजस्य असणे आवश्यक असते. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात विकासाचे धोरण आखताना सामाजिक न्याय व उत्पन्नाचे योग्य वितरण या मूल्यांची जाणिव ठेवली गेली. परंतु अंमलबजावणीत मात्र वरील तत्त्वांची फारकत झाली. थोडक्यात परस्पर सहकार्यानेच विकास साधला जातो ही भावना सर्वसामान्य जनतेच्या मनात रूजलीच नाही. त्यामुळे गेल्या ५० वर्षात सामंज्यस्याची भावना न रुजल्यामुळे विकासाची प्रगती अपेक्षित दिशेने झाली नाही.

**२) अविष्कार :**

विकासाच्या प्रक्रियेत विकसित अशा प्रगत राष्ट्रांचा आणि भारतासारख्या अतिप्राचीन अशा अप्रगत समाजाचा संपर्क आला. भारतीय स्पर्धेत टिकण्यासाठी भारतीय व्यक्तींचे साधनांचे आविष्कार केले. परिणामतः परंपरागत मूल्यव्यवस्थेमध्ये आमूलाग्र परिवर्तन झाले.

**३) प्रसार :**

सामाजिक विकासाची प्रक्रिया ही अविष्काराच्या प्रक्रियेवर अवलंबून आहे. समाजाची आर्थिक प्रगती औद्योगिकीकरणावर अवलंबून आहे. थोडक्यात प्रसारामुळेच सामाजिक संबधामध्ये वाढ होवून विकास घडून येतो.

**४) ज्ञान भांडार :**

परंपरागत ज्ञानाच्या संचयातूनच नवीन ज्ञानाचा व आविष्काराचा जन्म हाते. म्हणजेच ज्ञानभांडार समृद्ध असल्यावरच सामाजिक विकासात वाढ होत असते.

**५) औद्योगिकीकरण :**

औद्योगिकरण हा सामाजिक विकासाचा पाया आहे. औद्योगिकीकरणाशिवाय कोणत्याही समाजाचा विकास शक्य नाही. त्यामुळेच विकसनशील देशसुद्धा औद्योगिकीकरणाकडे लक्ष देतात. औद्योगिकीकरणारच्या प्रक्रियेला गतीशील करण्याचा प्रयत्न सर्वांनी करणे गरजेचे असते. जो कमी-अधिक प्रमाणात देशाच्या सामाजिक-आर्थिक जीवनाच्या प्रत्येक तत्वाला, प्रशासनाला व इतर देशांचा संबंधाना प्रभावित करतो.

**६) नागरीकरण :**

नागरीकरण हे सामाजिक विकासाचे महत्त्वपूर्ण अंग आहे. विभिन्न भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर व त्यांची सांस्कृतिक आदान-प्रदानता व त्यामुळे त्यांच्यात निर्माण होणारे सामाजिक संबंध हे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर त्यांच्या समस्या, त्यावरील उपाय आणि त्यांचे नियोजन या सर्वांचा परिणाम सामाजिक विकासात होतो.

**७) सामाजिक गतीशिलता :**

सामाजिक विकासासाठी सामाजिक गतीशिलतेमध्ये वाढ होणे आवश्यक आहे. तसेच व्यावसायिक गतीशिलतेमुळे सामाजिक विकासामध्ये वाढ होते.

## ८) शिक्षण :

कोणताही समाज विकासाच्या कोणत्या टप्प्यावर आहे हे तेथील लोकांच्या शैक्षणिक पात्रतेवरून स्पष्ट होते. थोडक्यात शिक्षण हे आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे सूचक आहे.

**सारांश :**

देशाच्या विकास प्रक्रियेचा आढावा घेताना डॉ. द. ना. धनागरे म्हणतात, ''शासनाच्या गंगाजळीतून कल्याणकारी योजनावर व दारिद्र्य निर्मूलनासाठी अमाप निधी खर्च होत असताना त्यांची फलश्रृती फारशी उत्साहवर्धक नाही.'' थोडक्यात सामाजिक विकास हा समाजाचा विकासोन्मुख परिवर्तन आहे. ज्यामध्ये निश्चित उद्देशाच्या पूर्ततेसाठी नियंत्रित व जागृत प्रयत्न केले जातात.

- **समाजकल्याण :**

**प्रस्तावना :**

समाजातील मागासलेल्या घटकांचा समाधानकारकरित्या योग्य स्तरापर्यंत व इतर समाजाच्या बरोबरीने विकास घडविण्यासाठी समाजकल्याण ही संकल्पना समाजकार्य सेवा या माध्यमातून कार्य करतात. समाजकल्याण संकल्पनेमध्ये समाजकार्याचा अंतर्भाव आहे.

व्यक्ती व गटाच्या जीवनात समाधान व आरोग्यपूर्ण स्थिती निर्माण होण्याकरीता, समाधानकारक जीवनस्तर व सुयोग्य आरोग्यस्तर निर्माण करण्याकरीता, व्यक्ती व गटांच्या क्षमतांचा परिपूर्ण, जास्तीत जास्त विकास करण्याकरीता आवश्यक असणारे व्यक्तीगत व सामाजिक सहसंबंध निर्माण करण्याकरीता, कुटुंब व समाजाचे व्यापक हित लक्षात घेऊन व्यक्तींचे कल्याण साधण्याकरीता समाजाची आवश्यकता असते, व्यक्ती व गटांना मदतीची आवश्यकता असते. ही मदत देणाऱ्या सामाजिक सेवांची व संस्थांची सुनियोजित रचना म्हणजे समाजकल्याण होय.

समाजकल्याणात अनेकांच्या शारीरिक, मानसिक, आर्थिक, आध्यात्मिक, भावनीक गरजांची काळजी घेतली जाते. यामध्ये वयोवृद्ध, अपंग, बालकांचा समावेश होतो. त्याच बरोबर कुटुंबाना सेवा, सामाजिक सुरक्षा, आहारसेवा, वैद्यकीय सेवा देणे इत्यादींचा समावेश होतो.

समाजातील सामाजिक, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या, मानसिकदृष्ट्या समस्या असणाऱ्या, वैयक्तिक व परंपरागत कारणांनी समुदायात उपलब्ध सेवांचा लाभ घेण्यास असमर्थ असणाऱ्यांच्या विशेष गरजांचे अध्ययन व विचार करून ज्या सेवा पुरविल्या जातात त्यांना समाजकल्याण सेवा असे म्हणतात.

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात समाजकल्याणाचा विचार मर्यादित स्वरूपात केला जात होता. परंतु संबंधिताने समाजातील मागासवर्गीय, शोषित व पिडीत लोकांच्या कल्याणाची जबाबदारी शासनाकडे सोपविली. यासाठी १९५३ साली केंद्रीय समाजकल्याण बोर्डाची (Central Social Welfare Board - SSWD) ची स्थापना करण्यात आली.

**विषय विवेचन :**

समाजकार्य व्यावसायिक ज्ञानाशी संबंधित असणाऱ्या विविध संकल्पनांचा या ठिकाणी आढावा घेण्यात येत आहे.

**१) समाजकल्याण व सामाजिक धोरण :**

काम करू इच्छिणाऱ्या सर्वांना काम करण्याची संधी मिळणे, कामाचा योग्य मोबदला व योग्य परिस्थिती उपलब्ध होणे, पुरेसे अन्न, वस्त्र, निवारा व आरोग्य सेवा मिळणे, अपघातापासून संरक्षण देणारी सामाजिक सुरक्षा योजना प्रदान करणे, मनोरंजनात्मक व सांस्कृतिक सेवा उपलब्ध करून देणे, युवकांची योग्य काळजी घेणे व त्यांना प्रशिक्षण देणे यासारख्या उद्दिष्टांची पुर्तता करण्याचे माध्यम म्हणून समाजकल्याणाकडे पाहिले जाते.

**२) समाजकल्याण व समाजसेवी संस्था :**

समाजाच्या समाजकल्याण विषयक सर्वच गरजा शासनाकडून पूर्ण होणे शक्य नाही. कारण गरजांचे प्रमाण फार मोठे आहे. यासाठी समाजकल्याण सेवा प्रभावीपणे देण्यासाठी समाजसेवी संस्था आपले योगदान प्रभावीपणे देत असतात. कारण या समाजसेवी संस्थांची रचना, उद्देश व प्रेरणाच तशी असते. अशा समाजसेवी संस्था राष्ट्र पातळीवर, राज्य पातळीवर व स्थानिक पातळीवर कार्य करत असतात.

- **समाजकल्याणाचे ठळक मुद्दे :**

  १) अपंग, समस्या ग्रस्तांचे संपूर्ण व सर्वार्थाने पुनर्वसन.

  २) उपचारात्मक, प्रतिबंधात्मक व निवारात्मक कार्य.

  ३) गरजू व अपंगांना शिक्षण, काळजीवाहू सेवा देणे.

  ४) विशेष व तंज्ञ सेवा पुरविणे.

- **समाजकल्याणाची व्याप्ती :**

समाजकल्याणात शिक्षण, स्वास्थ्य, निवास, खेळ, मनोरंजन, स्वयंरोजगार विषयक सेवा, आहार, अपंगकल्याण, महिलाकल्याण, पुनर्वसनात्मक सेवा, संरक्षणात्मक व प्रतिबंधात्मक सेवा, सामाजिक सुरक्षा सेवा, कल्याणकारी सेवा यामध्ये वेश्यावृत्ती, वेश्यांचे पुनर्वसन, असामाजिक जीवन असणाऱ्या सेवा, अनुसूचित जाती-जमातींना व समाजातील दुर्बल घटकांना, कुटुंबकल्याण सेवा, मुली व स्त्रियांना सेवा, युवकांना सेवा, कामगार कल्याण, ग्रामीण कल्याण इत्यादींचा अंतर्भाव होतो.

समाजिक सेवांचा दर्जा उंचावणे, सेवांचा विकास घडविणे, समाजसुधारणा सेवा देणे या सर्वांचा आधार, संविधान आहे. या आधारे योजना आखल्या जातात व कार्यक्रम तयार होतात. त्यात समाजकल्याण सेवांकरीता प्राधान्य दिलेले असते.

**सारांश :**

समाजकल्याण व्यक्तीची काळजी घेते, त्यांचे पुनर्वसन करते. आपला समुदाय, समाज, अर्थव्यवस्था, राजकारण सगळेच अभावग्रस्त आहेत. त्यांच्यात कुशलतेचा अभाव आहे ते अकार्यक्षम आहेत. यामध्ये सुधारणा करण्यासाठी हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. त्यामध्ये निमशासकीय अशासकीय संस्थांचा सहभाग घेणे महत्त्वाचे असते.

**२.३.२ समाजकार्याच्या प्राथमिक पद्धती :**

- **प्रस्तावना :**

समाजकार्य व्यवसायामध्ये सामाजिक परिस्थिती, सभोवतालचा परिसर, मानवी संबंध, कौटुंबिक वातावरण, प्रेम, वात्सल्य, दु:ख याबद्दल वस्तुनिष्ठपणा आणि समाजकार्य कर्त्यांची तर्कशुद्ध बुद्धी याला महत्त्वाचे स्थान आहे. साहजिकच या व्यवसायामध्ये व्यावसायिक समाजकार्यकर्त्याला मानवी जीवनाशी संबंधीत असलेल्या सामाजिकशास्त्राची ओळख असणे आवश्यक असते. प्रत्येक विषयासंबंधी कांही उपयुक्त भाग घेवून समाजकार्य ही उपयोजित समाजशास्त्राची नवीन शाखा निर्माण झाली आणि व्यवहारामध्ये प्रचलित झाली.

या सर्व सामाजिक शास्त्रातील विविध ज्ञानाचा योग्य ठिकाणी वापर करून व्यावहारिक व व्यावसायिक समाजकार्याची निर्मिती झाली आणि यामध्ये प्राथमिक व दुय्यम अशा पद्धती विकसित झाल्या त्या पुढीलप्रमाणे-

**अ) व्यक्ती सहाय्य कार्य :**

व्यक्ती समाजशील असल्याने समाजाशिवाय तिचे अस्तित्व नाही. म्हणूनच व्यक्ती समाजकार्याचा केंद्रबिंदू असते. व्यक्ती हा समाजाचा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. व्यक्तीमुळे समाज आहे. व्यक्ती समाजात राहताना अनेक प्रकारच्या भूमिका पार पाडत असते. ह्या भूमिका जोपर्यंत व्यक्ती सुव्यवस्थितपणे पार पाडते तोपर्यंत तिचे जीवन सुखी असते. परंतु जेव्हा अपेक्षेप्रमाणे भूमिका पार पाडल्या जात नाहीत तेंव्हा त्याचा परिणाम व्यक्तीच्या नाते संबंधावर होतो व यातूनच अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात. अशा समस्या सोडविण्यासाठी प्रत्येकजण एकमेकाला सहाय्य करत असतो. यालाच 'व्यक्ती सहाय्य' असे म्हणतात.

**व्याख्या :**

१) मेरी रिचमंड यांच्या मते, ''व्यक्ती आणि समाज यांच्या कल्याणासाठी विविध मार्गाचा अवलंब करून व्यक्तीच्या आणि समाजाच्या सहकार्याने केलेली कौशल्यपूर्ण कृती म्हणजे व्यक्ती सहाय्य कार्य होय.''

२) गाड्रान व हॅमिल्टन यांच्या मते ''व्यक्ती सहयोग कार्यात जाणीवपूर्वक समायोजन, व्यक्ती-व्यक्तीमधील संबंध, व्यक्ती व समाज यामधील संबंध, सामाजिक वातावरण, व्यक्तीमत्त्व विकास घडविणे या प्रक्रियांचा समावेश होतो.''

वरील व्याख्यांवरून हे स्पष्ट होते की, अडचणीत किंवा समस्याग्रस्त असलेल्या व्यक्तीमध्ये समस्यांवर मात करण्यासाठी त्यांच्यामध्ये प्रबळ इच्छाशक्ती निर्माण करण्याकरीता व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांनी हेतु पुरस्सर केलेले प्रयत्न म्हणजेच व्यक्तीसहयोग कार्य, हे वैयक्तिक पातळीवर केलेले समाजकार्य होय.

- **व्यक्तीसहाय्य कार्याची वैशिष्ट्ये :**

**१) सुप्त गुणांची ओळख :**

व्यक्तीसहाय्य कार्यामध्ये समस्याग्रस्त व्यक्ती कोणत्या समस्येने ग्रासली आहे याची ओळख करून घेतानाच संबंधीत व्यक्तीच्या अंगात कोणते सुप्त गुण आहेत हे पहाणे महत्त्वाचे असते. कारण ती व्यक्ती कोठे कमी पडते आणि ती कमतरता कशी भरून काढता येईल याचा विचार करणे गरजेचे असते.

**२) उपलब्ध साधनांचा परिचय :**

समस्याग्रस्त व्यक्तीकडे स्वत:च्या समस्या सोडविण्यासाठी कोणती साधने उपलब्ध आहेत आणि त्याचा वापर कशा पद्धतीने त्याला करून घेता येईल याबद्दल समाजकार्यकर्त्याने योग्य ते मार्गदर्शन करणे गरजेचे असते. साधनांचा वापर करण्यासाठी त्याला आवश्यक ती मदत करणे व त्याच्या आधारे व्यक्तीच्या समस्यांची तिव्रता कमी करणे हे व्यक्तीसहाय्य कार्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

**३) समायोजन करण्याची क्षमता :**

कोणत्याही समस्येचे मूळ व्यक्तीच्या वर्तनात सामावलेले आहे. व्यक्तीचे वर्तन प्राप्त परिस्थितीमध्ये सुसंबद्ध नसेल, तर कुटुंबामध्ये किंवा समाजामध्ये सामाजिक संबंध प्रस्थापित करताना कलह निर्माण होण्याची शक्यता असते. असे कलह दूर करून समस्याग्रस्त व्यक्तींच्या वर्तनात बदल घडवून आणण्याचे महत्त्वाचे कार्य व्यक्ती सहाय्य कार्यात केले जाते.

**४) व्यक्तीमत्त्वाचा विकास करून घेण्याची तयारी :**

व्यक्तीसहाय्य कार्यामध्ये समस्याग्रस्त व्यक्ती त्याच्या समस्येचे निदान व त्यावरील उपचार करून घेण्याच्या प्रक्रियेमध्ये त्याच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास करून घेत असते.

**५) बौद्धिक विकास :**

सामाजिक समस्येमुळे त्रस्त झालेली व्यक्ती जेव्हा समाज कार्यकर्त्याकडे येते तेव्हा समस्येमुळे त्याची वैचारिक क्षमता क्षीण झालेली असते. अशा अवस्थेत त्याच्यावर आलेल्या संकटाचा सामना करण्यासाठी त्याला मार्गदर्शन व सल्ल्याची गरज असते. आणि हे कार्य समाजकार्यकर्ता यशस्वीपणे पार पाडतो.

**६) आत्मनिर्भरता :**

सामाजिक समस्यांमुळे व्यक्ती अत्यंत त्रासलेली असते. त्यामुळे व्यक्तीचा आत्मविश्वास कमी होतो. व्यक्ती सहाय्य कार्यामुळे व्यक्तीच्या विचार प्रक्रियेला चालना देवून त्याची विचारप्रक्रिया अधिक प्रगल्भ करण्यासाठी समाज कार्यकर्ता प्रयत्नशील असतो. साहजिकच त्याला स्वत्वाची जाणीव निर्माण होवून योग्य ते निर्णय घेण्याची क्षमता वाढीस लागते आणि यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढतो.

## ब) गट कार्य :

**प्रस्तावना :**

प्राचीन कालखंडात दोन महायुद्धे झाली. या दोन महायुद्धामुळे समाजामध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक बदल झाले. पर्यायाने अनेक देश स्वतंत्र झाले. कित्येक देशामध्ये राजेशाहीचा अस्त झालेला दिसून येतो. तर कांही देशांनी लोकशाहीचा स्विकार केलेला दिसतो. यासाठी सर्वसामान्यांची मानसिकता बदलणे अतिशय गरजेचे आहे. आजही हे कार्य गटकार्याने व्यवस्थित पार पाडलेले दिसून येते.

प्रामुख्याने सर्व समस्यावर काळ हे प्रभावी माध्यम ठरते. औद्योगिकरणांच्या वाढीमुळे ग्रामीण समाजामध्ये मोठी स्थित्यंतरे घडून आली. ग्रामीण समाज मोठ्या प्रमाणात विस्थापित झाला यातूनच शहरी समाजामध्ये मोठ्या प्रमाणात झोपडपट्ट्या, गलिच्छ वस्त्यांची संख्या वाढू लागली, तर कांही लोक हे परदेशात स्थाईक होवू लागले.

उदा. - ज्यू लोकांनी पूर्वेकडून येणाऱ्या नवीन गरीब ज्यूना मदत करण्यासाठी एकत्र येवून कार्य करणे सुरू केले, समाजातील गरजू लोकांना मदत करणे, कामगारांच्या मुलांसाठी कल्याणकारी योजना राबविणे अशी कामे सुरू केलीत.

गटात व्यक्ती एकत्र येत असतात. त्यांचा सहसंबंध निर्मिण होत असतात आणि यातूनच त्यांच्यात देवाण-घेवाण होते व साद-प्रतिसाद वाढत जातात. थोडक्यात गट व व्यक्ती परस्परपूरक असतात, एकमेकांवर अवलंबून असतात. व्यक्तीच्या दृष्टीने गट महत्त्वाचा असतो. त्याच्या उपयोगाचा असतो म्हणून तो गटाचा सदस्य असतो. याचप्रमाणे सदस्य जेव्हा गटांच्या उपयोगाचा असतो तेव्हा गट सदस्याला स्विकारतो.

- **व्याख्या :**

**१) मॅक आयव्हर व पेज –** ''परस्परांशी सामाजिक संबंधानी बद्ध असलेल्या व्यक्तीच्या कोणत्याही समुच्चयाला गट म्हणता येंईल.''

**२) ऑगबर्न व निमकॉफ –** ''जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्र येतात व एकमेकांवर प्रभाव पाडतात, तेव्हा त्यांचा सामाजिक गट बनतो.''

वरील व्याख्यांच्या आधारे हे स्पष्ट हाते की, सामाजिक गटकार्यात कार्यकर्त्यांच्या मदतीने बदल, व्यक्तीमत्व विकास व प्रगतीसाठी गटाचा उपयोग करून घेता येतो.

- **गटकार्याचे उद्देश :**

१) व्यक्तीची प्रगती घडविणे.

२) व्यक्तीमधील क्षमतांचा विकास घडविणे.

३) जीवन जगण्याच्या मार्गातील अडथळा दूर करणे व तशी व्यक्ती गटात योग्यता निर्माण करणे.

४) व्यक्तीच्या गरजा गटाच्या माध्यमातून पूर्ण करणे.

५) व्यक्तीच्या गरजा व उपलब्ध साधने, इच्छा व त्यांची पुर्तता यात समन्वय साधने.

६) व्यक्तीच्या समस्या गटाच्या माध्यमातून सोडविणे.

७) संपूर्ण गटाचा विकास करणे.

८) समस्याग्रस्त व्यक्तीला मानसिक आधार देणे.

९) सुप्त गुणांची जाणीव निर्माण करून देणे.

- **गटकार्याची तत्त्वे :**

१) गटकार्याची निर्मिती उद्दिष्ठतापूर्ण असावी.

२) गटाला विशिष्ट योजना असावी.

३) गटकार्यकर्ता आणि गट यांचे संबंध उद्दिष्टपूर्ण असावेत.

४) गटात निराळेपणा असावा.

५) गटाची रचना लोकशाही पद्धतीवर असावी.

६) स्वयंनिर्णयाचे तत्त्व

७) गटाची कार्यात्मक रचना लवचिक असावी.

८) साधन उपयोगितेचे तत्त्व.

९) समाजकार्याचे मूल्यांचे तत्त्व

१०) मानवी गरजांचे तत्त्व.

- **गटकार्याचे घटक :**

समाजकार्यासाठी गटकार्य हे अतिशय महत्त्वाचे आहे. कारण जेव्हा व्यक्ती सहाय्य कार्याला मर्यादा पडतात तेव्हा गटकार्याच्या माध्यमातून सामाजिक समस्यांचे आकलन करणे सोपे पडते. गटकार्य करताना समंजस व्यक्तीच गटात असल्या पाहिजेत असे नाही तर व्यक्तीमत्त्व विकास, एखादा विषयाचे ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी किंवा नवीन कांही तरी करण्यासाठी गटकार्य करता येते. यासाठी खालील घटकांचा गटकार्यामध्ये अंतर्भाव होतो -

**१) गट किंवा व्यक्तीचा समूह :**

गटाची निर्मिती ही कांही उद्दिष्टांनुसार झालेली असते. अनेकवेळा गटकार्यामध्ये गटकार्यकर्ता हा उत्तम नेतृत्वगुण असलेला कार्यकर्ता असणे गरजेचे असते. कारण त्याशिवाय गटाचा विकास शक्य नसतो. गट

कार्यकर्ता हा गटाच्या विकासासाठी सतत प्रयत्नशील असतो. म्हणून यामध्ये गटकार्यकर्त्याची भूमिका अतिशय महत्त्वाची असते.

**२) संख्या :**

गटकार्य करण्याकरीता साधनांची जुळवाजुळव आणि प्रयत्नांची पराकाष्टा करणारा गटकार्यकर्ता महत्त्वाचा असतो. आणि त्याचबरोबर त्यांच्या जोडीला संघटनात्मक संस्थेचे पाठबळ असणे गरजेचे असते. यासाठी गटकार्यात सदस्य संख्या किती असावी हे महत्त्वाचे नसते. परंतु या गटातील सदस्य संख्येवर गटकार्यकर्त्यांचे नियंत्रण राहील इतकीच संख्या असावी.

**३) विशिष्ट उद्देश :**

गटाची निर्मिती ही विशिष्ट उद्देश साध्य करण्याकरीता झालेली असते आणि तो उद्देश गटकार्यकर्त्या व गट सदस्य यांच्यासमोर नेहमी असला पाहिजे. त्यामुळे गट सदस्य नेहमी कार्यरत राहतात व उद्दिष्ट साफल्यतेसाठी प्रयत्न करतात. थोडक्यात गटाच्या माध्यमातून संस्थेचा विकास साधला जातो.

- **मूल्यमापन :**

गटाचे मूल्यमापन कक्षरताना गटाचा विकास किती झाला, कशा पद्धतीने झाला, त्यासाठी किती कालावधी लागला याबाबी महत्त्वाच्या असतात. गट सदस्यांची स्थिती, गटाच्या कार्याचा प्रभाव, गटातील सदस्यांचा विकास यासारख्या बाबींचा विचार करणे महत्त्वाचे असते.

### २.३.३ समाजकार्याच्या दुय्यम बद्धती :

**अ) समुदाय संघटन :**

मानवाला जीवन जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत गरजांची पुर्तता करणे आवश्यक असते. अशा या मूलभूत गरजांची निकड लक्षात घेवून त्यांना आग्रक्रम देण्यात येतो. समुदायातील या गरजांच्या पुर्ततेसाठी उपलब्ध असणारी साधने शोधून त्यांचा वापर केला जातो. यासाठी समुदाय संघटन समुदायातच स्वत:च उपलब्ध असणाऱ्या अंतर्गत साधनांना शोधण्यास, साधनांचा उपयोग करण्यास समुदायाला मदत करतो. गरज वाटली तरच बाह्य साधनांची, मदतीची गरज भागविण्यासाठी संघटक उपयोग करतो.

समुदायातील उपलब्ध साधने आणि गरजा यांच्या आधारे समुदायाने स्वावलंबी होणे, समुदायात एकीची भावना, सहभागी, सहकार्याची भावना विकसित करण्याचे कार्य संघटक करत असतो. इतकेच नव्हे तर समुदायात जबाबदार नेतृत्व निर्माण करण्याचे कार्य समुदाय संघटनात होते. त्याचबरोबर समुदायातील गटांमध्ये व संस्थांमध्ये समन्वय साधण्यास कार्य समुदाय संघटनाकडून पार पाडले जाते.

समुदाय संघटन ही एक लोकशाही तत्त्वांवर आधारलेली प्रक्रिया असून समुदायातील कार्यक्रमात समुदायातील लोकांच्या सहभागाला अतिशय महत्त्व असते. अशा कार्यक्रमातून समुदायातील लोकांच्यामध्ये आपलेपणाची भावना, कार्यक्रमातून आपण कांही मिळवल्याची, कांही साध्य केल्याची, कार्यक्रम आपला

असल्याची भावना देत असतो.

- **व्याख्या :**

१) जे. के. जेकॉब यांच्या मते, ''एका विशिष्ट भौगोलिक विभागात राहणाऱ्या समूहाच्या समाजकल्याण गरजा आणि समाजकल्याणाची साधने यात समायोजन घडवून आणण्यासाठी समूह संघटन ही एक प्रकिया आहे.''

२) एम. जे. रॉस यांच्या मते, ''समुदाय संघटन ही एक अशी प्रक्रिया आहे की, तिच्यामुळे समुदायातील सदस्य व्यक्तीच्या रूपाने व समूहातील प्रतिनिधीच्या रूपाने एकदुसऱ्याशी संयुक्त होतात, आपला प्रयत्न निश्चित करतात आणि त्यांना पूर्ण करण्याची योजना आखतात व आवश्यक साधनांना गतीशिल करतात.''

वरील व्याख्यांच्या आधारे असे स्पष्ट होते की, समुदाय संघटन हे व्यक्तीच्या असणाऱ्या गरजा व उपलब्ध साधने यांच्या आधारे समुदायाचा व पर्यायाने मानवाचा विकास करणे होय. त्यासाठी योग्य अशा कार्यक्रमाची आखणी केली जाते.

- **समुदाय संघटनेचे स्वरूप :**

सामाजिक संघटन ही समाज कल्याणाची एक प्रक्रिया असून तिच्याद्वारे समाजकल्याणाच्या गरजा व साधने यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला जातो. समुदाय संघटनेचे स्वरूप समजून घेण्यासाठी खालील घटक महत्त्वाचे आहेत -

१) समाज संघटन का केले जाते.

२) समाज संघटन कोण करतात.

३) समाज संघटन कोठे केले जाते.

४) समाज संघटन केव्हा केले जाते.

५) समाज संघटन कसे केले जाते.

वरील मुद्यांच्या आधारे समुदाय संघटनेचे स्वरूप समजून घेणे सोपे जाईल. प्रामुख्याने समाज संघटन करत असताना कांही पद्धती वापरल्या जातात. तसेच समुदाय संघटनेमध्ये ज्या योजना राबविल्या जातात त्या सरकारी मदतीवर राबविण्यात येतात. त्याचबरोबर अनेक सेवाभावी संस्था या योजना समाजाच्या कल्याणासाठी राबवत असतात.

- **समुदाय संघटनेची तत्त्वे :**

सर्वच समुदायांनी आपल्या गरजा उपलब्ध साधनांच्या आधारे पूर्ण करावयाच्या असतात. त्याचबरोबर त्यांच्या असणाऱ्या समस्या सोडवणूकीचे उपायही त्यांनीच शोधावेत अशी अपेक्षा असते. त्यमाळे अशा

उद्देशांची पुर्तता करणे म्हणजेच ती त्या समुदाय संघटनांची तत्त्वे होत ती खालीलप्रमाणे –

i) **समुदायाला आवश्यक वाटणाऱ्या गरजा :**

समुदाय संघटनांची प्रक्रिया ही समुदायाला आवश्यक असणाऱ्या गरजांनी सुरू होते. या गरजांच्यामुळे अशा समुदायात असमाधान असेल तरच त्या लोकांना त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावा असे त्यांना वाटले पाहिजे. अशी परिस्थिती असेल तरच समुदायामध्ये परिवर्तन होणे शक्य होईल.

ii) **समुदायातील नेतृत्वाचा समावेश असावा :**

समुदायाचे संघयन करत असताना स्थानीक नेतृत्वाला या समुदाय संघटनांच्या प्रक्रियेत सामील करणे आवश्यक असते. त्यामुळे गरजांची किंवा प्रश्नांची उकल करताना समुदायातील विविध गटांचा त्याला पाठींबा मिळेल. पर्यायाने समुदाय परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करू शकेल.

iii) **सदस्यांची अभिरूची लक्षात घेणे :**

संघटनांच्या सदस्यांच्या व्यतिरिक्त समुदायाचे बरेच सदस्य असे असतात की, त्यांना संघटनेसाठी कांही तरी कार्य करावयाचे असते. परंतु ज्यांना यामध्ये सहभागी होणे जमत नाही. अशा सदस्यांच्या इच्छेला संघटनेच्या ध्येय धोरणात जागा ठेवणे गरजेचे असते. कारण हेच संघटनेचे भांडवल असते.

iv) **विविध गटांचे सहकार्य घेणे :**

समुदायातील विविध संघटना विविध उद्देशानी प्रेरित होऊन कार्य करत असतात. अशा सर्व संघटनांनी आपल्यातील समान घटक / उद्देशासाठी एकत्र येऊन एकमेकांना सहकार्य करणे व समुदायासाठी कल्याणकारी कार्य करणे.

v) **कार्य आणि समुदायातील योग्य अंतर :**

संघटनांच्या परिवर्तनाची दिशा व समुदायाचा कल हे एकसारखे असतीलच असे नाही. कारण दोन वेगवेगळ्या समुदायांच्या विचारामध्ये साम्य आढळतेच असे नाही. यावरूनच संघटनेने हे निश्चित केले पाहीजे की, आपल्या कार्याच्या मर्यादा निश्चित असाव्यात ज्यामुळे दोन समुदायामध्ये अंतर ठेवता येणे शक्य होईल.

vi) **प्रभावी नेतृत्वाचा विकास :**

समुदाय संघटनाच्या प्रक्रियेत समुदायाचा सहभाग हा नेतृत्वाच्या माध्यमातून अधिक असतो. पर्यायाने संघटनेतील सर्व सदस्यांनी प्रथम आपले नेतृत्व कस प्रभावी होईल हे पहाणे गरजेचे असते.

vii) **आत्मीयता व सहकारी दृष्टिकोन :**

समुदाय संघटनेच्या दृष्टिने समुदायातील आत्मीयता व सहकारी दृष्टीकोन आवश्यक असतो. यामुळे संघटनेला स्थैर्य प्राप्त होऊन आत्मीयता व सहकाराची भावना वाढीस लागेल.

- **समुदाय संघटनांची कार्यक्षेत्रे :**

समुदाय संघटन पद्धतीचा उपयोग विविध क्षेत्रात होतो. समुदायाच्या एकाच प्रकारच्या सामान्य गरजा आहेत. सामान्य सदस्या, समस्या उद्दिष्ट साध्य करावयाचे आहे. त्या त्या क्षेत्रात समुदाय संघटन पद्धतीचा उपयोग होतो.

| | | |
|---|---|---|
| १) कृषिक्षेत्र | २) वनक्षेत्र | ३) पर्यावरण क्षेत्र |
| ४) शिक्षण क्षेत्र | ५) स्वास्थ आरोग्य क्षेत्र | ६) सार्वजनिक बांधकाम क्षेत्र |
| ७) मनोरंजन क्षेत्र | ८) सामाजिक क्षेत्र | ९) धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्र |
| १०) राष्ट्रीय क्षेत्र | | |

- **समुदाय संघटनेच्या पद्धती व तंत्रे (साधने) :**

सर्वच समुदाय संघटनांचा, समुदायांचा सर्वांगीण विकास करून परिवर्तन घडवून आणणे हाच असतो. पर्यावरणाने समुदायाच्या गरजा भागून समस्या नष्ट होतील. यासाठी नियोजन व समुदायाचे एकत्रीकरण आवश्यक असते. यामुळे समस्यावर उपाय योजना व समुदायातील सदस्यामध्ये सहकार व आत्मीयतेची मानसिकता निर्माण होवू शकेल.

समुदायाचे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कांही पद्धती वापरल्या जातात त्या खालीलप्रमाणे –

i) **विशिष्ट विषयाची पद्धती :**

समुदायामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी वैयक्तिक व संघटनेद्वारे कांही कार्यक्रम राबविले जातात. तेव्हाच या पद्धतीचा वापर करणे योग्य ठरते. तरच संघटनेचे उद्दिष्ट साध्य करता येईल.

ii) **सर्वसाधारण विषय पद्धती :**

या पद्धतीमध्ये उद्दिष्ट्य निश्चित नसते. समुदायातील सदस्य हे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी समाजकल्याण योजना राबवित असतात. परंतु हे सदस्य कांही ठराविक क्षेत्रासाठीच या योजना राबवित असतात. कारण ते सदस्य त्या समुदायाच्या क्षेत्राचे सभासद असतात. पर्यायाने जी प्रगती किंवा विकास साधावयाचा असतो तो उपलब्ध साधन सामुग्रीच्या आधारावरच समुदायाच्या एकूण गरजा लक्षात घेऊन त्यांचे योग्य नियोजन करणे या पद्धतीमध्ये आवश्यक असते.

**ब) प्रक्रिया पद्धती :**

समुदाय सदस्यांच्या संदर्भात जी प्रक्रिया राबविली जाते ती समुदायातील नेतृत्वाने घेतलेल्या पुढाकारावरच अवलंबून असते. पर्यायाने या प्रकियेमध्ये समुदायातील सर्व सदस्यांचा सहभाग कसा असेल यावरच अवलंबून असते. कारण सदस्यांचा संबंध विषयाशी नसतो, समस्या सोडविण्याशी असतो.

● **सारांश :**

समुदाय संघटन ही सतत चालणारी प्रक्रिया असून विविध समुदायात विविध प्रकारची मानसिकता पहावयास मिळते. अशा विभिन्न विचारांच्या, आचारांच्या, भाषांच्या, धर्माच्या समुदायाचे संघटन करून त्यांच्या समस्यांचा विचार करणे हे समुदाय संघटनेचे प्रमुख कार्य असते.

**ब) समाज कल्याण प्रशासन :**

**प्रस्तावना :**

समाजकल्याण ही एक व्यापक संकल्पना असून या संकल्पनेमध्ये समाजाच्या विकासासाठी शासनाने किंवा संस्थेने समाज प्रबोधनासाठी केलेल्या प्रयत्नांचा समावेश होतो. स्वातंत्र्यपूर्व काळात समाजकल्याणाचे कार्य समाजातील जाणकार व्यक्ती, श्रीमंत व्यक्ती यांच्यामार्फत समाजकल्याणाचे कार्य केले जात होते. कालांतराने याची जागा समाजातील संस्थांनी घेतली. संस्था बरोबरच मंदिरे व चर्च यांच्याद्वारेही समाजकल्याणाचे उपक्रम राबविले जातात.

समाजातील दुर्बल, वंचित, अपंग, निराधार या घटकांना समाजकल्याणातील प्रमुख घटक मानले जातात. सामाजिक सुधारणा आणि वैचारिक सुधारणा व कल्याणकारी कार्यक्रमाची जागा विकास कार्यक्रमाने घेतली. पर्यायाने याची सर्व जबाबदारी शासनाने स्विकारली. यासाठी स्वतंत्र समाजकल्याण प्रशासन शासनाने उभे केले.

समाजकल्याण सेवांचे कार्य सुव्यवस्थित चालावे, त्यांच्या कार्यांच्या आदेशानुसार ज्या योजना, कार्यक्रम तयार केले जातात ते यशस्वी पार पाडता यावेत यासाठी समाजकार्य पद्धतीचा एक भाग म्हणून समाजकार्य क्षेत्रामध्ये प्रशासन कार्य महत्त्वाचे मानले जाते. सामाजिक योजना प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी प्रशासन कार्यरत असते.

**व्याख्या :**

जॉन किडनेह (Johne Kidneigh) यांच्या मते, सामाजिक योजनेचे सामाजिक सेवांमध्ये परावर्तीत करणे, योजनेनुसार सेवा देणे या उद्देशानी होणारी क्रमबद्ध प्रक्रिया म्हणजे समाजकल्याण प्रशासन होय.''

वरील व्याख्येनुसार समाजकल्याण प्रशासनात विशेष ज्ञानाची, मानवतावादी दृष्टिकोनाची आणि योग्य कर्मचारी वर्गाची निवड आणि कामाच्या विभाजनाची व सहकार्याच्या भावनेची गरज प्रशासनासाठी आवश्यक असते.

● **सामाजिक धोरण आणि समाजकल्याण :**

समाजकल्याण आणि सामाजिक धोरण यांचा जवळचा संबंध असलेला दिसून येतो. कारण शासन सामाजिक धोरण ठरविते. या धोरणानुसार समाजकल्याण सामाजिक योजनेनुसार विविध कार्यक्रमाचे आयोजन करून समाजाचा विकास करते. यासाठी शासकीय धोरणानुसार होणाऱ्या कार्यक्रमाच्या

अंमलबजावणीसाठी विशिष्ठ प्रकारची यंत्रणा निर्माण केलेली असते.

- **समाजकल्याण प्रशासनाची कार्ये :**

१) समाजकल्याणाची धोरणे आखणे

२) कार्यक्रमांचे आयोजन करणे.

३) आयोजित कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे.

४) कार्यक्रमांच्या परिणामांचे मूल्यमापन करणे.

५) आर्थिक साधनांची जुळवाजुळव करणे.

६) समाज व शासन यांच्यामध्ये संपर्क प्रस्थापित करणे.

- **समाजकल्याण प्रशासनाचे प्रकार :**

समाजकल्याण प्रशासनाचे प्रामुख्याने खालीलप्रमाणे दोन प्रकार पडतात –

i) **स्वयंसेवी संस्थामार्फत चालविलेले कार्यक्रम :**

या प्रकारामध्ये स्वयंसेवी संस्थेमधील व्यवस्थापन, त्यांची आर्थिक साधने, उपलब्ध असलेले मनुष्यबळ, त्यांचे योगदान व त्यांची यंत्रणा या सर्व बाबींचा समावेश होतो. स्वयंसेवी संस्थामधील प्रशासकीय यंत्रणा आणि कार्यक्रम राबविण्याची पद्धती यावर शासकीय समाजकल्याण यंत्रणा सातत्याने लक्ष ठेवत असते.

ii) **शासकीय यंत्रणेमार्फत चालविलेले कल्याणकारी कार्यक्रम :**

शासकीय पातळीवर समाजकल्याण संचालनालय किंवा आयुक्तालय, त्यामधील विविध विभाग, शासकीय संस्था, संस्थांच्या यंत्रणा व पाठबळ या सर्व घटकांचा विचार करणे गरजेचे असते.

- **मूल्यमापन :**

समाजकल्याण ही एक सर्वकष संकल्पना असून समाजातील कमकुवत व दुर्बल, निराधार किंवा समस्यांनी ग्रासलेल्या व्यक्ती आणि समाज हे सर्व समाजकल्याणासाठी उपयुक्त घटक आहेत. समाजकल्याण आणि सामाजिक व शासकीय धोरणे ही समाजाच्या विकासाच्या दृष्टीने ठरविली जातात व त्याची अंमलबजावणी केली जाते. त्याचप्रमाणे समाजकार्याला परिणामकारक व्यवस्थापन असणे अतिशय गरजेचे असते.

## २.३.४ (अ) समाजकार्य संशोधन :

सामाजिक संशोधन हे समाजाच्या कोणत्याही विषयाच्या संदर्भात असते. संशोधन ही एक सातत्याने चालणारी प्रक्रिया असून त्याशिवाय कोणत्याही प्रकारची प्रगती साधता येणे शक्य होत नाही. मानवाच्या रोजच्या जीवनातसुद्धा मानव संशोधनाचा वापर करून स्वत:ची प्रगती करत असतो.

संशोधनाचा विषय हा समाजातील गरजा व समस्या यावर आधारित असतो आणि या गरजा पूर्ण करण्यासाठी समाजकार्य पद्धतीचा वापर करण्यात येतो.

सामाजिक समस्यांची व्याप्ती, विस्तार व परिणाम याबद्दल शास्त्रीय पद्धतीने माहिती घेणे आवश्यक असते. थोडक्यात, संशोधनाच्या आधारे सामाजिक समस्येवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रभाव पाडणारे घटक याचा शोध घेणे अतिशय महत्त्वाचे असते.

**व्याख्या :**

i) वेबस्टर यांच्या मते, ''संशोधन म्हणजे तथ्ये किंवा तत्त्वे शोधून काढण्यासाठी करण्यात येणारे चिकित्सक परिक्षण होय.''

ii) भांडारकर यांया मते, ''नव्याने उजेडात आलेल्या तथ्यांच्या आधारे प्रस्थापित स्वीकृत निष्कर्ष व सिद्धांत पुन्हा तपासून पाहण्यासाठी सर्वकषरीतीने केलेले परिक्षण होय.''

वरील व्याख्यांच्या आधारे हे स्पष्ट होते की, संशोधन करताना अतिशय चिकित्सक पद्धतीने अनुभवाच्या आधारे करणे गरजेचे असते. संशोधाचा विषय हा समाजाच्या गरजा व समाजाचा विकास हाच असल्यामुळे संशोधकाचे संशोधन हे समाजकार्य संशोधन होते. समाजकार्याची ही एक पद्धत आहे.

सामाजिक संशोधनाच्या माध्यमातून समाजशास्त्रज्ञ, कार्यकर्ते, विचारवंत, राजकारणी व शासन सामाजिक नियोजन व सामाजिक सेवांना प्रभावित करत असतात.

- **समाजकार्य संशोधनाचा अर्थ :**

सामाजिक परिस्थितीची योग्य माहिती असणे व तिचे विश्लेषण योग्य पद्धतीने होणे हे समाजकार्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असते. त्यासाठी समाजकार्य संशोधन ही पद्धत अतिशय महत्त्वाची असते. समाजकार्य संशोधनात समाजकार्यात वापरल्या जाणाऱ्या मुलभूत संकल्पनांचा अभ्यास केला जातो.

''समाजकार्याच्या अभ्यास विषयावर निरीक्षण, प्रयोग व तत्त्वावर आधारलेली माहिती व तथ्ये एकत्र करून व्यक्ती, गट व समाज यांच्या प्रश्नांना उत्तरे शोधणे म्हणजे समाजकार्य संशोधन होय.

**व्याख्या :**

i) डब्ल्यू कॅटर यांच्या मते, ''सामजकल्याण क्षेत्रात त्यातील प्रश्नांवर पद्धतशीर व टिकात्मक संशोधन करणे यामुळे समाजातील समस्यांची उत्तरे सापडतील. समाजकार्याच्या उपलब्ध ज्ञानाची व त्यातील संकल्पनांची व्यापकता व उपयोगिता स्पष्टता होते.''

वरील व्याख्येच्या आधारे हे स्पष्ट होते की, संशोधन म्हणजे जुनी तथ्ये पुन्हा पडताळून पाहणे व नव्या तथ्यांचा शोध घेणे होय.

- **समाजकार्य संशोधनाचे उद्देश :**

१) समाजकार्याची व्याप्ती वाढविणे.

२) समाजकार्य संकल्पनांचा अभ्यास करून ज्ञानाची उभारणी करणे.

३) समाजकार्याचे ज्ञान व प्रत्यक्ष कार्य यातील संबध स्पष्ट करणे.

४) समाजकार्य उद्देशाचा पुन्हा विचार करणे.

५) व्यक्ती व समाज विघटनाच्या कारणांचे सखोल अध्ययन करून उपाय योजना सुचविणे.

६) समाजकार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये असणाऱ्या क्षमता जाणून घेणे.

७) समाजकार्य शिक्षणाच्या पायाचा अभ्यास करणे.

- **समाजकार्य संशोधनाचे महत्त्व :**

समाजकार्य हे गरजा व सेवार्थी यावर अवलंबून असते. म्हणजेच गरजूंच्या गरजांचे अध्ययन होणे महत्त्वाचे असते. समाजकार्यास सुरूवात करताना गरजूंची संख्या, अस्तित्वात असणाऱ्या संस्था, त्यांच्याद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा व लोकांची पुर्ण होणारी गरज यांचे योग्य ते नियोजन करणे शक्य होते.

संशोधनातून अस्तित्वात असणाऱ्या सेवांची परिणामकारकता जाणता येते व ज्ञानाच्या आधारे परिणामकारकता वाढविता येते. संशोधनातून समाजकार्याच्या तत्त्वज्ञानात व त्यांच्या पद्धतीत ज्ञानाची भर घालणे शक्य होते. संशोधनामुळे सध्याचे तत्त्वज्ञान, सिद्धांत व संकल्पना अधिक स्पष्ट होतात. संशोधनामुळे सेवार्थींचे अध्ययन करणे शक्य होते. त्याचबरोबर समाजकार्य संशोधन हा समाजकार्याचा महत्त्वाचा भाग असल्यामुळे समाजकार्याचा शास्त्रशुद्ध विकास होणे शक्य होईल. थोडक्यात, भारतीय परिस्थितीत भारतातील गरजांना अनुसरून समाजकार्याचा विकास व समाजकार्याच्या ज्ञानाचा विकास संशोधनामुळे शक्य होतो.

- **संशोधनाचे टप्पे :**

संशोधन करताना निवडलेल्या विषयानुसार आधारित उद्देश, उपकल्पनावर आधारित संशोधनानुसार प्रश्न वापरले जातात. उपकल्पनामध्ये दोन घटकातील परस्पर संबंध, परस्पर पूरक व परस्पर अवलंबित्व ही तपासून पाहिली जाते. संशोधनामध्ये घटकांचा किंवा चलांचा अभ्यास करण्यासाठी निर्देशकाची गरज असते. त्या निर्देशकांचा उपयोग करून घटकांचे मोजमाप करता येते. त्याचप्रमाणे घटकांचे अस्तित्व तपासून त्यांची कसोटी व परिक्षा करता येणे गरजेचे असते.

उपकल्पनात जेव्हा दोन घटक एकत्र येतात तेव्हा त्यांच्यात कारण, परिणाम व संबंध असतात हे सिद्ध केले जाते. अन्य घटक तेथे असण्याची शक्यता पूर्णपणे फेटाळली जाते. परंतु समाजशास्त्रीय विषयामध्ये व समाजकार्य संशोधनात एका घटकाला एकच व एका कारणाला एकच परिणाम असूच शकत नाही. थोडक्यात सामाजिक संकल्पनांमध्ये एकच घटक कारण व अन्य घटकांचा कांहीच संबध नाही असे घडत नाही.

संशोधनामध्ये संकल्पनांचे स्पष्टीकरण करून घटकांचे मापन, परिक्षण व सत्यता तपासणारे प्रश्न आणि उत्तरे तयार केली जातात. यामुळे अभ्यासाच्या तंत्रांची निर्मिती होते. तंत्राची अचूकरीतीने खात्री करण्यासाठी तंत्राची पुर्व चाचणी केली जाते.

थोडक्यात, मुलाखत, प्रश्नावली व निरीक्षण यांच्या आधारे प्राथमिक व दुय्यम माहिती एकत्र केली जाते. नमुना निवड पद्धतीतून माहिती संकलित केली जाते. मिळालेल्या माहितीचे योग्य ते विश्लेषण करून तिचा अन्वयार्थ लावला जातो. येथे सांख्यीकीय पद्धतीचा सुद्धा उपयोग करून घेतला जातो. यानंतर सामान्यीकरण केले जाते व मिळालेल्या माहितीतून निष्कर्ष व निदान अभ्यास विषयाला लागू होतात.

**(ब) सामाजिक क्रिया** (Social Action) :

**प्रस्तावना :**

सामाजिक क्रिया ही समाजकार्याची एक पद्धत असून सामुदायिकरित्या सर्वांच्या सहाय्याने समुदायातील समस्या सोडविण्यासाठी किंवा समाजाचा विकास करण्याकरीता केलेली कृती होय. गट, संस्था यांच्याकडून होणारे प्रयत्न, उत्स्फूर्त प्रतिसाद व मुद्दाम पुढाकार घेऊन तयार केलेले असतात. समाजामध्ये सामाजिक सुधारणा करण्याकरीता या पद्धतीचा वापर केला जातो. सामाजिक सुधारणा करण्यासाठी मोठ्या प्रमाणात समाज प्रबोधन करण्याची गरज असते.

समाजातील प्राप्त वस्तुस्थितीशी सामाजिक क्रियेशी जवळचा संबंध असतो. अपेक्षित कार्य न करणाऱ्या संस्था, शासकीय यंत्रणा यांच्या संबंधातही सामाजिक क्रिया होऊ शकते.

**व्याख्या :**

१) मेरी रिचमंड यांच्यामते, ''सामाजिक क्रिया म्हणजे मोठ्या समाजाचे, समाजातील लोकांची उन्नती करण्याचे, प्रपोगंडा व सामाजिक कायद्यांच्या माध्यमांतून होणारे कार्य होय.''

२) ब्रिट्टो यांच्यामते, ''समुदायापेक्षा मोठ्या भूभागावरील लोकांनी लोकांसाठी, लोकांकरीता, लोकांबरोबर केलेली कृती म्हणजे सामाजिक क्रिया होय.''

सामाजिक क्रियेत राजकीय सुधारणा, औद्योगिक, लोकशाही, सामाजिक कायदे कानून, सामाजिक न्याय, धार्मिक स्वातंत्र्य व नागरिकांचा अधिकार यांचा समावेश होतो. थोडक्यात समाजाचे व्यापक हित लक्षात घेवून आवश्यक हित व उद्दिष्ठांसाठी संघटित प्रयत्न करणे गरजेचे असते.

- **विषय विवेचन :**

**१) सामाजिक क्रियेसाठी आवश्यक घटक :**

i) समुदायात सक्रियता, चेतना, उत्साह असणे.

ii) लोकशाहीच्या मार्गाने काम करण्याची तयारी.

iii) लोकशाही नेतृत्व असणे.

iv) साधनांची जुळवाजुळव करणे.

v) समस्या व साधने यांच्यात समन्वय साधने.

vi) सहकार्याची भावना असणे.

vii) जनमत अनुकूल असणे.

**२) सामाजिक क्रिया – पद्धती – तंत्रे – माध्यमे :**

i) संशोधन.

ii) योजना आखणे व लोकमत तयार करणे.

iii) प्रमुख नेता, संस्था, मंडळ, गट यांच्या भेटी घेणे.

iv) सार्वजनिक सभा घेणे.

v) जनजागृती व सामाजिक शिक्षण.

vi) प्रचार व प्रसार करणे.

vii) चर्चा करणे.

viii) लोकांचा पाठींबा मिळवणे.

ix) विविध गट व संस्थांना एकत्र आणणे.

x) सामाजिक कायदे उपयोगात आणणे.

सामाजिक क्रिया ही व्यावसायिक समाजकार्याचे अभिन्न अंग आहे. सामजकार्याची ही सहाय्यकारी पद्धत आहे. या पद्धतीच्या आधारे समाजातील अनेक प्रश्न, समस्या व परिस्थिती आहे. की ज्यात बदल व बदलासाठी सामाजिक क्रिया व चळवळ उभी करण्याची आवश्यकता असते.

- **सामाजिक कृतीचे टप्पे :**

i) **संशोधन कृतीचे टप्पे :**

कोणतीही सामाजिक कृती करण्या अगोदर सामाजिक संशोधन होणे गरजेचे असते. कारण सामाजिक समस्येचे स्वरूप व व्याप्ती समजल्याशिवाय त्यांच्यावर उपाय शोधता येत नाही. पर्यायाने त्याच्यावर कोणती सामाजिक कृती करणे हे निश्चित होत नाही.

ii) **जनजागृती :**

प्राथमिक समस्येमुळे समाजावर होणारे सामाजिक परिणाम किती खोलवर जावू शकतात यासाठी जनजागृती करणे गरजेचे असते. थोडक्यात समाज जेवढा जागृत होईल तितक्या प्रमाणात सामाजिक क्रियेला यश मिळत असते.

iii) **समाज प्रबोधन :**

सामाजिक समस्येचे परिणाम समाजात जरी खोलवर रूजले असते तरी त्याची कल्पना समाजातील घटकांना असतेच असे नाही. म्हणूनच सर्वसामान्य जनतेला सामाजिक समस्येची जाणीव करून देण्यासाठी

समाज प्रबोधन करण्याची गरज असते.

iv) **शासन किंवा संस्थांकडे योग्य पत्रव्यवहार करणे :**

सामाजिक कृतीद्वारे समाजपरिवर्तन घडत असते. प्रचलित परिस्थितीला जबाबदार असणाऱ्या संस्था, संघटन व शासन यांना पुर्वसुचना देऊन जागृत करणे गरजेचे असते.

v) **लोकप्रतिनिधींशी चर्चा करणे :**

भारतातील सामाजिक धोरणे लोकप्रतिनिधी निश्चित करत असल्यामुळे शासकीय पातळीवर सामाजिक समस्येची दखल घेण्याकरीता लोकप्रतिनिधींना याची जाणीव करून देणे आवश्यक असते. त्यासाठी त्यांचे सहकार्य मिळविणे महत्त्वाचे असते.

## ड) समाज कार्यकर्ता आणि त्याची भूमिका (Social Worker and his role)

**प्रस्तावना :**

समाजकार्य व त्याच्या पद्धतीत कार्यकर्त्याची भूमिका महत्त्वाची व निर्णायक असते. कार्यकर्त्याच्या कामाच्या स्वरूपानुसार त्याच्या भूमिका वेगवेगळ्या नावानी ओळखल्या जातात. कार्यकर्त्याच्या भूमिका गरजेनुसार ठरतात किंवा गरजेनुसार निवडल्या जातात. भूमिका करताना ज्ञान, कौशल्ये, तंत्रे याचा तो वापर करतो. त्याचबरोबर भूमिका करताना व्यावसायिक विचार-भावना व दृष्टिकोन यांना महत्त्वाचे स्थान असते.

कार्यकर्ता हा सुधारणा घडवणारा, सेवार्थींचे जीवन सुलभ करणारा, विकास प्रक्रिया सुलभ करणारा घटक असतो. तो विविध भूमिका पार पाडताना संपर्काचा उपयोग करतो.

समाजकार्याच्या अर्थानुसार समाजकार्याकर्ता जी कार्ये करतो त्याचे तीन भाग होतात-

१) दुर्बल झालेल्या क्षमता पुन्हा परत मिळवून देणे.

२) व्यक्तीगत व सामाजिक साधनांची जुळवाजुळव करणे.

३) सामाजिक अकार्यक्षमतेची रोकधाम करणे.

या वरील तीन घटकांच्या आधारे समाजकार्यकर्ता आपली भूमिका पार पाडत असतो. यातूनच कार्यकर्त्यांच्या विविध भूमिकांची निर्मिती होत असते.

**१) कार्यकर्ता एक मदतकर्ता**

कार्यकर्त्याच्या भूमिकापैकी ही एक अतिशय महत्त्वाची व सर्वदूर अशी भूमिका आहे. मूलतःहा समाजकार्य ही एक मदत प्रक्रिया आहे. समाजकार्याच्या सर्व पद्धतीत कार्यकर्ता ही भूमिका पार पाडत असतो. मदत करणे, सेवा करणे, उपचार करणे, स्वावलंबी बनविणे, संघटन करणे, सक्रिय करणे अशी मदतीची अनेक रूपे दिसून येतात. मदत करणे हा कार्यकर्त्याचा हेतू असतो. तसाच तो दृष्टिकोन व हेतूही असू शकतो. अशी मदत उद्देश प्राप्त करण्याकरिता केली जाते. म्हणूनच कार्यकर्ता हा मदतकर्ता असतो. उपकारकर्ता नव्हे. कार्यकर्ता हा मदत कार्यात जीवंतपणा व चैतन्य आणत असतो. तसेच तो कल्याणाच्या उद्देशाने सल्ला व सेवा देणे, मार्गदर्शन करणे अशा स्वरूपाची मदतही तो करू शकतो. त्याचबरोबर मदत

करतांना तो कोणताही भेदभाव करत नाही. मदत करतांना तो फक्त समस्या सोडविण्यासाठी नव्हे तर जिव्हाळ्याने मार्गदर्शनही करत असतो. भले त्यावेळेस त्यांच्याकडून समस्या सुटणार नाही परंतु त्यामुळे त्याचे मनोधर्य उंचवू शकतो.

मदतकर्त्या कार्यकर्त्याचे मदतीबद्दलचे दृष्टिकोन व मदतीवर त्याचा असणारा विश्वास महत्त्वाचा असतो. प्रामुख्याने मदत करण्यामागील कार्यकर्त्याचा उद्देश स्पष्ट असणे गरजेचे असते. कारण त्याच्यावरच मदतीचे परिणाम अवलंबून असतात. इतकेच नव्हे तर मदत करणारा कार्यकर्ता हा मदत करण्यास सक्षम पाहिजे. त्याचबरोबर मदत करणारा कार्यकर्ता हा ज्याला मदत करतो तो जीवनाची स्वतःची लढाई लढण्यास सक्षम होण्याकरिता झाली पाहिजे.

प्रामुख्याने मदत करणारा कार्यकर्ता हा नेहमी उपलब्ध असावा अशी अपेक्षा असते. परंतु तो एक मानव असतो. पर्यायाने त्याना अतिकामामुळे थकवा, निराशा येणे शक्य असते. किंवा कामात तोचतोचपणामुळे त्याचा कामातील उत्साह किंवा कामात यांत्रिकपणा येण्याची शक्यता असते. पर्यायाने मदत करण्याची इच्छा व प्रेरणा कार्यकर्त्याची असली तर तो आपल्या भावनावर नियंत्रण ठेवून समस्या सोडवू शकतो. त्याचबरोबर कार्यकर्त्याने नेहमी आपल्या अंगी सेवार्थी भावना ठेवणे गरजेचे असते. पर्यायाने कार्यकर्ता अनुभवी असल्यामुळे तो सेवार्थीची परिस्थिती व त्याच्या भावना अचूकपणे जाणू शकतो.

**२) पारंपारीक मदतीपेक्षा जादा मदत**

कार्यकर्त्याने नेहमी मदतीच्या परंपरावादी, साचेबंदपण, कठीवादपद्धती यामध्ये अडकू नये. तर त्याने त्यापलिकडे जावून कार्यकर्ता मदत करत असतो. इतकेच नव्हेतर त्याने तीचतीच पद्धत न वापरता आपल्या कुशलतेने नवनवीन पद्धती व साधने याचा वापर तो करत असतो. कार्यकर्ता हा कोणत्याही मर्यादेत राहू शकत नाही. तसेच कार्यकर्त्याने आपल्या वैयक्तिक भावना, परंपरागत भावना यामध्ये अडकू नये कारण तो एक उत्कृष्ठ व्यावसायिक समाजकार्यकर्ता म्हणून त्यांची प्रगती थांबत असते.

व्यावसायिक कार्यकर्ता हा नेहमी सेवार्थीच्या भावनेने सहभागी होत असतो. पर्यायाने तो खरीखुरी मदत योग्यवेळी प्रदान करतो. मदत करणारा कार्यकर्ता हा नेहमी सेवार्थीचे तणाव, त्याच्या जबाबदाऱ्या तो त्याच्यावतीने स्वतःकडे घेत असतो.

**३) कार्यकर्ता हा बदल घडवणारा प्रतिनिधी असतो**

बदल घडविणे हा समाजकार्याचा उद्देश असतो हा बदल हितकारक, विकासाला पूरक असल्यामुळे तो योजनाबद्धरितीने होते समाजकार्यात अतिशय महत्त्वाचे असते. कार्यकर्त्याला बदल घडण्यास पोषक वातावरण तयार करावे लागते, प्रत्यक्ष बदल घडवावा लागतो व घडलेला बदल कायम टिकविणे आवश्यक असते यासाठी त्याने आपली मदतीची पद्धतशीरपणे आखणी करणे गरजेचे असते. त्यामुळे कार्यकर्ता हा नेहमी बदलाला चालना देतो. बदल हा चांगल्यासाठी आवश्यक असतो. जीवन समाधानी व्हावे, सुखमय व्हावे त्याचे समायोजन व्हावे यासाठी तो बदल करत असतो.

बदल घडणे व घडविणे ही स्वाभाविक प्रक्रिया असली तरी वर्तमानात बदल घडण्याची मागणी वाढते. त्यासाठीच कार्यकर्ताला व्यावसायिक मदतीची आवश्यकता वाटते. त्यावेळेस तो समुदायाची मागणी करतो.

समाजकार्यात बदल व्हावा, सुधारणा व्हावी यासाठी तो जाणीवपूर्वक बदल घडवत असतो. समाजकार्यात हा प्रतिनिधीशी म्हणजे तो व्यावसायिक समाजकार्यकर्ता असतो. पर्यायाने बदल घडवणारा कार्यकर्ता हाच मदतकर्ता असतो. म्हणूनच बदल घडवणारा कार्यकर्ता हा बदल घडण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका करतो. त्याचबरोबर बदल घडवण्याचा निर्णय, ज्याने बदल घडवायचा आहे त्यानेच घेणे महत्त्वाचे असते. कारण जर असे झाले नाही तर तो त्याच्या दुःखातून बाहेर न येता तो दुःखातच राहील.

### ४) प्रोत्साहकाची भूमिका

प्रोत्साहन हे क्षमता असणाऱ्या सेवार्थींना, समस्या कशी सोडवायची याचे ज्ञान असणाऱ्यांना, समस्या सोडवण्याची क्षमता असणाऱ्या व यासाठी मदतीची गरज असणाऱ्या सेवार्थींना देणे गरजेचे असते. यासाठी कार्यकर्ता ही भूमिका करताना तो विविध कौशल्ये व तंत्रे वापरत असतो. यासाठी कार्यकर्ता स्पष्टीकरण देणे, लक्ष केंद्रित करणे, माहिती देणे, आमनेसामने उभे राहणे या क्रिया करतो.

मदतीप्रमाणेच प्रोत्साहनाची सतत आवश्यकता भासत असते. यासाठी कार्यकर्ता कांही तंत्रे विकसित करतो. त्यामुळे बदल घडविण्याचा उद्देश प्रोत्साहनाच्या सहाय्याने कार्यकर्ता पूर्ण करतो. थोडक्यात कोणत्याही मार्गाने काम करणारा कार्यकर्ता हा प्रोत्साहकच असतो.

### ५) सुलभीकरणकर्ता कार्यकर्ता

कार्यकर्ता हा नेहमी आपली कार्ये सुलभ होवून बदल घडविणे व सेवार्थीच्या प्रयत्नांना बळ देणे सहज शक्य होईल अशी कार्ये करतो. ज्यामुळे विकासाचा मार्ग मोकळा होवून बदल घडविणे सोपे जाईल याची काळजी घेतो. थोडक्यात कार्यकर्ता हा वाटाड्याची भूमिका वटवत असतो. त्यामुळेच कार्यकर्ता सुलभीकरण करू शकतो. कारण त्याच्याजवळ अनुभव व ज्ञान असते त्यामुळे कार्यकर्ता योजनाबद्धरितीने काम करत असतो याचा फायदा तो सेवार्थीचे जीवन सुकर करण्याचे मार्ग शोधतो.

कार्यकर्ता हा नेहमी सेवार्थींना मदत करायचीच ह्या भावनेने प्रेरित असतो. सेवार्थीचे जीवन सुकर करण्याची त्यांची तळमळ असते त्यामुळे त्याच्या ठिकाणी प्रयोगशिलता असते व त्यातूनच तो सेवार्थींचे जीवन सुखमय करतो. सेवार्थींचा तणाव व त्याची असणारी अडचण कार्यकर्ता समजून घेवू शकतो. कारण त्याच्याजवळ अनुभव व ज्ञानाची शिदोरी असते यामुळेच कार्यकर्ता सुलभीकरण करतो.

### ६) सामर्थ्यदात्याची भूमिका

कार्यकर्ता सेवार्थीला जीवनाचा लढा यशस्वी लढण्यासाठी आपल्यातील शक्तींचा शोध घेण्यास मदत करतो व त्याचबरोबर उपलब्ध साधनांचा शोध घेण्यास मदत करतो तेव्हा क्षमतारूपी गुण, कला वैशिष्ट्येरूपी शक्तीकडे सेवार्थांचे लक्ष वेधतो. प्रत्येक व्यक्तीत अनेक शक्ती असतात. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने आपल्यातील शक्ती ओळखली पाहिजे. आणि त्याचबरोबर बाहेरच्या वातावरणातील शक्तीचा आधार घेवून येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी कार्यकर्त्याची भूमिका महत्त्वाची ठरते.

मानवाच्या क्षमतेवर विश्वास, स्वयंनिर्णयाचा आदर, विचार करणारा निवडकर्ता या अर्थाने सेवार्थीला स्वतःच्या पायावर स्वतःला उभे करतो व कायमस्वरूपी मदतीचा हात देण्याचा विश्वास कार्यकर्ता सेवार्थीला देत असतो. थोडक्यात गरजूला स्वसामर्थ्याची ओळख करून देणे या भूमिकेत केले जाणारे कार्य महत्त्वाचे

असते. सामर्थ्य देणारा कार्यकर्ता स्वतःतही सामर्थ्य निर्माण करतो कारण तो ते सामर्थ्य इतरांच्यामध्ये निर्माण करतो. यावरूनच समाजकार्यकर्त्याला ही भूमिका करणे किती अनिवार्य आहे हे स्पष्ट होते.

**७) शिक्षकाची भूमिका**

समस्या सोडविण्यासाठी माहिती पुरवितो, सेवार्थीला माहिती देणे, नमुना दाखविणे, ज्ञान देणे अशी कार्ये कार्यकर्त्याला करावी लागतात. ज्ञान हे सामर्थ्य असते. कार्यकर्ता हा ज्ञानाच्या आधारे लाभार्थ्याला ज्ञानी करतो. यामुळे सेवार्थी आत्मविश्वासाने परिपूर्ण व विचारी होतो. यातूनच त्याला नवनवे मार्ग सापडत असतात. आणि त्याच्यातील अक्षमता दूर करण्याचे कार्य कार्यकर्ता करत असतो. तसेच सेवार्थ्याला माहिती देणे, ज्ञान पुरवणे यासारखी कामेही त्याच्या भूमिकेशी निगडीत असतात. थोडक्यात सेवार्थीत असणाऱ्या क्षमतांना चालना देण्याचा प्रयत्न सामर्थ्यदाता करतो आणि त्याच्याजवळ असलेल्या क्षमतांमध्ये कार्यकर्ता भर घालतो.

**८) समाजकार्यकर्ता – एक उपचारकर्ता**

जेव्हा सेवार्थीला बरे करणाऱ्या मदतीची उपचार करणाऱ्या मदतीची गरज असते तेव्हा जी मदत कार्यकर्ता करतो तेव्हा ती उपचारकर्त्याच्या भूमिकेतून केलेली मदत असते. सेवार्थी स्वतः स्वतःला बरे करू शकत नाही, स्वतःची समस्या स्वतः सोडवू शकत नाही म्हणजेच त्याच्या क्षमतांवर मर्यादा असतात तेव्हा कार्यकर्ताला उपचारकत्याची भूमिका घ्यावी लागते.

अशा प्रकारची भूमिका करणारा कार्यकर्ता हा तज्ञ असतो. त्याला कोणती कौशल्ये निवडावी याची कुशलता माहित असते. विविध उपचार पद्धतीची माहिती कार्यकर्त्याला असते. काही वेळेस उपचार कार्यकर्ता हा मानसशास्त्रीय संकल्पनांचा मार्ग तो स्विकारतो.

**९) शोधकाची भूमिका**

यामध्ये कार्यकर्ता हा मदत कार्य करताना व वातावरणाच्या संदर्भात कार्य करताना शोधकाची भूमिका करतो. यामध्ये त्याची चिकाटी, धडपड करण्याची वृत्ती, शोधकाची वृद्धी इत्यादी बाबी त्याच्याजवळ असतात. उपलब्ध साधनांचा वापर तो कल्पकतेने करत असतो. साधने मिळविण्यासाठी कार्यकर्ता हा शोधक असतो. साधने ही अंतर्गत व बहिर्गत स्वरूपाची असतात. कार्यकर्त्याची साधनसूमिता उपयोगात येत असते. सेवार्थींची गरज पूर्ण करण्याची तळमळ आणि कळकळ असल्याने कार्यकर्ता साधनांपर्यंत पोहचतो व यशस्वी होतो.

**१०) कार्यकर्ता मित्र**

कार्यकर्ता व सेवार्थी हे दोघेही समान पातळीवरच असतात. यामध्ये कोणीही मोठा व लहान नसतो. कार्यकर्ता व सेवार्थी यांच्यातील नाते, दोघांची स्थिती व पातळी यामध्ये समानता असते. हे दोघेही एकमेकांचे सखा बनून राहत असतात. यांच्यामधील संबंध हे बरोबरीचे, मैत्रीचे असतात. कार्यकर्ता हा मैत्रीचे नाते निर्माण करतो. यामुळे दोघेही समाधानी असतात. पर्यायाने एकमेकांच्या सहवासाने दोघेही विकसित पावतात.

कार्यकर्ता व सेवार्थी हे जसे मित्र असतात तसेच त्यांच्यामध्ये मतभेद, विरोधही असू शकतात. परंतु

ते दोघेही त्याच्याकडे सन्मानाने पाहतात. परस्परांना समजून घेणे,ऊ परस्पर रूची, समानता, शिष्टाचाराचे पालन, योग्य वर्तन, सतत संपर्क, मैत्रीबद्दल दोघांना आनंद व समाधान इत्यादी प्रकारचे नातेसंबंध दोघांमध्ये पहावयास मिळतात.

थोडक्यात कार्यकर्ता व सेवार्थी यांच्यातील मैत्री ही व्यावसायिक उद्देशाने निर्माण झालेली असते. कार्यकर्ता हा सेवार्थी व गरजू असतो त्यामुळे त्यांची मैत्री सामाजिक नातेसंबंधातील नसून व्यावसायिक स्वरूपाची पहावयास मिळते. या संदर्भात भाटीया एम. एस. आपल्या ''ऑन वे टू फ्रेंडशिप'' या पुस्तकात वर्णन करतात की, मैत्रीतील दोन व्यक्ती परस्परांना पुरक असतात.

सेवार्थीला प्रेरणा देणे, आधार देणे व पाठिंबा देण्यासाठी कार्यकर्ता आपल्या मैत्रीचा वापर करत असतो. त्यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अहंभाव नसतो, मोठेपणा किंवा श्रेय घेण्याचा प्रयत्न यामध्ये कार्यकर्ता करत नाही. मैत्रीची सर्वात मोठी परीक्षा म्हणजे अडचणीच्या काही मित्राकडून मिळणारा आधार हाच असतो.

**११) सक्रियपणे कृती करणाऱ्याची भूमिका**

समस्या सोडविण्यासाठी आणि गरजा पूर्ण करण्यासाठी कार्यकर्ताने तशी कृती सेवार्थीला करण्यास मदत करणे ही समाजकार्यात आदर्श व अपेक्षित अशी बाब मानली जाते. त्यामुळे याठिकाणी कार्यकर्ता सक्रिय होवून जबाबदारी घेत असतो. तो सेवार्थीला मदत करण्याबरोबरच तो स्वतः प्रत्यक्ष कृतीही करत असतो. एखाद्या प्रश्नाचे गांभिर्य, त्याचे परिणाम हे सेवार्थीला किंवा समाजाला सांगावे लागतात. प्रसंगी त्याचा सारखा पाठपुरावा करण्याची गरज असते. अशा वेळेस सेवार्थीला व समाजाला कार्यकर्ता आक्रमकपणे त्याची बाजू मांडत असतो. थोडक्यात यामध्ये कार्यकर्ता हा बदल घडविण्यात निमित्त ठरत असतो.

**१२) मध्यस्थाची भूमिका**

कार्यकर्ता हा व्यक्ती, गट, समुदाय व संस्था यांच्यातील तणाव दूर करण्याचे कार्य करतो. त्यांच्यामध्ये समन्वय साधणे, त्यांच्यात एकमत तयार करणे, त्यांच्यातील संघर्ष कमी करणे, त्यांच्यात सामंजस्य राखून परस्पर संबंधातील हिताची जाणीव करून देणे, परस्परातील तणाव दूर करणे इत्यादी कार्ये जेव्हा कार्यकर्ता करतो तेंव्हा तो मध्यस्थ असतो.

**१३) दलालाची भूमिका**

सेवार्थीची उद्दिष्ट्ये, मार्ग व साधने निश्चित झाल्यानंतर कार्यकर्ता आपल्या ओळखी, वजन, आपले ज्ञान, यांचा योग्य तो उपयोग करून सेवार्थीला सहाय्य करतो. सेवार्थीच्या गरजेनुसार सेवा शोधण्याचे कार्य कार्यकर्ता करतो. ज्या हेतूने कार्यकर्ता व सेवार्थी यांच्यामध्ये नातेसंबंध प्रस्थापित झालेले असतात ते हेतू साध्य होतात. या प्रकारचे काम करतांना तो दलालाची भूमिका करत असतो. अशी भूमिका ही वकीलांच्या भूमिकेशी साधर्म्य असणारी असते.

थोडक्यात, ज्या सेवा अस्तित्वात आहेत त्याची माहिती सेवार्थीला नसते त्याची माहिती सेवार्थीला देताना कार्यकर्ता दलालाची भूमिका करतो. सेवार्थीची गरज सर्वोत्तमरितीने पूर्ण करणाऱ्या सेवांशी व

व्यवस्थेशी, सेवार्थीला जोडण्याचे काम कार्यकर्ता करतो. अशा सेवा गरजू सेवार्थ्यांपर्यंत पोहचवण्याचे कार्य एक दलाल/मध्यस्ती म्हणून कार्यकर्ता करतो.

**१४) दूभाष्याची भूमिका**

सेवार्थीच्यावतीने इतरांच्याबरोबर वकिलाची भूमिका पार पाडताना कार्यकर्ता दूभाष्याचीही भूमिका पार पाडतो. येथे सेवार्थीच्या वागण्याचे, अचूक व पूर्णज्ञान, सेवार्थीला समजून घेण्याची कार्यकर्त्याची पद्धत, त्याच्या गरजा यासंदर्भात कार्यकर्ता कार्य करतो.

सेवार्थीच्या वागण्याचा इतरांनी जो अर्थ लावलेला असतो व सेवार्थ्यांने इतरांच्या वागण्याचा लावलेला अर्थ या दोघांच्या वागण्याचे परिणाम दोघांना जाणवून देण्याचे काम कार्यकर्ता करतो.

**१५) कार्यकर्ता–एक नेता**

कार्यकर्ताजवळ असणारे ज्ञान, अनुभव व कुशलता यामुळे सेवार्थांना समान पातळीवर स्थान देत असतो. कार्यकर्ता हा व्यावसायिक स्थानाच्या सेवार्थ्यांना सेवा देण्यास वापर करतो. कार्यकर्त्यात नेतृत्व गुण असतात व तो सेवार्थ्यांमध्ये उतरविण्यात प्रयत्न करतो. यामुळे सेवार्थी स्वावलंबी होतील या दिशेने कार्यकर्ता प्रयत्न करतो. सेवार्थी स्वतःच स्वतःचे नेते होणे, स्वतःचे आयुष्य नियंत्रीत करणे, नेतृत्व गुणांची वृद्धी होणे यामुळे बाह्य नेतृत्वावर त्याला अवलंबून रहावे लागू नये याची सर्व तयारी कार्यकर्ता सेवार्थ्यांकडून करून घेतो.

थोडक्यात नेतृत्वाचे सर्व गुण प्रत्येक व्यक्तीत असतात किंवा निर्माण केले जातात. त्यासाठी कार्यकर्ता संधी निर्माण करत असतो. त्याचबरोबर असे नेतृत्व हे लोकशाही पद्धतीचे असावे याकडे कार्यकर्ता लक्ष देतो. नेतृत्व हे लोकशाही व हुकुमशाही अशा दोन प्रकारचे असते.

**सारांश :**

समासुधारणेसाठी सामाजिक क्रिया, आंदोलन व आंदोलनातून समाज सुधारणा व समाजाबद्दल, सुधारणेतून कायद्याची निर्मिती त्यामुळे समाजसुधारणा, सामाजिक आंदोलन व क्रिया अशा आवर्तनातून समाजाच्या समस्या दूर होतात व समाजाची परिस्थिती सुधारते म्हणूनच सामाजिक क्रिया ही समाजकार्याची पद्धत समाजसुधारणा चळवळीच्या कार्यक्षेत्रांना स्वत:त अंतभूर्त करून कायदे निर्मिती व अंमलबजावणीसाठीही पद्धतशीरपणे कार्य करते.

कार्यकर्ताकडे सेवा देताना अनेक भूमिका असतात. पर्यायाने कार्यकर्ता एकावेळी अनेक भूमिका पार पाडतो. अशा भूमिका परस्पर संबंधीत असतात. म्हणजे एक भूमिका करत असताना आपोआपच दुसरीही भूमिका पार पाडली जाते. कामाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळ्या अवस्थांमध्ये कार्यकर्ता गरजेप्रमाणे भूमिका स्विकारतो. अशावेळेस भूमिकांचा एकात्मिक दृष्टिकोनातून विचार करण्याची गरज असते. भूमिकाद्वारे मदत करताना कार्यकर्ता आपल्या ज्ञानाचा, विविध कुशलतांचा व क्षमतांचा उपयोग करून विशिष्ट कार्यपद्धतीचा अवलंब करतो. म्हणून ती विशिष्ट दृष्टिकोन नजरेसमोर ठेवून कार्य करत असतो.

## २.४ सरावासाठी प्रश्न.

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) पश्चिम जर्मनीत कशावर आधारित विमा योजना सुरू आहे.

२) सामाजिक सेवा या समाजातील सर्व घटकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सेवा आहेत असे कोणी स्पष्ट केले.

३) सर विल्यम ब्रेव्हिरीज यांनी सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने कधी मांडणी केली.

४) सामाजिक सुरक्षितता व्यक्तीला कोणत्या पद्धतीने आत्मविश्वास पूर्ण आपले आयुष्य जगण्यास मदत करतात.

५) मानवी अधिकार व संकल्पनेचा उदय कधी झाला.

६) मानवी हक्क संरक्षण कायदा कधी पास झाला.

७) मानव अधिकार आयोगाची स्थापना कधी झाली.

८) सामाजिकदृष्ट्या वंचित असणाऱ्या समूहाचा संबंध कशाशी येतो.

९) स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंडित नेहरू यांनी कोणत्या अर्थव्यवस्थेचा स्विकार केला.

१०) केंद्रिय समाजकल्याण बोर्डाची स्थापना कधी करण्यात आली.

११) कोणत्या घटकामुळे ग्रामीण समाजामध्ये स्थित्यंतरे घडून आली.

**ब) टिपा लिहा.**

१) समाजकल्याण.

२) सामाजिक सेवा.

३) सामाजिक सुरक्षितता.

४) सामाजिक वंचिततेची वैशिष्ट्ये.

५) मानवी अधिकार.

६) सामाजिक समावेशनाची प्रक्रिया.

७) सामाजिक विकासाचे घटक.

८) समाजकल्याण.

९) व्यक्ती सहाय्य कार्याची वैशिष्ट्ये.

१०) गटकार्याचे घटक.

११) समुदाय संघटनेची तत्त्वे.

१२) समाजकल्याण प्रशासनाचे प्रकार.

१३) समाजकार्य संशोधनाचे महत्त्व.

१४) सामाजिक क्रिया.

- **सरावासाठी प्रशंची उत्तरे.**

**अ)** १) वर्गणी.

२) फ्रिडलेन्डर

३) १९३५

४) संख्यात्मक व गुणात्मक

५) १९४५

६) १९९३

७) १९४८

८) दारिद्र्य व असमानता

९) समाजवादी

१०) १९५३

११) औद्योगिकरणामुळे

## २.५ संदर्भ ग्रंथ :


1) Arthur E. Fink : The field of Social Work, Holt Rinehart and Winston, New York.

2) Dasgupta Sujata : Towards a Philosophy of Social work in India, Popular Book Services for the Gandhian Institute of Studies.

3) Gangarde K. G. : Radha Publication, New Delhi.

4) Mathew Grace : An Introduction to Social Case Work, Tata Institute of Social Sciences, Bombay.

5) Toselano R. W. : An Introduction to Group Work Practice.

6) V. G. Mhetras : Understanding Social Case Work.

7) Gangard K. P. : Cummunity organization in India, Popular Prakashan, Bombay.

8) Goode W. J. and Hatt P. F. : Method of Social Research.

9) Aptekar H. H. : Basic Concepts in Social Case work, The University of Nath Curilona Press, Chhapilahi, 1941

१०) Periman H - Social case work a problem solving process, The University of Chicago, Press London, 2957.

११) Chaudhari D. P. - Introduction of Social Work, Atram and Jons, 1964.

१२) टांकसाळे डॉ. प्राजक्ता - समाजकार्यकर्ता (एक व्यावसायिक) श्री मंगेश प्रकाशन, नागपूर २००४.

❖ ❖ ❖

## घटक – ३

# समाजकार्याची क्षेत्रे : विविध घटकांतील उपयोजन

**(Fields of Social Work : Aplication in Various Setting)**

**घटक संरचना :**

३.१ उद्दिष्ट्ये

३.२ प्रास्ताविक

३.३ विषय विवेचन

- ३.३.१ कुटुंबासमवेत समाजकार्य – बालके, युवक, महिला व वृद्ध
- ३.३.२ मनोवैद्यकीय क्षेत्रातील समाजकार्य, शारीरिक, मानसिक आरोग्य आणि समुदाय आरोग्य
- ३.३.३ सुधारणा क्षेत्रातील समाजकार्य – प्रतिबंध व पुनर्वसन.
- ३.३.४ समुदायांसमवेत समाजकार्य – शहरी व ग्रामीण
- ३.३.५ विशेष गरजू व्यक्तींसमवेत समाजकार्य – मुख्य समूहांपेक्षा भिन्नत्व असणारे समूह.

३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न.

३.५ सारांश

३.६ पारिभाषिक संज्ञा

३.७ स्वयं अध्ययनांची उत्तरे

३.८ सरावासाठी प्रश्न.

३.८ अधिक वाचनासाठीची पुस्तके.

## ३.१ उद्दिष्ट्ये :

समाजकार्याच्या क्षेत्रांचा अभ्यासकरताना आपणास,

❖ समाजकार्याच्या विविध क्षेत्रांचा अभ्यास करता येईल.

❖ समाजकार्याच्या विविध पद्धती व तंत्राद्वारे विविध समाज घटकांसमवेतचे समाजकार्य, त्यांचे स्वरूप, अडथळे व आव्हानांचा अभ्यास करता येईल.

❖ या विविध क्षेत्रामध्ये समाजकार्याच्या विविध दृष्टीकोनातून (Approaches) त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी समाजकार्य कसे सहाय्यभूत ठरू शकते याचा सखोल अभ्यास आपणास करता येईल.

### ३:१ प्रस्तावना :

समाजकार्य हे एक उपयोजीत सामाजिक शास्त्र आहे. व्यक्ती, समूह व समुदाय यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन व पद्धतींद्वारे त्यांच्या जीवनातील समस्या दूर करून जीवन सुसह्य करण्याच्या कल्याणकारी हेतूने समाजकार्य हे व्यवसायीक कार्य म्हणून उदयास आले आहे.

मानव हा समाजशील प्राणी आहे. त्याला त्याचे आयुष्य समुदायासमवेत व्यतीत करावे लागते. व्यक्तीला त्याच्या गरजांची परिपूर्ती, समायोजनातील अडथळे, परस्परावलंबन, साधन सामुग्रीची अनुपलब्धता, वेगवेगळी सामाजिक नियमने, व्यक्तीगत तसेच सामाजिक जीवनातील ताणतणाव इ. अनेक कारणांमुळे व्यक्तीला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. या सर्व अडचणींमध्ये व्यक्तीला समायोजित होता आले नाही, तर तो समस्याग्रस्त होतो. अशा व्यक्तीसाठी आणीबाणीच्या वेळी समाजकार्य, व्यक्तीची समस्या व उपाय यामध्ये दुवा साधण्याचे कार्य करते. व्यक्तीला पर्यायाने समूह व समुदायाला त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी वैज्ञानिक पद्धती व तंत्राच्या साह्याने मदत करते.

समाजकार्याची व्याप्ती ही मानवी समाज व व्यक्तीला त्याच्या व्यक्तीगत व सामाजीक जीवनात निर्माण होणाऱ्या समस्या इतकी आहे. समाजकार्याच्या अभ्यासाच्या अनुषंगाने समाजकार्याची क्षेत्रे व त्यामध्ये विविध घटकांबरोबरचे समाजकार्य आता आपण अभ्यासू -

### ३.३ विषय विवेचन :

### ३.३.१ कुटुंबासोबतचे समाज कार्य :

'कुटुंबाची मूलभूत कार्ये लक्षात घेता कुटुंब हा समाज व्यवस्थेमधील एक महत्त्वाचा आणि पायाभूत घटक आहे. कुटुंबाचे कार्य सुरळीतपणे चालणे हे समाजाच्या विकासासाठी आणि गुणवत्तापूर्ण जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण मानवी जीवनाची सुरूवात, मानवाचे सामाजीकरण आणि त्याचे व्यक्तीमत्त्व घडण्यामध्ये कुटुंबाची कार्ये हा पायाभूत आणि सखोल परिणाम घडविणारा असतो. त्यामुळे समाजकार्याच्या अनेक क्षेत्रांपैकी 'कुटुंब' हे एक महत्त्वाचे व व्यापक क्षेत्र आहे. व्यक्ती सहकार्य व गटकार्य यांसारख्या समाजकार्याच्या पद्धतींचा वापर या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होतो. तर काहीवेळा सामाजिक संशोधन पद्धतीचा उपयोग कुटुंबासंबंधी कायदे, धोरणे, योजना व कार्यक्रम निश्चित करताना केला जातो.

सामाजिक बदलांचा सातत्याने कुटुंबावरही परिणाम होत असतो. कुटुंबातील सदस्यांच्या भूमिका शैक्षणिक दर्जा, जीवनपद्धती, आर्थिक स्तर, विचारसरणी यामध्ये सतत बदल होत असतानाच कौयुंबिक जीवनावर नकारात्मक परिणाम घडविणाऱ्या घटकांचेही प्रमाण वाढत आहे. उदा. व्यक्तीकेंद्री विचारसरणी, संवादाचा अभाव, मूलभूत गरजा भागविण्यासाठी किंवा नोकरी, शिक्षणासाठी होणारे स्थलांतर, प्रसार माध्यमांचा कौटुंबिक जीवनात झालेला शिरकाव, वाढती व्यसनाधीनता या सर्व गोष्टींमुळे कुटुंब व्यवस्थेचे कार्य बिघडते. त्यामुळे कुटुंबासोबत समाजकार्य करताना प्रामुख्याने खालील घटकांसोबतचे काम विचारता घ्यावे लागते.

**अ) लहान मुले / बालक :**

लहान बालके ही स्वत:च्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी व स्वयंविकासासाठी पूर्णपणे त्यांच्या सभोवतालावर अवलंबून असतात. तसेच बालकांच्या वाढत्या वयातील जीवनानुभव, त्यांच्या प्रौढावस्थेतील जीवनाची वाटचाल ठरविण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो. त्याुळे बालकांच्या मूलभूत गरजा भागविणे, त्यांना विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांना सभोवतालाशी समायोजन करण्यासाठी मदत करणे याकरिता समाज कार्याच्या पद्धती व तंत्राची मोठी मदत होते. बालकांसंबंधीचे समाजकार्य आपल्याला खालील मुद्यांवरून समजून घेता येऊ शकेल.

- **प्रतिबंधक व पुनर्वसन :**

१) अन्याय, निराधार व बालमजूरी करणाऱ्या मुलांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, शिक्षण देणे आणि त्यांचे भविष्य सकारात्मक वाटचालीकडे नेणे यासाठी सरकार व गैरसरकारी संस्था, बालगृहे काम करतात.

२) विधिसंघर्षग्रस्त पालकांची मुले, बालगुन्हेगार तसेच पिडीत बालके (उदा. देहविक्रीच्या व्यवसायात विकल्या गेलेल्या अल्पवयीन मुली, ज्यांचा स्वीकार व्यवसायात पालक करत नाहीत.) इ. मुलांसाठी कार्य करणाऱ्या, त्यांना संरक्षण, सुधारणा व विकास करण्याची संधी देणाऱ्या बालगृह, निरीक्षण गृहासारख्या सरकारी संस्था असतात. तर अशा मुलांसाठी वर्तनबदल, वर्तन सुधारणा करण्यासाठी समुपदेशन, प्रशिक्षण (थेरपी) व मनोवैज्ञानिक उपचार देणाऱ्या काही स्वयंसेवी संस्थाही असतात. अशा संस्थांमध्ये व्यावसायिक समाज कार्याची व समाजकार्याच्या पद्धती अवलंबिण्याची गरज असते.

३) पालकांमधील संघर्ष, मतभेद, दारिद्र्य आणि विकृती-समाजातील विकृत मनस्थितीला बळी पडलेल्या मुलांचे शास्त्रीय पद्धतीने पुनर्वसन व्हावे व त्यांच्यामध्ये कोणतीही वर्तन समस्या निर्माण होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक पद्धतीने सामाजिक कार्यकर्ता काम करत असतो.

४) जन्मत: प्रत्येक व्यक्ती स्वयंविकासाची प्रेरणा घेऊन जन्मते. पण काही बालके शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या इतकी सक्षम नसतात की, स्वत:चा विकास स्वत: करू शकतील. अशा विशेष बालकांना शासकीय दृष्टीकोनातून उपचारांची व मदतीची गरज असते. अशा विशेष मुलांच्या (उदा. मतिमंद, अपंग, मूक-बधीर इ.) शाळा व निवासी संस्थांमध्ये, तसेच अशा मुलांच्या पालकांचे समुपदेशन व मार्गदर्शन करण्यासाठी ही व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांची गरज असते.

५) काही बालके शारिरक व मानसिक दृष्ट्या सक्षम असली तरी, काही वर्तन समस्या त्यांच्यामध्ये निर्माण होऊ शकतात. त्या समस्यांचे वेळीच निदान व उपचार करणे आवश्यक असते. शाळा पातळीवरील प्रशिक्षित समुपदेशक व थेरपिस्ट यांसाठी बालकांसोबत काम करतात.

६) कुपोणाला बळी पडलेल्या बालकांना पोषक आहार पुरविण्यासाठी काम करणाऱ्या सरकारी यंत्रणेत म्हणजेच एकात्मिक बाल विकास प्रकल्पामध्येही व्यावसायिक समाज कार्यकर्त्याची गरज असते.

७) शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याकरीता त्यांचे समूपदेशन करणे व अडथळ्यांवर मात करणेसाठी विविध संस्थांची मदत घेणे.

**ब) महिलांसोबतचे कार्य :**

पितृसत्ताक भारतीय समाजात समाजाचा अर्धा भाग असणारा महिलांचा वर्ग, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या मागासलेला आहे. या मागासलेपणामुळे आणि दुय्यम सामाजिक स्थानामुळे आजही भारतीय समाजातील महिलांना अनेक प्रकारच्या समस्यांना, अन्यायाला तोंड द्यावे लागते. तसेच विकासाच्या अनेक संधीना मुकावे लागते. समाजातील या मोठ्या समूहाला स्वत:च्या हक्कांपासून, विकासाच्या संधीपासून दूर राहायला लागू नये व त्यासाठी तशा प्रकारची सामाजिक मानसिकता बनावी यासाठी भिन्न स्तरांवर व्यावसायिक समाजकार्याची गरज पडते. ती क्षेत्रे खालील प्रमाणे सांगता येतील -

१) पुरुषप्रधान मानसिकतेतून स्त्रियांवर अनेक प्रकारचे अन्याय, अत्याचार होतात. उदा. हुंडाबळी, कौटुंबिक हिंसा, लैंगिक शोषण,परित्यक्ता इ. अशा पिडीत निराधार महिलांना आधार देऊन त्यांना सामाजिक समायोजन करण्यासाठी सक्षम बनविण्याकरीता सरकारी व स्वयंसेवी आधारगृहे, मदत केंद्रे चालवली जातात. अशा संस्थांमध्ये समुपदेशन, मार्गदर्शन व प्रशिक्षण अशी विविध बाजूंची जबाबदारी व्यावसायिक समाज कार्यकर्ते पार पाडत असतात.

२) महिलांचा आर्थिक विकास झाल्याशिवाय त्यांच्या सबलीकरणाची प्रक्रिया वेगवान होणार नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे महिलांना आर्थिक प्रक्रियेत सक्रिय करण्यासाठी लघुवित्त चळवळ (मायक्रोफायनान्स), स्वयं सहायता गटांची चळवळ व महिलांमधील उद्योजकता विकसित करण्यासाठीचे अनेक प्रकल्प सरकारच्या विभागांकडून तसेच स्वयंसेवी संस्थांकडून राबविले जात आहेत. या संस्थांमध्येही संघटक, प्रशिक्षक, तज्ञ अशा विविध पदांवर व्यवसायीक सामाजिक कार्यकर्त्याला महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते.

३) स्त्रियांचे आरोग्य हा बऱ्याचदा दुर्लक्षित प्रश्न असतो. पण एक कुपोषित व अशक्त स्त्री सदृढ बाळाला जन्म देऊ शकत नाही. त्यामुळे स्त्रियांच्या आरोग्यासंदर्भात काम करणाऱ्या अनेक संस्था व्यावसायिक समाजकार्याच्या दृष्टीकोनातून चालविल्या जातात.

४) कुटुंबातील कलहांमध्ये, संघर्षामध्ये खूपदा समुपदेशनाची गरज असते. अन्यथा, कुटुंबाचे विभाजन होऊन त्याचे कार्य बिघडते व याचे दूरगामी परिणाम व्यक्ती व समाज दोघांवरही होतात. हा परिणाम रोखण्यासाठी कुटुंब सल्ला केंद्र, जिल्हास्तरावर व तालुका स्तरावर महिला समुपदेशन केंद्र तसेच पोलीस मुख्यालयातील महिला समुपदेशन व मार्गदर्शन केंद्र चालवताना सामाजिक कार्याच्या ज्ञानाचा व पद्धतींचा वापर केला जातो.

५) मानवी इतिहासात अनेक शतकांपासून देहविक्रीच्या व्यवसायाचे दाखले सापडतात. आजही हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो आणि यामध्ये स्त्रियांना अनिच्छेने राहावे लागते. त्यांच्या पुनर्वसनासाठी

वर आरोग्यासाठी काम करणे अत्यंत गरजेचे असते. अन्यथा अशा महिला लैंगिक मार्गाने होणाऱ्या अनेक भयंकर आजारांना बळी पडू शकतात. तसेच अशा महिलांची मुले या वातावरणापासून दूर राहावीत, त्यांना शिक्षण मिळावे यासाठीही प्रयत्न होणे गरजेचे असतात. त्यामुळे अशा समुहांसोबतही व्यावसायिक समाज कार्यकर्ते काम करतात.

**क) युवक :**

युवापिढी ही देशाचे भवितव्य मानली जाते. शिक्षित, सुदृढ, सक्षम आणि कौशल्यपूर्ण युवापिढी सतत नवनिर्मितीसाठी प्रयत्नशील असते. पण सामाजिक बदलाच्या प्रक्रियेशी जुळवून घेताना व समाजात स्वत:चे स्थान निर्माण करताना हे युवक अनेक प्रलोभनांकडे ओढले जातात व त्यातूनच व्यसनाधिनता, गुन्हेगारी, बेरोजगारी आणि नैराश्य अशा अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. त्यामळे युवकांसोबत विविध स्तरांवर काम करणे हे व्यावसायिक समाजकार्याचे नेहमीच उद्दिष्ट राहिले आहे.

१) बेरोजगारीचा प्रश्न भारतीय युवकांसमोरचा मोठा प्रश्न आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी युवकांमध्ये कौशल्यवृद्धी करून त्यांच्यामधील उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी शासन स्तरावर व खाजगी संस्थांकडूनही सातत्याने प्रयत्न केले जातात. अशा ठिकाणी व्यावसायिक समाजकार्यकर्त्याला प्रशासक, संघटक, मार्गदर्शक, समुपदेशक इ. अनेक भूमिका बजावाव्या लागतात.

२) प्रतिष्ठा, फॅशन व समवयीन मित्रांकडून आलेला दबाव या कारणांमुळे युवकांमधील व्यसनाधिनताही मोठ्या प्रमाणात वाढते आहे व व्यसनांमुळे या समूहाचे होणारे विचलन हे केवळ त्या व्यक्तीपुरतेच मर्यादित नसते. तर त्यांचे कुटुंब, समाज व देश या सर्वांच्या प्रगतीवर याचा परिणाम होतो. त्यामुळे अशा लोकांना त्यांच्या जीवनात सुधारणा करण्यासाठी मदत करणाऱ्या, त्यांचे पुनर्वसन करणाऱ्या मुक्तांगण व्यसन मुक्ती केंद्र यासारख्या संस्था काम करतात. त्यांचे कार्यही व्यावसायिक समाजकार्याच्या ज्ञान व पद्धतीवर आधारीत असते.

३) सध्याची जीवनशैली, करिअर मध्ये येणारे नैराश्य इ. कारणांमुळे युवा वर्गात आत्महत्या करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अशा युवकांना मदत करण्यासाठी समुपदेशन केंद्रे, हेल्पलाईन नंबर सुद्धा व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांकडून चालविली जातात.

४) युवा पिढी ही देशाचे भवितव्य मानत असताना त्यांच्यामध्ये देशाभिमान व कर्तव्यभावना रूजविणे गरजेचे असते. नेहरू युवा केंद्रासारख्या संस्था असे काम करतात. या कामातही व्यावसायिक समाजकार्याची मोठी मदत होते.

५) बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे विवाहसंस्थेचे स्वरूपही आज बदलत आहे. तसेच घटस्फोटांचे प्रमाणही वाढत आहे. यामध्ये आताच्या युवांबरोबर लहान मुलांचे सुद्धा भवितव्य धोक्यात येते व त्याचे दुरगामी परिणाम त्या सर्व व्यक्तींवर होतात. त्यामुळे सध्या युवावर्गाला विवाहापूर्वीचे समुपदेशन करणे ही गरज निर्माण झाली आहे. तसेच विवाहानंतरही समायोजनात अडचणी निर्माण झाल्या तर विवाहानंतरचे

समुपदेशनही तितकेच महत्त्वाचे असते. ही गरज ओळखून विवाहासंबंधी मार्गदर्शन करण्यातही सामाजिक कार्यकर्ते योगदान देत असतात.

**ड) वृध्द :** वाढत्या शहरीकरण नोकरी आणि शिक्षणामुळे होणाऱ्या स्थलांतरामुळे कुटुंबाचे स्वरूप आज मोठ्या प्रमाणात बदलले आहे. विभक्त कुटुंबे अजून छोटी होताहेत. अशा समाजात वृध्दांची एक वेगळी समस्या निर्माण होत आहे. बऱ्याचदा मुलांची इच्छा असली तरी नोकरीमुळे ते घरी राहू शकत नाहीत किंवा काहीवेळेला वृध्दांची जबाबदारी न घेता त्यांना निराधार सोडल्याची प्रकृतीही काही समाजघटकांत वाढते आहे. त्यामुळे व्यावसायिक समाज कार्य वृद्धांचा समूहासोबत खालील पद्धतीने काम करताना दिसतात.

**१) वृद्धाश्रम :** वृद्धांसाठी अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजाबरोबरच त्यांची मानसिक व भावनिक गरज भागविण्याच्या दृष्टीने आज वृध्दाश्रम ही गरज बनते आहे. येथेही संवेदनशीलता, उत्तम समुपदेशन कौशल्ये असलेले व्यवसायीक समाज कार्यकर्ते काम करतात.

**२) डे केअर सेंटर :** नोकरीनिमित्त घराबाहेर राहणाऱ्या कुटुंबातील सदस्यांना, कुटुंबातील आजारी वृद्धांची काळजी घेण्यासाठी मदत हवी असते. आज मोठ्या शहरांमध्ये अशाप्रकारचे डे केअर सेंटर काम करतात, तिथे वृद्ध दाखल होऊ शकतात किंवा एखादी प्रशिक्षित व्यक्ती वृद्धांच्या सेवेसाठी पुरविली जाऊ शकते.

**३) वृद्धांशी संबंधित अभ्यासक्रम** (Gerentology) : सध्याच्या समाजाची ही गरज ओळखून काही व्यवसायीक समाज कार्याचे शिक्षण देणाऱ्या संस्थांनी जेरेटॉलॉजी हा वेगळा अभ्यासक्रमही सुरू केला आहे. ज्यामुळे वृद्धांच्या गरजा, त्यांची मानसिकता या सर्वांचा शास्त्रोक्त अभ्यास करून त्यांच्या सोबत काम करण्यासाठी प्रशिक्षित व्यक्ती तयार होऊ शकतील.

### ३.३.२ मनोवैज्ञानिक क्षेत्रातील समाजकार्य :

सामाजिक आणि राष्ट्रीय प्रगतीच्या निदर्शनामध्ये आरोग्य हा एक अंगभूत घटक मानला जातो. तसेच आरोग्याची स्थिती ही देशातील मनुष्यबळाच्या गुणवत्तेवर आणि पर्यायाने उत्पादन क्षमतेवर दूरगामी परिणामही करीत असते. त्यामुळे आरोग्य हीच खरी संपत्ती मानून त्याची जपणूक करण्यासाठी सर्वसमावेशक प्रयत्न होणे अत्यावश्यक आहे. पण भारतासाारख्या सांस्कृतिक, भौगोलिक विविधता आणि आर्थिक व सामाजिक विषमता असलेल्या देशांत 'आरोग्य' बऱ्याचदा दुर्लक्षित राहते. त्यामुळे शासनव्यवस्थे बरोबरच स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांनीही यासाठी प्रयत्नशील असायला हवे. आरोग्याच्या क्षेत्रात खालील पद्धतीने व्यवसायकि सामाजिक कार्यकर्ते काम करत असतात.

अ) दवाखान्यांमध्ये साधारणपणे सर्व सरकारी दवाखान्यांमध्ये व बऱ्याच खाजगी दवाखान्यांमध्येही सर्वसामान्य जनतेला माहिती सांगणे, सल्ला देणे, आरोग्य संबंधी योजनांचा लाभ घेण्यास मदत करणे व प्रसंगी खर्चिक उपचारांसाठी निधी जमवणे व त्याचा लाभ गरजूंना देणे यासाठी वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते काम करतात.

**ब) समुपदेशन केंद्र / थेरपी केंद्र :**

आजकाल मानसिक आरोग्याबद्दल थोडीशी जागृती निर्माण होत आहे. पण वाढत्या स्पर्धेमुळे धकाधकीच्या जीवनपद्धतीमुळे मानसिक विकार असणाऱ्या व्यक्तींच्या संख्येतही वाढ होत आहे. अशा व्यक्तींचे सामाजिक अस्तित्व टिकून राहण्यासाठी आणि त्यांची कर्तव्ये सुरळीत पार पाडण्यासाठी शासकीय मदतीची गरज असते. समुपदेशन, विविध कृती उपक्रम आणि थेरपींच्या साहाय्याने या बहुतांश आजारांवर मात करता येते. त्यासाठी मानसोपचारासंबंधी शास्त्रशुद्ध ज्ञान घेतलेले व्यावसायिक सामाजिक कार्यकर्ते काम करत असतात.

**क) समुदायांमध्ये आरोग्यासंबंधी काम :**

आरोग्य सेवांची उपलब्धता ही आरोग्याच्या क्षेत्रातील एक बाजू आहे. तर आरोग्याच्या समस्या व प्रश्नांबद्दलची जाणीव जागृती ही दुसरी बाजू आहे. यासंदर्भात विचार केल्यास भारतासारख्या प्रचंड मोठी लोकसंख्या असलेल्या देशात सरकारी यंत्रणेवर ताण पडतो.

यामुळे आरोग्याच्या अनुषंगाने स्वच्छ पाणी पुरवठा व सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन यासारखे मुद्दे लोकसहभागातून सोडविता येतात. यासाठी समुदाय संघटन पद्धती प्रभावी ठरते.

**३.३.३ सुधारणा क्षेत्रातील प्रतिबंधात्मक व पुनर्वसनात्मक समाजकार्य :**

व्यक्तीच्या वर्तन नियंत्रणासाठी अनेक सामाजीक संस्थांकडून शिक्षण, समाज त्यांचे कार्य करीत असतात. पण सामाजीकरणातील अडथळ्यांमुळे अथवा सामाजिक विचलनाच्या मानवी प्रवृत्तींमुळे सामाजिक नियमांचे उल्लंघन काही समाज सदस्यांकडून होतच असते. अशा व्यक्ती समाजामध्ये राहिल्यामुळे सामाजिक विचलनाचे प्रमाण अनेक व्यक्तींमध्ये वाढून समाजव्यवस्थेला धोका पोहचू नये याकरीता कायद्याद्वारे राज्य काही उपाय योजना करीत असते. त्याचा मुळ हेतू 'सुधारणा' हाच असतो. सामाजीकरणामध्ये राहिलेले अंतर (गॅप) भरून काढणे व व्यक्तीला पुन्हा त्याच्या अपेक्षित कार्यासह समाजात स्थापित करणे हा यामागचा उद्देश असतो. पण सामाजिक विचलनाच्या प्रवृत्तीमुळे व्यक्तीवर कलंकीत असल्याचा शिक्का मारला जातो. त्यामुळे त्याचे भविष्यकालीन समायोजनही धोक्यात येते.

समाजकार्य हे व्यक्तीला कदापी कलंकीत मानत नाही. तर निर्माण झालेली परिस्थिती व्यक्तीला सामाजीक विचलन करण्यास भाग पाडते हे समाजकार्याचे महत्त्वाचे तत्त्व आहे. त्याअनुषंगाने व्यक्तीकडून भविष्यात असे वर्तन घडू नये व त्याचे पुनर्वसन व्हावे म्हणून प्रतिबंधात्मक पुनर्वसनात्मक पोच मार्गाचा अवलंब करून सुधारणा क्षेत्रात समाजकार्य वेगाने विकसित होऊन व्यक्तीच्या सामाजीक समायोजनात उपयुक्त ठरत आहे. ती क्षेत्रे खालीलप्रमाणे -

**अ) बालनिरीक्षणगृह :**

समायोजनातील अडथळ्यांमुळे समाजातील प्रचलित नियमांच्या विरुद्ध बालवयात (० ते १८ वर्षे) व्यक्तीकडून वर्तन घडल्यास त्याला बाल निरीक्षण गृहामध्ये ठेवण्यात येते. अशा मुलांना गुन्हेगार न संबोधता

त्याला 'विधी संघर्षग्रस्त बालक' असे संबोधण्यात येते. बालनिरीक्षण गृहामधील अशा बालकांच्या सामाजीकरणातील अडथळ्यांमध्ये अंतर सांधण्यासाठी समुपदेशन व मनोवैज्ञानिक पद्धतीने उपचार केले जातात.

**ब) तुरुंग गृह (सुधारगृह) :**

प्रौढ व्यक्तीच्या विचलित वर्तनाची त्याला जाणीव व्हावी व त्याच्या वर्तनाचा इतर समाज सदस्यांवर विपरीत परिणाम होऊ नये या दुहेरी हेतूने विचलन झालेल्या व्यक्तीला मूळ समूहापासून अलग केले जाते व त्याच्या वर्तनावर मर्यादा घातली जाते. तुरुंग गृहामध्ये ही प्राणायाम, योग तसेच श्रमसाधना, समुपदेशन, सामाजिक जीवन व त्याचे महत्त्व पटवणाऱ्या अनेक पद्धती याद्वारे त्याचे पुन्हा सामाजीकरण केले जाते.

**क) शाळा महाविद्यालये :**

व्यक्तीच्या जीवनविकासातील पौगंडावस्था हा कालखंड त्याच्या व्यक्तीमत्त्वाच्य जडण घडणीतील अत्यंत महत्त्वाचा कालखंड मानला जातो. या कालात अनेक शारीरिक व मानसिक बदलांना त्याला सामोरे जावे लागते. याच काळात सामाजीक नियमने, बंधने व वर्तन मर्यादा तसेच त्याचे उल्लंघन केल्यास होऊ शकणारे शासन याची जाणीव त्याला होते. त्यामुळे पौगंडावस्थेमध्ये त्याला योग्य समूपदेशन करून होणाऱ्या शारीरिक-मानसिक बदलांना नैसर्गिकपणे स्विकारण्याची मानसिकता तयार करणे तसेच अभिरूची करीअर व्यवस्थापन इ. कार्ये शाळा व महाविद्यालयीन समुपदेशनातून होत असते. अनेक शाळा महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षित सामाजीक कार्यकर्त्यांद्वारे असे समुपदेशन केले जाते.

**ड) व्यसनमुक्ती केंद्रे :**

मादक पदार्थांच्या सेवनामुळे व्यक्तीचे सामाजीक, आर्थिक, शारीरिक व मानसिक नुकसान होत असते. त्यामुळे तो समाज व्यवस्थेतील त्याचे कार्य पार पाडू शकत नाही. योग्य उपचार व समुपदेशनामुळे अशा समस्याग्रस्त व्यक्तीने व्यसनांच्या विळख्यातून सोडवता येते. अनेक सामाजीक संस्था अशी व्यसनमुक्ती केंद्रे चालवितात. वैज्ञानिक पद्धतीद्वारे उपचार करून व्यक्तीला समाजामध्ये पुर्नस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो.

**इ) महिला समुपदेशन केंद्रे :**

समाजातील महिलांच्या निम्न दर्जामुळे व कौटुंबिक कलहामुळे पिडीत महिलांना समुपदेशन व आधारकेंद्रे जिल्हास्तरावर उफलब्ध असतात. तसेच या केंद्रामध्ये गरजा पडल्यास अशा महिलांना विधी तज्ञांची मोफत मदत दिली जाते. कौटुंबिक कलहांमध्ये शक्य असल्यास दोन्ही पक्षांना समूपदेशन करून तडजोड केली जाते व कौटुंबिक विघटन टाळण्याचा कसोशीने प्रयत्न केला जातो. त्याच बरोबर तडजोडीमुळे मानवी हक्कांची पायमल्लीही होऊ नये याची काळजी घेतली जाते. स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने सरकारी यंत्रणा अशी मदत केंद्रे चालवितात.

**ई) हेल्पलाईनस् :**

आधुनिक जीवनशैलीमुळे व समायोजनातील अडथळ्यांमुळे अनेकदा व्यक्तीला मानसिक ताणतणावाला

सामोरे जावे लागते. तसेच समाजातील वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तीमुळे समाजजीवन असुरक्षित होत आहे. त्यामुळे व्यक्तीला सामाजीक सुरक्षितता प्रदान करण्यास, समुपदेशन करण्यासाठी व योग्य वेळी सरकारी/बिगर सरकारी मदत तत्परतेने पुरविण्यासाठी २४ तास विनामुल्य हेल्पलाईन्स सुरू करण्यात आल्या आहेत. प्रशिक्षित सामाजीक कार्यकर्ते अथवा समुपदेशक या लाईन्स वरून मदत करीत असतात.

व्यक्तीला त्याच्या सामाजीक जीवनामध्ये ज्या समस्यांना सामोरे जावे लागते त्याकरीता प्रतिबंधात्मक पोचमार्गातून समाजकार्य वरील विविध क्षेत्रामध्ये समस्या सोडविण्यासाठी साह्यभूत ठरते.

### ३.३.४ समुदायांसमवेतचे समाजकार्य :

समुदायसंघटन ही समाजकार्याची एक महत्त्वाची पद्धती आहे. समुदायांचा विकास हा सर्वंकष व बहुआयामी असतो. त्यामुळे यामध्ये समाजात सर्वच घटकांचा विकास अंतर्भूत होतो. समुदायामधील व समुदायाबाहेरून साधन म्हणून (नैसर्गिक व मानवी) उपलब्ध होऊ शकणाऱ्या साधन सामुग्रीचा शोध घेणे व त्याच्या योग्य व्यवस्थापनाने समुदायाच्या गरजांची पूर्तता करून समुदायांच्या प्रत्यक्ष सहभागातून सामाजीक समस्या सोडविण्याचे कार्य या पद्धतीद्वारे केले जाते.

**अ) शहरी समुदायांसमवेत समाजकार्य :**

१) झोपडपट्टी विकास कार्यक्रमांमध्ये समाजकार्याच्या समुदाय संघटन पद्धतीचा प्रभावी वापर करून झोपडपट्टीतील लोकांचा सामाजीक व आर्थिक जीवनस्तर उंचावण्यासाठी समाजकार्य उपयोगी ठरते. प्रशिक्षित सामाजीक कार्यकर्ते, बिगरशासकीय स्वयंसेवी संस्था व शासकीय संस्था या कामी समाजकार्याने विकसित केलेल्या पद्धती व तंत्रे मोठ्या कौशल्याने वापरतात.

२) विविध शसाकीय योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रशिक्षीत सामाजिक कार्यकर्ते समुदाय संघटक म्हणून कार्यरत असतात.

३) शहर विकास कार्यक्रमांमध्ये लोकांच्या निश्चित गरजा ओळखण्यासाठी सूक्ष्म अवलोकन पद्धतीचा वापर समाजकार्य प्रभावीपणे करू शकते.

४) शहरीकरण व त्यामुळे निर्माण झालेली गुन्हेगारी मादक पदार्थांचे सेवन, वाढता दुरावा इ. सामाजीक समस्या सोडविण्यासाठी समाजकार्य रचनात्मकरित्या कार्य करते.

५) शहरी जीवनास स्वकेंद्रीत वृत्तीमुळे निर्माण झालेल्या अनेक मानसिक विकारांवर मनोसामाजीक थेरपींचा वापर समाजकार्य प्रभावीरित्या करते.

६) अनेक बिगरशासकीय संस्थांच्या मार्फत समाजकार्याचे ज्ञान वापरून युवकांसाठी कौशल्य विकास कार्यक्रमांद्वारे त्यांना त्यांच्या उदरनिर्वाहाच्या साठीची साधने व त्याअनुषंगाने कौशल्य इ. उपलब्ध करून देऊन युवकांसाठी अनेक कल्याणकारी कार्यक्रम राबविण्यामध्ये समाजकार्याचे ज्ञान अत्यंत उपयुक्त आहे. तो प्रभाविपणे राबविणे व त्याचे अवलोकन करणे अशा अनेक टप्प्यांवर समाजकार्य वैज्ञानिक पद्धती व तंत्राने सहाय्यभूत ठरते.

**ब) ग्रामीण समुदायासमवेतचे समाजकार्य :**

१) ग्रामविकासामध्ये समुदाय संघटन पद्धती अत्यंत यशस्वी ठरली आहे. ग्रामीण समुदायाचा अभ्यास करण्यासाठी गाव सहभागी सूक्ष्म अवलोकन पद्धती (PRA) सामाजीक कार्यकर्ते अत्यंत प्रभावीपणे वापरून गावाचा विकास आराखडा लोकांच्या सहभागातून तयार होतो. शासकीय संस्थांना विविध योजना राबविण्यासाठी त्यांचे नियोजन करण्यासाठी तसेच योजनांचे यशापयश मुल्यावलोकनासाठी समाजकार्याचे ज्ञान उपयुक्त आहे.

२) ग्रामविकासाच्या शासकीय योजना राबविण्यासाठी अनेक प्रशिक्षित सामाजीक कार्यकर्ते प्रकल्प अधिकारी, समुदाय संघटक, समाजसेवक म्हणून कार्यरत असतात.

३) शेती विकास, नवीन तंत्रज्ञानाचा वापर व शेती आधारीत उद्योग इ. आधुनिक कल्पना स्विकारताना पारंपारिक शेतकऱ्याला योग्य ज्ञानाबरोबरच समूपदेशनाची गरज असते.

४) पंचायती राज व्यवस्थेमध्ये ग्रामविकासाचे सर्वंकष अधिकार ग्रामसभांना देण्यात आले आहे. गावातील लोकांची पारंपारीक मनोवृत्ती अज्ञान व गटातटाचे राजकारण यामुळे योजना राबविण्यामध्ये अडथळे येतात. हे अडथळे सोडवून विकासात्मक पोचमार्गाने समाजकार्य प्रभाविपणे कार्य करते.

५) जागतिकीकरणामुळे पारंपारिक शेताचा होत असलेला ऱ्हास, शहरांकडे होणारे स्थलांतर, बेरोजगारी, सामाजिक अध:पतन सदोष, शेतकऱ्यांच्या आत्महत्या इ. अनेक विपणन प्रश्नांवर कृतीशील उपाययोजना प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्ते करतात.

६) अनेक बिगर शासकीय संस्थांमार्फत युवकांसाठी कौशल्यविकास कार्यक्रम, पंचायतीराज, प्रशिक्षिण,योजनांची माहिती, पाणलोट विकास कार्यक्रम, आदर्श गांव कार्यक्रम राबविले जातात.

७) या सर्व विकास कार्यक्रमांमध्ये समाजकार्यकर्ता तज्ञ सहाय्यक म्हणून कार्य पार पाडू शकतो. गावाच्या गरजा ओळखणे, उपलब्ध साधन सामूग्रीचा आढावा घेणे, विकास आराखडा तयार करणे, तो प्रभावीपणे राबविणे व त्याचे अवलोकन करणे अशा अनेक टप्प्यांवर समाजकार्य वैज्ञानिक पद्धती व तंत्रे सहाय्यभूत ठरतात.

**३.३.५ विशेष गरजू व्यक्तींसमवेत समाजकार्य :**

समाज हा अनेक समाज घटकांनी मिळून बनतो. व्यक्ती व्यक्तींमध्ये अनेक प्रकारची विविधता असते. त्यासाठी मानसीक व शारीरिक वेगळेपणा व्यक्तीत प्राकृतीकरित्याच असतो. व्यक्तीच्या मुख्य समुहाने व्यक्तीमधील साधर्म्य ध्यानात घेऊन काही समान नियमने तयार केलेली असतात. पण काही व्यक्ती व समूह त्यांच्या विशिष्ट शरीर रचनेमुळे किंवा मानसिकतेमुळे विशेष असतात. अपवाद असतात. अशा व्यक्तींना आपण समूहापेक्षा वेगळे आहोत ही न्यूनगंडाची भावना तयार होते व त्या अनुषंघाने अनेक अडचणींना त्यांना सामोरे जावे लगाते. तसेच समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोनही बऱ्याचदा वेगळा निरोगी नसतो.

समाजकार्याच्या मूलभूत तत्त्वज्ञानानुसार कोणती व्यक्ती वा समुदाय कलंकीत नसतो. त्यामुळे त्या व्यक्ती, समुदायात स्विकारून त्याला त्याच्या अडचणी सोडविण्यासाठी मदत करण्यास समाजकार्य तत्पर असते.

**अ) भिन्नत्व असणारे समूह व समाजकार्य :**

**१) शारीरिक व मानसिक विकलांगता :**

शारीरिक व मानसिकदृष्ट्या विकलांग असणाऱ्या व्यक्ती त्यांच्या शारीरिक व मानसिक गरजांची परिपूर्ती करण्यासाठी अवलंबून असतात. या अवलंबित्वामुळे त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. अशा व्यक्तींना कल्याणकारी योजनांचा लाभ देणे व त्यांचे आयुष्य सुसह्य करण्यासाठी अनेक सेवाभावी संस्था कार्यरत आहेत. अशा संस्थांना वैज्ञानिक पद्धती व तंत्रे यांचे ज्ञान देणेसाठी समाजकार्य कार्य करत आहे.

**२) तृतीयपंथी व एम्एस्.एम् :**

तृतीय पंथी हा समूदाय ही शारीरिक व मानसिकदृष्ट्या मुख्य समूहापेक्षा भिन्नत्व असणारा असतो. प्रचलित समाज नियमने आणि व्यक्तीची मानसिकता यामध्ये विरोधा भासी अंतर निर्माण होते. त्यामुळे अशा व्यक्तीनाही समाजात अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. या व्यक्तीनाही समाजकार्य कदापी कलंकित समजत नाही. त्यांना त्यांचा 'स्वतंत्र' लिंगभावासहीत स्विकारून त्याला समाज मान्यता मिळवून देवून त्यांच्या मानवी हक्क संरक्षणासाठी समाजकार्य प्रयत्नशील असते.

**३) परित्यक्ता, कुमारी माता, घटस्फोटीत व देहविक्रय करणाऱ्या स्त्रिया :**

वैवाहिक जीवानतील असमायोजनामुळे व कौटुंबिक कलहामुळे अनेक स्त्रीयांना त्यांच्या पती शिवाय जीवन व्यतीत करावे लगते. अशा परितक्त्यांकडे पाहण्याचा सामाजीक दृष्टिकोन वाईट असतो. त्यामुळे त्यांना त्यांच्या पुनर्वसनासाठी समाजकार्य मदत करते. तसेच लग्नाआधी विवाहपूर्व लैंगिक संबंधातून गर्भधारणा होऊन संतती जन्माला घातल्यासही अशा कुमारीमातांकडे पाहण्याचा सामाजीक दृष्टीकोन कलंकीत असतो. मात्र त्या पिडीत कुमारी मातेच्या वर्तनाचे समर्थन न करता समाजकार्य तिला कलंकीत मानत नाही व तिला व्यक्तीगत व सामाजीक समायोजनासाठी सहाय्यभूत ठरते. तसेच देहविक्रय करणाऱ्या स्त्रीयांनाही सन्मानाने जगता यावे व त्यांचे जीवन अधिक सुसह्य करण्यासाठी समाजकार्य प्रयत्न करते.

**४) असाध्यरोग असणारे रोगी :**

कुष्टरोग, एडस्, लैंगीक आजार इ. रोग हे केवळ व्यक्तीच्या शरीराशी जोडलेले नसून त्याचा सामाजीक परिणामही मोठा असतो. अशा व्यक्ती पुर्णपणे कोसळलेल्या असतात. त्यांना आधार देणे व पुन्हा त्यांचे मानसिक व सामाजीक समायोजन करण्यासाठी समाजकार्य मदत करते.

**५) सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागास घटक :**

जाती वा वर्ग संरचनेमुळे समाजातील काही समाजघटक हे मुख्य प्रवाहापासून वेगळे झालेले असतात. अशा समूहांच्या गरजा यामुख्य समूहापेक्षा वेगगळ्या असतात. अशा जाती व वर्ग समूहांना मुख्य प्रवाहामध्ये पुन्हा स्थापीत करून त्यांचे समायोजन करणे व त्यांना त्यांचे मानवी हक्क मिळवून देणे, अन्याय व त्यांची वंचितता नष्ट करणे इ. महत्त्वाचे कार्य समाजकार्य प्रभावीपणे करते.

**६) आपत्तीग्रस्त व विस्थापित :**

नैसर्गिक व मानवी आपत्तीमुळे समूहाचे आर्थिक व मनुष्यबळाचे मोठे नुकसान होते. अशा काळात त्याला पुन्हा उभे करण्यासाठी प्रतिबंधकात्मक, उपचारात्मक, प्रतिबंधात्मक , विकासात्मक, एकात्मीक अशा पाचही पोच मार्गातून समाजकार्य अशा व्यक्तीच्या समूहाच्या पुर्नस्थापनेसाठी प्रयत्नशील राहते व प्रभावीपणे कार्य करते.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : १**

१) ............... व्यवस्थीत न झाल्याने व्यक्तीला समायोजनात अडथळे येतात.

२) एखाद्या बालकाने प्रचलित कायद्याचे उल्लंघन केलेस त्या बालकाला ........... संबोधतात.

३) महिलांवर अत्याचार ................ मानसिकता कारणीभूत आहे.

४) बेरोजगारीचे प्रमुख कारण युवकांमध्ये .............. अभाव हे होय.

५) दिवसभर वृद्धांचे संगोपन करणाऱ्या संस्थेस .............. म्हणतात.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : २**

१) व्यक्तीला निर्माण झालेल्या अडचणींवर मात करण्यासाठी योग्य सल्लामसलत करण्याच्या पद्धतीला .............. म्हणतात.

२) मानसिक विकार हे ............... अडथळ्यामुळे निर्माण होतात.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : ३**

१) 'बाल निरीक्षण गृह' स्पष्ट करा.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : ४**

१) ................ द्वारे शासकीय योजना प्रभावीपणे राबविल्या जावू शकतात.

२) ................ या पद्धतीद्वारे गावाचे अवलोकन योग्य प्रकारे होऊ शकते.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : ५**

१) ................ शिक्षणाचा अभाव हे कुमारीमातांच्या समस्येचे मूळ आहे.

२) ............... पोचमार्ग हा विस्थापितांसोबत काम करताना प्रभावी ठरू शकतो.

३) तृतीय पंथीना लैंगीक अधिकार ............... नी बहाल केले आहे.

## ३.४ सारांश :

प्रस्तावनेत उल्लेख केल्याप्रमाणे समाजकार्याची व्याप्तीही मानव व त्याच्या समस्या इतकी आहे. त्यामुळे मानव व मानवाने निर्माण केलेल्या अनेक सामाजीक संस्था त्यामध्ये निर्माण होणारे असमायोजन व त्यातून होणाऱ्या असंख्य समस्या इतकी मोठी व्याप्ती समाजकार्याच्या क्षेत्राची आहे. इतर सामाजीक शास्त्रांच्या तुलनेत समाजकार्य हे तरूण सामाजीक शास्त्र आहे. तसेच उपयोजीत आहे. त्यामुळे याची क्षेत्रे व समस्या सोडविण्यासाठी वेगवेगळी तंत्रे, पद्धती बदलत्या काळानुसार वेगाने विकसीत होत आहेत.

## ३.५ पारिभाषिक संज्ञा :

१) प्रतिबंध - समस्या निर्माण होऊनये म्हणून केलेली उपाययोजन.

२) विधीसंघर्षग्रस्त - प्रचलित कायद्याच्या विरुद्ध वर्तन.

३) एम.एस्.एम - पुरुषाचा पुरुशाशी लैंगीक संबंध

४) परित्यक्ता - नवऱ्यापासून घटस्फोट न घेता विलग असणारी स्त्री.

## ३.६ स्वयं अध्ययनाच्या प्रश्नांची उत्तरे

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे - १**

१) सामाजीकरण

२) विधीसंघर्षग्रस्त बालक

३) पुरुषीवर्चस्ववादी

४) व्यावसायीककौशल्यांचा

५) डेकेअर सेंटर

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे - २**

१) समूपदेशन

२) समायोजनातील

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे - ३**

**१) 'बाल निरीक्षण गृह' म्हणजे काय ?**

बाल निरीक्षण गृहामध्ये विधी संघर्षग्रस्त बालकांना ठेवण्यात येते. समाज कार्यातील विविध तंत्रे व थेरपी वापरून त्यांच्या सामाजीकरणातील अडथळे दूर केले जातात व अंतर भरून काढून त्याला जबाबदार नागरिक बनविण्याचा प्रयत्न केला जातो. ही गृहे जबाबदार स्वयंसेवी संस्था अगर सरकारी संस्था चालवितात.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे – ४**

१) प्रशिक्षित समूह घटकाद्वारे.

२) गांव सहभागी मुल्यावलोकन

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे – ५**

१) लैंगीक

२) पुनर्वसनात्मक

३) मानवी हक्कांनी

## ३.७ सरावासाठी प्रश्न :

**अ) टिपा लिहा.**

१) समुपदेशन

२) प्रतिबंधात्मक पोचमार्ग

३) गांव सहभागी मुल्यावलोकन

४) महिला सबलीकरण व समाजकार्य

५) वृद्धाश्रम

**ब) दिर्घोत्तरी प्रश्न.**

१) कुटुंब संस्थेसमवेत समाजकार्याची व्याप्ती स्पष्ट करा.

२) मनोवैद्यकीय क्षेत्रातील समाजकार्याची आव्हाने विषद करा.

३) प्रतिबंधात्मक व पुनर्वसनात्मक समाजकार्याच्या पोच मार्गातून सुधारणा क्षेत्रातील समाज कार्यावर चर्चा करा.

४) शहरी व ग्रामीण समुदाय विकासामध्ये समाजकार्याच्या ज्ञानाचे उपयोजन स्पष्ट करा.

५) मानवी हक्क व समाजकार्य यांचा अन्योन्य संबंध, भिन्नत्व असणारे समूह व समूहातील समाज कार्य याद्वारे स्पष्ट करा.

## ३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके.

१) Social Work Theory and practice : K. Singh.:

२) एकात्मीक समाजकार्य : प्राजक्ता टांकसाळे.

❖ ❖ ❖

## घटक – ४

# समाजकार्य करणाऱ्या संस्थांना दिशादर्शक भेटी

## (Orientation Visit to Social Work Agencies)

**घटक संरचना :**

४.१ प्रास्ताविक

४.२ उद्दिष्ट्ये

४.३ विषय विवेचन

४.३.१ व्यावसायिक समाजकार्याची गरज

४.३.२ भारतामध्ये व्यावसायिक समाजकार्याची सुरूवात

४.३.३ दिशादर्शक भेट

४.३.४ दिशादर्शक भेटीची उद्दिष्ट्ये

४.३.५ दिशादर्शक भेटीसाठीच्या संस्था

४.३.६ दिशादर्शक भेटीचे अहवाल लेखन.

४.३.७ दिशादर्शक भेटीचा अहवाल नमूना.

४.४ सारांश

४.५ पारिभाषिक शब्द-शब्दार्थ

४.६ चिंतन आणि कार्य

४.७ अधिक वाचनासाठीची पुस्तके.

### ४.१ प्रस्तावना :

'समाजशास्त्र आणि समाजकार्य' या विषयामधील पहिल्या तीन घटकांमध्ये, तुम्ही व्यावसायिक समाजकार्याचा इतिहास व त्याचे तत्त्वज्ञान, व्यावसायिक समाजकार्याची मुल्ये, समाजकार्याची तंत्रे व कौशल्ये व्यावसायिक समाजकार्याच्या मुलभूत संकल्पना आणि पद्धती, व्यावसायिक समाजकार्याची क्षेत्रे तसेच समाजशास्त्र आणि समाजकार्य यांचेतील नातेसंबंध इत्यादी गोष्टींचे अध्ययन केले. त्याच बरोबर व्यावसायिक समाजकार्य ज्या सहा शास्त्रीय पद्धतीवर अवलंबून आहे त्याचे सैद्धांतिक विवेचन अगोदरच्या तीन घटकांतून केले गेले आहे.

प्रस्तृत चौथे घटक 'समाजकार्य करणाऱ्या संस्थांना दिशादर्शक भेटी' अशा आशयाचे आहे. सदरचे घटक

हे पूर्णत: प्रात्यक्षिक कार्यावर आधारीत आहे. व्यावसायिक समाजकार्याबद्दलचे सैद्धांतिक ज्ञान आत्मसात केलेनंतर विद्यार्थी समाज कार्यकर्त्यांना प्राध्यापक निरीक्षकांसमवेत त्यांच्या मार्गदर्शनाखाली व्यावसायिक समाज कार्याच्या पद्धतींचा, तंत्राचा अवलंब केलेल्या पाच सामाजिक संस्थांना दिशादर्शक भेटी देणे अनिवार्य आहे. दिशादर्शक भेट दिलेनंतर विद्यार्थी समाज कार्यकर्त्यांने सोबत दिलेल्या विहित नमुन्यामध्ये अहवाल सादर करणे गरजेचे आहे. परंतु दूर शिक्षण प्रणालीतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अशाप्रकारे दिशादर्शक भेटीच्या माध्यमातून प्रात्यक्षिक कार्य करणे शक्य नसल्याने या घटकामध्ये दिशादर्शक भेट म्हणजे काय ? दिशादर्शक भेटीची उद्दिष्ट्ये, भेटीचा अहवाल व नमुना याबद्दलचे सैद्धांतिक विवेचन करण्यात आले आहे.

## ४.२ उद्दिष्ट्ये :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हाला,

❖ भारतामध्ये व्यावसायिक समाजकार्याची गरज का आहे हे जाणून घेता येईल.

❖ भारतामध्ये समाजकार्याची सुरूवात कधी झाली हे समजून घेता येईल.

❖ दिशादर्शक भेटी म्हणजे काय हे समजून घेता येईल.

❖ दिशादर्शक भेटीची उद्दिष्ट्ये जाणून घेता येतील.

❖ दिशादर्शक भेटीचा अहवाल कसा असावा याबद्दलचे आकलन होईल.

## ४.३ विषय विवेचन :

समाजशास्त्र हे समाजाचे शास्त्र म्हणून समाजमान्य आहे. विविध समाज संस्था, समाज रचना, संस्कृती, गट, समूह, सामाजिक समस्या इत्यादींचा शास्त्रोक्त अभ्यास समाजशास्त्राद्वारे केला जातो. या समाजशास्त्रीय अभ्यासाद्वारे विद्यार्थ्यांचे आणि समाजशास्त्रज्ञांचे सामाजिक ज्ञान उन्नत होते, परंतु हे ज्ञान सैद्धांतिक पातळीवर मर्यादित राहते. तथापि, गतीशील आणि वेळोवेळी बदलत राहणाऱ्या समाजाला तसेच बदलत्या मानवी जीवनमानास सैद्धांतिक ज्ञानाबरोबरच कृतीशिलतेची जोड असावी लागते, जेणेकरून सकारात्मक समाज परिवर्तन होऊन मानवाचे जीवनमान उंचावून विवेकी समाज निर्माण होण्यास मदत होईल. व्यावसायिक समाजकार्याचा अभ्यासक्रम हा अशाच प्रकारचा अभ्यासक्रम आहे, की ज्याच्यामध्ये सैद्धांतिक ज्ञानाला कृतीशिलतेची जोड आहे. समाजशास्त्रीय शिक्षणाच्या माध्यमातून मिळणाऱ्या विचारांना कृतीशिल समाजकार्याची जोड मिळाल्यास समाज प्रगत व विकसित होण्यास नक्कीच मदत होईल. व्यावसायिक समाजकार्य हे सामाजिक तथा मानसिक समस्यांनी ग्रासलेल्या गरजू व्यक्तीला, गटाला व समूहाला मदतीचा हात देऊन शास्त्रीय ज्ञानाच्या आधारे व आत्मसात केलेल्या तंत्राचा आणि कौशल्याचा योग्य उपयोग करून कृतीशिलपणे निराकरण करणेसाठी प्रयत्नशील राहते.

### ४.३.१ व्यावसायिक समाजकार्याची गरज :

व्यावसायिक समाजकार्य हे विवेकी मुल्य परिवर्तनाचे कृतीशिल शिक्षण देते आणि समाजामध्ये सकारात्मक

बदल घडवून आणण्यास मदत करते.


जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे औद्योगिकीकरण आणि तंत्रज्ञानाच्या बाबतीत देश प्रगती पथाकडे वाटचाल करत आहे, परंतु या प्रगती बरोबरच नवीन सामाजिक व मानसिक समस्यांचा उगम झालेला दिसतो. या सामाजिक व मानसिक समस्यांचे स्वरूप जरी निरनिराळे असले तरी काही प्रमाणात कारणे मात्र समान दिसून येतात. या विविध समस्यांचे निराकरण करणेसाठी शास्त्रीय ज्ञानाची, तंत्र – कौशल्ये व पद्धतींचा अवलंब करून सामाजिक सेवा देणेची गरज दिसून येते, कारण आज लहान दिसणाऱ्या समस्या देखील उद्या सामाजिक प्रगतीला आणि विकासाला अडथळा निर्माण करू शकतात. हीच निकड लक्षात घेऊन भारतामध्ये व्यावसायिक समाजकार्याचा अभ्यासक्रम सुरू झाला व त्याला आता ७९ वर्षे पूर्ण होत आहेत.

### ४.३.१ भारतामध्ये व्यावसायिक समाज कार्याची सुरूवात :

भारतामध्ये व्यावसायिक समाज कार्याची सुरूवात ही औद्योगिकीकरण आणि शहरीकरणांच्या परिणामाअंती झालेली दिसून येते. शहरामध्ये निर्माण झालेली उद्योग–व्यावसायांची वाढ त्यातून निर्माण झालेली रोजगाराची संधी या प्रमुख कारणांमुळे ग्रामीण भागात वास्तव्य करणारे व शेतीवर उदरनिर्वाह करणारी कुटुंबे शहराकडे स्थलांतरीत होऊ लागली. रोजगारांच्या विविध क्षेत्रांमध्ये संधी निर्माण झाल्यामुळे नोकरीला महत्त्व प्राप्त झाले. शेतीशिवाय अर्थार्जनासाठी नोकरी हा नवीन पर्याय मिळाल्याने लोक ग्रामीण भाग सोडून शहराकडे वळू लागले, त्यामुळे एकत्रित कुटुंब पद्धतीत राहणारी कुटुंबे विभक्त झाली, शहरांकडे स्थलांतरीत होऊ लागली.

औद्योगिकीकरणाच्या विकास प्रक्रिये पाठोपाठ स्थलांतर, कुटुंब संस्थेचे विघटन, बालमजुरी, गुन्हेगारी, झोपडपट्टी, व्यसनाधिनता यांसारख्या सामाजिक समस्येबरोबरच व्यक्तीला एकटेपणा, चिंता, निराशा आदीं मानसिक समस्यांना देखील सामोरे जावे लागले अशा परिस्थितीमध्ये शास्त्रीय पद्धतीवर अवलंबून आसणाऱ्या या समस्यांचे कृतीशीलपणे निराकरण करणाऱ्या व्यावसायिक समाज कार्याचे शिक्षण देणाऱ्या 'सर दोराबजी टाटा ग्रॅज्युएट स्कूल ऑफ सोशल वर्क' या शिक्षण संस्थेची स्थापना १९३६ साली मुंबई मध्ये टाटा हाऊस येथे करण्यात आली, ही संस्था अशा प्रकारचे व्यावसायिक समाजकार्याचे शिक्षण देणारी भारतातील पहिली संस्था म्हणून ओळखली जाते. आज हीच संस्था टाटा समाज विज्ञान संस्था (Tata Institute of Social Sciences TISS) या नावाने ओळखली जाते. सुरूवातीच्या कालखंडामध्ये 'समाज सेवा प्रशासन' (Social Services Administration) या पदव्युत्तर डिप्लोमा चे प्रशिक्षण देण्याचे काम या संस्थेने केले. तद्नंतर १९६४–६५ मध्ये, पूर्वीचा अभ्यासक्रम बदलून समाजर्कार्च्या पदव्युत्तर पदवीचा (MSW) चा अभ्यासक्रम सुरू केला. त्यालाच व्यावसायिक समाजकार्य म्हणून ओळखले जात.

आधुनिक व्यावसायिक समाजकार्याचे प्रामुख्याने दोन भाग केले आहेत ते असे,




समाजकार्याच्या ६ पद्धतींचा उपयोग क्षेत्रिय कार्य करतेवेळी केला जात असल्याने समाजकार्याचे सिद्धांत व क्षेत्रीय कार्य हे परस्परावलंबी असलेचे दिसून येते.

१) सिद्धांत (Theory) २) प्रात्यक्षिक (Practical)

**१) सिद्धांत :**

सिद्धांत म्हणजे कोणत्याही घडणाऱ्या घटनेमागचा कार्यकारण भाव शोधून बुद्धीप्रामाण्याच्या किंवा बुद्धीच्या निकषांच्या आधारे केलेले विधान होय. विचारांचा व तत्त्वांचा संच असणाऱ्या सिद्धांताच्या आधारे प्रात्यक्षिक कार्य करणेसाठी मदत होते, या सिद्धांतांची वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने मांडणी केलेली असते तसेच ती वैज्ञानिक कसोटीवर उरलेली असुन खालीलप्रमाणे कार्य करतात.

**१) मध्यस्थी** (Intervention) : सामाजिक बदल घडवून आणण्याच्या प्रक्रियेमध्ये सिद्धांत मध्यस्थीचे कार्य करतात.

**२) पुर्वानुमान** (Prediction) : सामाजिक बदला संदर्भातले पुर्वानुमान करण्याची शक्ती ही कोणत्याही सिद्धांताचे मुल्यमापन करण्याचा निकष आहे.

**३) स्पष्टीकरण** (Explanation) : एखाद्या गोष्टीबद्दलचे औपचारिक प्रतिपादन करून सिद्धांताच्या आधारे स्पष्टीकरण करता येते.

**४) वर्णन** (Description) : एखाद्या सामाजिक समस्येबद्दलचे अथवा परिस्तितीचे वर्णन सिद्धांताद्वारे करता येते.

**५) अवलोकन** (Observation) : सामाजिक परिस्थिती संदर्भातले सुक्ष्म अवलोकन करण्यास सिद्धांत उपयोगी ठरतात. सिद्धांताच्या आधारे समाज व्यवस्था, मानवी वर्तन, सामाजिक मूल्ये, सामाजिक पर्यावरण, सामाजिक बदल इत्यादी बद्दलचा अभ्यास करता येतो.

व्यावसायिक समाजकार्याचे तत्वज्ञान, तंत्रे व कौशल्ये, समाजकार्याच्या पद्धती तसेच मुल्ये यांचे याबाबतचे सैद्धांतिक ज्ञान वर्गामध्ये दिले जाते व या ज्ञानाचा उपयोग प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून सामाजिक व व्यक्तिगत समस्येचे निराकरण करणेसाठी केला जातो.

या सिद्धांताचा उपयोग प्रात्यक्षिक कार्यासाठी केला जाता असल्यामुळे या दोन्ही गोष्टी परस्परावलंबी असल्याचे स्पष्ट होते.

### ❖ प्रात्यक्षिक कार्य :

प्रात्यक्षिक कार्य म्हणजे, प्रत्यक्षात केली जाणारी कृती होय. व्यावसायिक समाजकार्यामध्ये प्रात्यक्षिक कार्याला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. ज्याप्रमाणे विज्ञान शिकणारे विद्यार्थी वर्गामध्ये सैद्धांतिक ज्ञान संपादन करतात व तेच ज्ञान प्रयोगशाळेमध्ये प्रयोगांच्या माध्यमातून पडताळून पाहतात, त्याचप्रमाणे व्यावसायिक समाजकार्याचे विद्यार्थी वर्गामध्ये घेतलेल्या सैद्धांतिक ज्ञानाच्या आधारे समाजामध्ये प्रत्यक्ष कृती करून व्यक्तीच्या, गटाच्या, समुदायाच्या समस्या सोडविण्यासाठी कटीबद्ध राहतात. व्यावसायिक समाजकार्याच्या प्रात्यक्षिक कार्य करणेच्या गुणधर्मामुळे ते इतर सामाजिक शास्त्रांच्या विषयांमध्ये आपला वेगळेपणा निदर्शित करते.

व्यावसायिक समाजकार्याच्या प्रात्यक्षिक कार्यास क्षेत्रीय कार्य (Field work) म्हणतात. क्षेत्रीयकार्य हा व्यावसायिक समाजकार्याचा कणा मानला जातो, ज्याच्यावर संपूर्ण समाजकार्याचा डोलारा उभा आहे. एकूणच व्यावसायिक समाजकार्याच्या शिक्षणातील ६०% भाग हा सैद्धांतिक ज्ञानावर व ४०% भाग हा क्षेत्रीय कार्यावर अवलंबून असल्याचे स्पष्टपणे आढळून येते. व्यावसायिक समाजकार्य शिक्षणाची सुरूवात ही खऱ्या अर्थाने व्यावसायिक प्रशिक्षणाच्या माध्यमातूनच झालेली आहे. समाजकार्य हा वकिली, वैद्यकीय, अभियांत्रिकी व्यवसायाप्रमाणेच व्यवसाय असु शकतो हे पटवून देण्यास पुढाकार घेतला त्या ''चॅरीटी ऑर्गनायझेशन सोसायटी ऑफ अमेरिका'' या संस्थेने १९८९ साली संस्थेत नव्याने भरती झालेल्या कर्मचाऱ्यांना व्यावसायिक समाजकार्याचे शिक्षण प्रशिक्षणाच्या माध्यमातून देण्यास सुरूवात केली. हे प्रशिक्षण देत असताना प्रशिक्षणार्थींना कोणत्याही प्रकारचे सौद्धांतिक शिक्षण न देता पाच आठवड्यांचे प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये कर्मचाऱ्यांना आपल्या कार्यालयातील वरिष्ठ कर्मचारी करत असलेल्या कामाचे

निरीक्षण करून शिक्षण घ्यावे लागे. या संपूर्ण प्रशिक्षणामध्ये कोठेही सिद्धांतांबद्दलचे शिक्षण देण्यात आले नाही, त्यामुळेच समाजकार्य शिक्षणामध्ये प्रात्यक्षिक कार्याला महत्त्व प्राप्त झाले. व्यावसायिक समाजकार्यांच्या सिद्धांतांचा व प्रात्यक्षिक कार्याचा सखोल अभ्यास करत असताना असे निदर्शनास येते की, ज्यांना 'व्यक्ती सहयोग कार्य' या पद्धतीच्या जननी मानलं जात व 'चॅरिटी ऑर्गनायझेशन सोसायटी ऑफ अमेरिका' या संस्थेच्या अधिकारी 'मेरी रिचमंड' यांनी आपल्या अनुभव आणि निरीक्षणांच्या आधारे व्यावसायिक समाजकार्याच्या संकल्पना व विचार विस्तृतपणे मांडलेल्या आहेत, ज्यांचा व्यावसायिक समाज कार्याचा अभ्यास करताना उपयोग होतो.

व्यावसायिक समाजकार्याच्या प्रात्यक्षिक कार्याचा अभ्यास करताना असे आढळून येते की, ते दोन प्रमुख भागांमध्ये विभागले गेले आहे.

१) दिशादर्शक भेट २) क्षेत्रीय कार्य.

आता आपण दिशादर्शक भेटीबद्दल अधिक विस्तृतपणे जाणून घेऊया.

### ४.३.२ दिशादर्शक भेट :

''व्यावसायिक समाजकार्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी समाजकार्यकर्त्यांना समाज कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांचे स्वरूप व कार्ये आणि संस्थांची संरचना समजून घेणेसाठी तसेच समाजकार्यांच्या शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून व्यक्तीच्या, गटाच्या व समुहाच्या समस्यांचे निराकरण करणेसाठी कसा उपयोग केला जातो याचे ज्ञान संपादित करणेसाठी दिशादर्शक भेटी उपयुक्त ठरतात.''

व्यावसायिक समाजकार्याच्या पदवीचा किंवा पदव्युत्तर पदवीचा प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम सुरू झालेनंतर; समाजकार्याच्या प्रात्यक्षिक कार्याची ओळख व सुरूवात केली जाते, ती ''दिशादर्शक'' भेटींच्या माध्यमातून. या भेटींच्याद्वारे क्षेत्रीय कार्याचा पाया रचला जातो. विद्यार्थ्यांना व्यावसायिक समाजकार्य करणाऱ्या निरनिराळ्या सेवा क्षेत्रांची ओळख या दिशादर्शक भेटींच्या माध्यमातून करून दिली जाते. या दिशादर्शक भेटींचे आयोजन हे प्रामुख्याने अशासकीय संस्था, शासकीय संस्था, विविध समूदाय, ग्रामीण व शहरी समुदाय तसेच विविध प्रकल्पांची माहिती करून घेणेसाठी आणि त्यांचे स्वरूप, कार्ये, संरचना व कार्यपद्धती यांचे प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून आकलन करून घेणेसाठी महत्त्वाचे ठरते.

अशाप्रकारे दिशादर्शक भेटींचे आयोजन हे मुख्यत: विद्यार्थी समाजकार्यकर्त्यांना क्षेत्रीय कार्य करणेसाठी संस्थेमध्ये नेमण्यापूर्वी केले जाते. जेणेकरून विद्यार्थ्यांना क्षेत्रीय कार्याच्यावेळी कार्य करताना फारशा अडचणी उद्भवत नाहीत. समाजकार्याच्या ज्या महाविद्यालयांमध्ये समाजकार्याच्या द्वितीय वर्षाकरीता ''विषय प्राविण्य'' (Specialization) आहे. (उदा. मानव संसाधन व्यवस्थापन व कामगार कल्याण, शहरी व ग्रामीण समूदाय विकास, कुटुंब व बालकल्याण इत्यादी) त्यांच्या विषयानुसार त्या-त्या क्षेत्रातील संस्थांना भेटींचे आयोजन करण्यात येते. उदा. कारखाने, रुग्णालये, कौटुंबिक समुदेशन केंद्रे आदी.

दिशादर्शक भेटीसंदर्भातील अधिक आकलन होणेसाठी आपण दिशादर्शक भेटींची उद्दिष्ट्ये पाहुयात.

### ४.४.३ दिशादर्शक भेटींची उद्दिष्ट्ये :–

व्यावसायिक समाजकार्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थी समाजकार्यकर्त्यांना समाजकार्याच्या विविध सेवा, क्षेत्रांची व संस्थांची ओळख करून देणे समाजकार्याच्या तंत्रांचा व पद्धतींचा अवलंब करून उपयोग करणे आणि व्यावसायिक सामाजिक दृष्टी वाढीस लावणे हे दिशादर्शक भेटींचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

विद्यार्थी समाजकार्यकर्त्यास,

१) कौटुंबिक, वैयक्तिक, सामाजिक, मानसिक समस्यांचे आकलन करून देणेसाठी.

२) व्यक्तींला, समुदायाला, गटाला भेडसावणाऱ्या समस्यांचे समाजकार्याच्या शास्त्रीय पद्धतींचा अवलंब करून समस्यांचे निराकरण कसे केले जाते याची माहिती करून देणे.

३) संस्थांमध्ये व्यावसायिक समाजकार्यांच्या तंत्रांचा व कौशल्यांचा अवलंब कशा पद्धतीने केला जातो याची माहिती करून घेणे.

४) व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांच्या विविध भूमिका समजावून घेणे.

५) समस्यांचे निराकरण करताना पार पाडत असलेल्या भूमिकांची समिक्षा कशाप्रकारे केली जाते हे जाणून घेणे.

६) वर्गामध्ये घेतलेल्या सैद्धांतिक ज्ञानाचा क्षेत्रीय कार्यादरम्यान कसा अवलंब केला जातो याची माहिती देणे.

७) क्षेत्रीय कार्याच्या दरम्यान अमलात आणु पाहणाऱ्या योजनांचे अवलोकन करणेसाठी मदत करणे.

८) क्षेत्रीय कार्याच्या सरावासाठी कार्यक्षेत्रांची योग्य माहिती करून देणे.

९) निरीक्षण कौशल्य आत्मसात करणेसाठी मदत करणे.

१०) शोधक वृत्ती वाढीस लावण्यासाठी मदत करणे.

वरील प्रमाणे दिशादर्शक भेटींची उद्दिष्टे जाणून घेतल्यानंतर आता आपण दिशादर्शक भेटी कोणकोणत्या संस्थांना दिल्या जातात याबद्दलची माहिती घेऊयात.

### ४.३.५ दिशादर्शक भेटीसाठींच्या संस्था :

दिशादर्शक भेटींचे आयोजन हे प्रामुख्याने अशासकीय, शासकीय संस्था, शहरी व ग्रामीण समुदाय, रुग्णालये, कारखाने इ. संस्थांना केले जाते. या संस्था 'ना–नफा' या तत्त्वावर स्वयंप्रेरणेने स्थानिक पातळीवर राज्यामध्ये तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करतात. अशाप्रकारच्या स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून समाजातील दुर्लक्षित राहिलेल्या घटकांना मदत देण्याचे कार्य केले जाते. तसेच त्यांना भेडसावणाऱ्या समस्यांचे शास्त्रीय पद्धतीने निराकरण करून स्वयंनिर्भर करण्याचे कार्य केले जाते. शासकीय पातळीवरील विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करून दुर्लक्षित घटकांचे पुनर्वसन केले जाते.

बऱ्याचवेळा अशासकीय संस्था आपल्या अनुभव व अभ्यासाच्या आधारे शासनास धोरण निश्चितीसाठी सहाय्य करतात. या संस्था मुख्यत्वे आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, व्यसनमुक्ती, बालसुधार, जेष्ठ नागरिकांच्या समस्या, महिलांच्या समस्या इ. विषयांवर कार्य करतात.

**१) सुधार गृह :**

सुधार गृहांमध्ये कारागृह, पोलीस ठाणे, बालसुधारगृह इत्यादीचा समावेश केला आहे. व्यक्तीने केलेल्या गुन्ह्याच्या बदल्यात शिक्षा सुनावलेनंतर व्यक्तीमधील गुन्हेगारीवृत्ती नाहीशी करणेसाठी व त्याने तद्नंतर असे गुन्हे करू नयेत म्हणून कैदेत किंवा बालसुधार गृहात रवानगी केली जाते.

अशा संस्थांमध्ये समुदेशकाची भूमिका फार महत्त्वाची ठरते. गुन्हेगारी व्यक्तीचे वर्तन, त्याची परिस्थिती, गुन्हा करण्यामागची मानसिकता यांचा अभ्यास समुपदेशकामार्फत केला जतो. त्यामूळे अशा संस्थांमध्येदेखील दिशादर्शक भेटीचे आयोजन करण्यात येते.

व्यावसायिक सामाजिक कार्यकर्ता, समुपदेशक अशा ठिकाणी, संस्था आणि कैदी यांच्यामधला दुवा ठरतो. व्यावसायिक सामाजिक कार्यकर्ता सुधारगृहातील कैद्यांचे पुनर्वसन करण्यास मदत करतो व त्यांना समाजाने स्वीकारावे यासाठी प्रयत्नशील राहतो. उदा. बालकल्याण संकुल, कोल्हापूर.

**२) आरोग्य केंद्रे :**

आरोग्य केंद्रांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र, मानसिक आधार केंद्र, मानसोपचार केंद्र, रुग्णालये इत्यादींचा समावेश केला जातो. अशाप्रकारच्या संस्थांमध्ये समुपदेशन केले जाते. हे समुपदेशन रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक यांचे केले जाते. या संस्थांमध्ये आयुर्विज्ञान सामाजिक कार्यकर्ता (Medical Psychiatric Social Worker) कार्यरत असतो. उदा. सी.पी.आर. कोल्हापूर, हिंदुजा मुंबई, कृपामाई मिरज इ..

**३) नागरी प्रशासकीय संस्था :**

नागरी प्रशासकीय संस्थांमध्ये सामाजिक न्याय विभाग, शिक्षण, एकात्मिक बाल विकास, महिला व बालकल्याण, पंचायत समिती इत्यादींचा समावेश केला आहे. या संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थी समाजकार्यकर्ता शासनाच्या विविध योजनांचा, प्रकल्पांचा, यंत्रणेचा तसेच लाभार्थींची, माहिती करून घेतो. या विभागात कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांची कार्ये व कार्यप्रणाली समजावून घेऊन शासकीय योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात येणाऱ्या समस्यांची माहिती करून घेतात व नोंदी ठेवतात.

**४) शैक्षणिक संस्था :**

शैक्षणिक संस्था म्हणजे शाळा, महाविद्यालये, प्रौढ व निरंतर शिक्षण देणाऱ्या संस्था होय. शालेय स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी समुपदेशकाची गरज समजावून घेऊन त्यांची नियुक्ती देशातल्या काही खाजगी व सरकारी शाळांध्ये करण्यात आलेली आहे. व्यवसायिक समाजकार्याचे शिक्षण घेतलेला समुपदेशक विद्यार्थ्यांना बाल वयात भेडसावणाऱ्या विद्यार्जनाच्या समस्या, भावनिक समस्या, गैरहजेरी, अभ्यासामध्ये

येणाऱ्या अडचणी जाणून घेऊन विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्याचे कार्य करतो. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या पालकांशी सुसंवाद साधुन गरज पडल्यास त्यांचेही समुपदेशन करतो. त्यामुळे शैक्षणिक संस्थांमध्ये देखील दिशादर्शक भेटीचे आयोजन केले जाते.

**५) व्यसन मुक्ती व पुनर्वसन केंद्र :**

व्यसनमुक्ती केंद्राच्या माध्यमातून व्यसनाच्या आहारी गेलेल्या तरूण-तरुणींना व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी समाजकार्याच्या पद्धतींचा अवलंब केला जातो. व्यसनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तीचा क्रोध न करता त्याला करूणा दाखवून, मानसिक आधार देण्याचे कार्य समाज कार्यकर्त्यांच्या माध्यमातून केले जाते. व्यसनी व्यक्ती वाईट नाही तर व्यसनं वाईट असतात, याबद्दल आग्रही राहून समाजामधून व्यसनांना हद्दपार करणेसाठी सामाजिक कार्यकर्ते प्रयत्नशील राहतात. व्यसनांच्या आहारी गेलेल्या व्यक्तीचे व्यसन सोडवून त्यांचे पुनर्वसन करणेसाठी व्यसनमुक्ती केंद्रांच्या माध्यमातून प्रयत्न केला जातो. उदा. मुक्तांगण, पुणे, 'परिवर्तन' सहयोग हॉस्पीटल सातारा.

**६) दुर्बल घटकांसाठीची गृहे :**

समाजामध्ये दुर्बल समजला गेलेला व असलेला घटक म्हणजे लहान मुले, स्त्रिया, वृद्ध, भिक्षेकरी या दुर्लक्षित राहिलेल्या घटकांसाठी वृद्धाश्रम, भिक्षागृह, बालगृह इत्यादींच्या माध्यमातून त्यांचे पुनर्वसन व मदत कार्य केले जाते. या दुर्बल घटकांपर्यंत शासकीय योजना पोहचवण्याचे काम सामाजिक कार्यकर्त्यांद्वारे केले जाते. तसेच त्यांचे, त्यांच्या सहकाऱ्यांचे व कुटुंबियांचे समुपदेशन करण्याचे काम सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून केले जाते.

बालकल्याण संकुलामध्ये राहणाऱ्या बालकांच्या दत्तक योजनेसंदर्भामध्ये सामाजिक कार्यकर्ता महत्त्वाची भुमिका पार पाडतो. या गृहांमध्ये वास्तव करणाऱ्या दुर्लक्षित घटकांचा एकटेपणा नाहीसा करणे व परिस्थितीशी अनुकूलता निर्माण करण्याचे काम याच्याद्वारे केले जाते. उदा. मातोश्री वृद्धाश्रम, भिक्षेकरी गृह, पुणे इत्यादी.

सर्वसामान्यपणे व्यावसायिक समाजकार्याच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी अशाप्रकारच्या वेगवेगळ्या कार्यप्रणाली असणाऱ्या संस्थांमध्ये दिशादर्शक भेटींचे आयोजन करण्यात येते. तथापी, समाजकार्याच्या द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी समाजकार्यकर्त्यास त्यांनी निवडलेल्या विषय प्राविण्यानुसार दिशादर्शक भेटींचे आयोजन केले जाते.

उदा. रुग्णालये, शहरी व ग्रामीण समाज, कौटुंबिक समुपदेशन केंद्र, सुधारग्रहे आणि कारखाने.

**७) कारखाने :**

व्यावसायिक समाजकार्याचे एक महत्त्वाचे विषय प्राविण्य म्हणजे मानव संसाधन व्यवस्थापन व कामगार कल्याण या विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी कारखान्यांमध्ये अथवा गिरण्यांमध्ये दिशादर्शक भेटीचे आयोजन केले जाते. या औद्योगिक संस्थामध्ये मानव संसाधन व्यवस्थापन/विकास, कामगार कायदे, कामगार संघटना आणि

कामगार कल्याणांच्या कल्याणकारी योजनांचा अभ्यास तसेच कामगारांना भेडसावणाऱ्या कामाच्या ठिकाणच्या समस्या, कौटुंबिक व मानसिक समस्यांचा अभ्यास केला जातो. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी कामगार व त्यांचे कुटुंबिय तसेच व्यवस्थापन मंडळातील सदस्याचे मानव संसाधन व्यवस्थापक किंवा कामगार कल्याण अधिकारी यांच्यामार्फत समुपदेशन केले जाते. या औद्योगिक संस्थामध्ये मानव संसाधन व्यवस्थापन विषय प्राविण्य निवडलेल्या विद्यार्थी समाजकार्यकर्त्यास संपूर्ण वर्ष क्षेत्रीय कार्य करावे लागत असल्याने अशा ठिकाणी दिशादर्शक भेटींचे आयोजन करणे उचित ठरते.

**८) ग्रामीण व नागरी समुदाय :**

खेडी आणि शहरांचा समावेश असणाऱ्या समुदायांमध्ये बऱ्याच अशासकीय संस्था कार्य करत असतात. ग्रामीण व शहरी भागातील लोकांचे आरोग्य, शिक्षण, पर्यावरण व इतर बाबींवर अशासकीय संस्था कार्य करतात. या समुदायामध्ये दिशादर्शक भेटीचे आयोजन केले असता समुदायाचा इतिहास, लोकांचे राहणीमान विविध शासकीय योजना व त्यांची अंमलबजावणी यांचा अभ्यास करून समुदायाच्या समस्या कशा सोडवाव्यात याबद्दलचे मार्गदर्शन केले जाते. नागरी आणि ग्रामीण समुदाय विकास विषय प्राविण्य असणाऱ्या विद्यार्थी समाजकार्यकर्त्यास या दिशादर्शक भेटी उपयुक्त ठरतात.

**९) कौटुंबिक समुपदेशन केंद्रे :**

या केंद्रामध्ये विवाहपूर्व व विवाहनंतर कौटुंबिक समुपदेशन केले जाते. विवाहीत दांपत्यास आणि त्यांच्या कुटुंबीयास भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करणेसाठी या संस्था समाजामध्ये कार्यरत आहेत. पती किंवा पत्नी दोघांचे व त्यांचे कुटुंबीयांचे समुपदेशन या संस्थामार्फत केले जाते. त्यामूळे कुटुंब आणि बालकल्याण विषय प्राविण्य असणाऱ्या विद्यार्थ्यांना अशा संस्थांना दिशादर्शक भेट महत्त्वपूर्ण ठरते.

❖ **दिशादर्शक भेटीसाठी संस्थांची यादी :**

१) चेतना विकास मंदीर, कोल्हापूर.

२) मातोश्री वृद्धाश्रम, कोल्हापूर

३) सदर बाजार, कोल्हापूर.

४) निसर्ग मित्र संस्था, कोल्हापूर.

५) सी.पी.आर. रुग्णालय, कोल्हापूर.

६) कृपामाई मानसिक रुग्णालय, मिरज

७) आम्हीच आमचे, सांगली.

८) अवनी, कोल्हापूर.

९) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन बालसुधारगृह, कोल्हापूर.

१०) महिला फेडरेशन, कोल्हापूर.

११) मावा, पुणे.

१२) सेहत, सातारा.

१३) मुक्तगंगा, पुणे.

१४) परिवर्तन, सातारा

१५) मेनन ॲण्ड मेनन, कोल्हापूर.

१६) घाटगे-पाटील इंडस्ट्रीज, कोल्हापूर.

१७) किर्लोस्कर ऑईल्स, कागल. इत्यादी.

टिप सदर संस्थांना दिशादर्शक भेटींचे आयोजन करण्यापूर्वी संबंधीत संस्था निरीक्षकांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

**४.३.६ दिशादर्शक भेटीचे अहवाल लेखन :**

विविध संस्थांना दिशादर्शक भेट दिल्यानंतर या भेटींचे अहवाल लेखन करणे अनिवार्य आहे. विद्यार्थी समाजकार्यकर्त्यांने अहवाल सादर केल्यानंतर प्राध्यापक निरीक्षकांच्या मार्फत अहवाल तपासून घ्यावा, जेणेकरून विद्यार्थी समाज कार्यकर्त्यांच्या लिखानातील चुका दुरुस्त करता येतात. या चुका समजून घेऊन त्या दुरुस्त करून पुन्हा लेखन करणे गरजेचे असते.

अहवाल लेखनामुळे विद्यार्थी, समाजकार्यकर्त्यांचे लेखन कौशल्य वाढीस लागते. दिशादर्शक भेटीच्या वेळेस विद्यार्थी समाज कार्यकर्त्याने नोंदविलेली निरीक्षणे लेखनबद्ध करून बौद्धीक क्षमता वृद्धिंगत होण्यास चालना मिळते. दिशादर्शक भेटीचा अहवाल हा आपण दिलेल्या भेटीचा दस्तऐवज असतो. त्यामुळे दिशादर्शक भेटीचा अहवाल लेखन करून प्राध्यापक निरीक्षकांना सादर करणे गरजेचे असते. दिशादर्शक भेटीच्या अहवालाचे लेखन करताना खालील बाबी लक्षात घ्याव्या.

**१) प्रस्तावना :**

दिशादर्शक भेटीच्या अहवालाच्या सुरूवातीला भेटी संदर्भातील प्रस्तावना करावी जेणेकरून आपण दिशादर्शक भेट कोठे? व का? आयोजित केली आहे हे लक्षात येईल. प्रस्तावना करत असताना लिखानामध्ये नेमकेपणा असावा.

**२) दिशादर्शक भेट क्र. :**

प्रस्तावनेनंतर तुम्ही देत असलेल्या दिशादर्शक भेटीचा क्रमांक नमुद करावा.

**३) तारीख व वेळ :**

दिशादर्शक भेटीची तारीख व कोणत्या वेळेला आपण भेट दिली त्याची वेळ नमूद करावी.

**४) विद्यार्थी समाजकार्यकर्त्याचे नांव व वर्ग :**

विद्यार्थी समाजकार्यकर्त्यांने स्वत:चे नांव व शिक्षण घेत असलेला वर्ग लिहावा.

**५) प्राध्यापक निरीक्षकांचे नांव :**

दिशादर्शक भेटीसाठी विद्यार्थ्यांसोबत असणाऱ्या व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापक निरीक्षकांचे नांव लिहावे.

**६) संस्था निरीक्षकांचे नांव :**

ज्या संस्थेमध्ये दिशादर्शक भेट आयोजली आहे त्या संस्थेतल्या सामाजिक कार्यकर्त्यांचे, जो संस्था निरीक्षक असु शकतो त्यांचे नांव लिहावे.

या प्राथमिक माहितीनंतर संस्थेबद्दलची माहिती खालील मुद्याच्या आधारे लिहावी.

**६.१ संस्थेचे नांव :**

ज्या संस्थेला दिशादर्शक भेटीचे आयोजन करण्यात आलेले असेल त्या संस्थेचे पूर्ण नांव लिहावे.

**६.२ संस्थेचा पूर्ण पत्ता :**

संस्था ज्या भागात कार्यरत आहे तेथील संस्थेचा बिनचूक पूर्ण पत्ता अहवाल लेखन करताना लिहावा.

**६.३ संस्था नोंदणी क्रमांक :**

संस्था नोंदणी कार्यालयाकडून संस्थेला मिळालेला नोंदणी क्रमांक नमूद करावा.

**६.४ संस्थेचे ध्येय विधान :**

संस्थेची स्थापना करत असताना एखाद्या संस्थेने ध्येयविधान केलेले असते त्याचा उल्लेख अहवाल लेखन करत असताना करावा. (बऱ्याच संस्थांनी त्यांचे ध्येय विधान केलेले नसते या कारणाने याबद्दल लिहिणे गरजेचे वाटत नाही.)

**६.५ संस्थेचा प्रकार :**

तुम्ही भेट देत असलेली संस्था कोणत्या प्रकारची आहे याबद्दल लिहावे. उदा.अशासकीय, शासकीय इ.

**६.६ संस्थेची उद्दिष्ट्ये :**

कोणतीही संस्था स्थापन करत असताना संस्थेची कांही उद्दिष्ट्ये संस्थेने ठरविली असतात. ती उद्दीष्टे लिहावीत.

**६.७ संस्थेचे कार्यक्षेत्र :**

संस्था ज्या भौगोलिक क्षेत्रामध्ये कार्यरत आहे त्याबद्दल नमूद करावे. उदा. तालुका, जिल्हा, राज्य इ.

**६.८ सचालक मंडळ :**

कोणतीही संस्था संचालक मंडळाविना कार्य करू शकत नाही. संस्थेची माहिती घेत असताना किती लोकांचे संचालक मंडळ आहे! अध्यक्ष, सचिव यांबददलची माहिती स्पष्ट करावी.

**६.९ संस्थेची संरचना :**

संस्थेची संरचना कशी आहे याबद्दलची माहिती नमूद करावी. (अहवाल नमुन्यामध्ये तपशील आहेत)

**६.१० संस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

संस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेताना संस्था कधी स्थापन केली? कोणी स्थापन केली? संस्था स्थापन करताना तत्कालीन कांही कारण होते का? याबद्दलचे लिखाण करावे. संस्था उभारणीसाठी मदत केलेल्या दानशुर व्यक्ती, संस्था याबद्दलची संकलीत केलेली माहिती लिहावी. तसेच संस्था सुरू केल्यापासून संस्थेच्या आयुष्यात आलेले चढ-उतार आणि संस्थेला कांही अडचणी आल्या असता, संस्था पुन्हा कशापद्धतीने सक्षमपणे उभा राहिली याबद्दलची नोंद करावी.

**६.११ संस्थेचे आर्थिक स्त्रोत :**

संस्था उभारणीसाठी आर्थिक बाजू देखील सक्षमपणे पाहणे गरजेचे असते. त्यासाठी समाजातील विविध घटकांकडून संस्थेस आर्थिक मदत केली जाते. समाजामध्ये कोणतेही चांगले काम उभे राहत असेल तर त्या चांगल्या कार्यास लोक सढळ हाताने मदत करतात. सामाजिक समस्येचे निराकरण करणेसाठी, संस्थात्मक कार्य उभा राहत असताना बऱ्याच शासकीय, अशासकीय संस्था अशा संस्थांना आर्थिक मदत करतात. संस्थेचे आर्थिक स्त्रोत खालीलप्रमाणे असु शकतात.

**१) आंतरराष्ट्रीय संस्थांकडून मिळणारा निधी :**

बऱ्याच, अशा संस्था ज्या आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करतात त्या संस्थांकडून निधी उपलब्ध होऊ शकतो. उदा. (UNICEF) युनिसेफ.

**२) देशांतर्गत मिळणारा निधी :**

केंद्र सरकार, राज्य सरकार, अशासकीय संस्था, खाजगी संस्था, कारखाने इ. संस्थाकडून आर्थिक निधी उभा करता येऊ शकतो.

**३) लोकवर्गणीतून :**

समाजातील बरेच दानशुर व्यक्ती ज्यांना सामाजिक काम पुढे न्यावे असे वाटते अशा व्यक्तींच्या वर्गणीतून निधी उभा करता येऊ शकतो.

संस्थेला आर्थिकदृष्ट्या सक्षम करणेसाठी वरील ३ प्रकारचे आर्थिक स्त्रोत महत्त्वपूर्ण ठरतात.

**६.१२ संस्थेची स्थावर मालमत्ता :**

ज्या संस्थेमध्ये दिशादर्शक भेटीचे आयोजन केले आहे. त्या संस्थेच्या स्थावर व जंगम मालमत्तेविषयीची

माहिती करून घेणे. उदा. इमारत आहे का? असल्यास स्वत:ची आहे की भाडेतत्त्वावर घेतलेली आहे? आदीबाबत माहिती करून घेणे. संस्थेमध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना आवश्यक असणाऱ्या सोई उपलब्ध करून दिल्या असतील तर त्या गोष्टी अहवाल लेखन करताना नमूद करणे गरजेचे आहे.

### ६.१३ दळण वळणाच्या सोई-सुविधा :

संस्थेच्या कार्यपद्धतीनुसार आणि संस्थेच्या गरजेनुसार संस्थेतील कर्मचाऱ्यांना व लाभार्थ्यांना दळणवळणाची साधने उपलब्ध करून दिली जात असतील तर त्याबद्दलची माहिती अधोरेखित करणे गरजेचे आहे. उदा. संस्था कार्य करत असणाऱ्या क्षेत्रीय कार्याचे ठिकाण मुख्य कार्यालयापासून दूर असेल तर अशावेळेस संस्था कर्मचाऱ्यांना वाहन उपलब्ध करून देऊ शकते. संस्थेतील लाभार्थी ज्येष्ठ नागरीक असल्यास आजारी पडलेनंतर त्यांना रुग्णालयामध्ये दाखल करणेसाठी रुग्णवाहिकेची सोय केली जाते.

### ६.१४ दूर संचार साधन सोई :

आजकालच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगांमध्ये दूरसंचार क्षेत्रास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. दूरसंचार सोईमुळे जग जवळ आले आहे. इंटरनेटच्या माध्यमातून आपण क्षणात माहिती मिळवू शकतो. अशा परिस्थितीमध्ये सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था दूरसंचार पद्धतींचा वापर आपल्या संस्थेमध्ये कशा पद्धतीने करून घेतात याबद्दल जाणून घेणे गरजेचे वाटते. विद्यार्थी समाज कार्यकर्त्याने हे लक्षात घेणे जरूरीचे आहे की, सामाजिक संस्थांनीही आता तंत्रज्ञानाच्या वापराच्या संबंधी स्वयंपूर्ण होणे अनिवार्य आहे. उदा. दूरध्वनी, भ्रमणध्वनी, इंटरनेट इ.

### ६.१५ दृकश्राव्य माध्यमांचा वापर :

संस्थेसंदर्भातली संस्थेची आणि संस्था राबवित असणाऱ्या योजनांची माहिती देणेसाठी आजकाल दृकश्राव्य माध्यमांचा वापर करणेत येतो. उदा. प्रक्षेपक, दूरचित्र वाहिनी संच, रेडीओ इ. या दृकश्राव्य माध्यमांचा वापर संस्था कशाप्रकारे करते याबद्दलची माहिती संकलीत करून अहवाल लेखनामध्ये त्याचा समावेश केला जातो.

### ६.१६ संस्थेचे लाभार्थी :

संस्था अंमलात आणत असणाऱ्या योजनांचे लाभ घेणारा घटक म्हणजे संस्थेचे लाभार्थी होय. हे लाभार्थी व्यक्ती, गट, समूह किंवा संस्था असू शकतात. उदा. बालके, ज्येष्ठ नागरिक, महिला इ.

### ६.१७ संस्था राबवित असलेले प्रकल्प :

संस्थेमार्फत लाभार्थीसाठी कोणकोणते प्रकल्प अथवा सेवा देतात याबद्दलची माहिती करून घेणे.

### ६.१८ नोंदी ठेवणेची पद्धती :

एखादी समस्या भेडसावणाऱ्या व्यावसायिक समाजकार्यामध्ये नोंदी ठेवणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. कारण समाजकार्य करताना व्यक्तीबद्दलची माहिती आपणास योग्य त्या निदानापर्यंत नेऊ शकते. तसेच

भविष्यात एखादी समस्या उद्‌भवल्यास त्या नोंदीच्या आधारे आपण उपचार करू शकतो.

संस्थेमध्ये कार्यरत असताना संस्थेच्या विविध नोंदवह्या, झालेले कार्यक्रम, राबवित असलेले उपक्रम याबाबत नोंदी ठेवणे गरजेचे असते. या नोंदी लेखा परिक्षणाच्या दृष्टीने व भविष्यकालीन वाटचालीच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरतात.

**६.१९ संस्थेच्या क्षमता :**

विद्यार्थी समाज कार्यकर्त्याने संस्थेची माहिती घेत असताना संस्थेच्या वेगवेगळ्या क्षमतांची माहिती करून घेणे गरजेचे आहे. संस्थेत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या विविध क्षमतांवरच संस्था भक्कमपणे पाय रोवून उभी असते व भविष्यकालीन वाटचाल करीत असते. काळानुरूप कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांच्या क्षमतांचा विकास करणे हे त्या संस्थेचे कर्तव्य असते जेणेकरून संस्था अखंडपणे कार्यरत व कर्मचारी कार्यतत्पर राहतील.

**६.२० संस्थेला भेडसावणाऱ्या समस्या :**

संस्थेच्या माध्यमातून कार्य करत असताना समस्या या उद्‌भवतातच या दोन प्रकारच्या असतात.

**१) अंतर्गत :**

अंतर्गत समस्यांमध्ये कर्मचाऱ्यांचे हेवेदावे, संस्था व कर्मचारी यांचे बिघडलेले नातेसंबंध इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. या अंतर्गत समस्यांमुळे संस्थेचे अध:पतन होऊ शकते. तेव्हा संस्थेने वेळीच या समस्या ओळखून त्यांचे निराकरण करणे गरजेचे असते.

**२) बाह्य समस्या :**

बाह्य समस्यांमध्ये आर्थिक स्त्रोतांची कमतरता, राजकीय हस्तक्षेप, क्षेत्रीय कार्य करत असताना मिळणारा लोकांचा प्रतिसाद, संस्थेची इतर संस्थेशी असणारी स्पर्धा इत्यादींचा समावेश होतो. संस्था कार्य करत असताना अशा प्रकारच्या बाह्य समस्यांना तोंड देत असते. विद्यार्थी समाज कार्यकर्त्याने या समस्या जाणून घेऊन संस्था या समस्यांना सामोरी जात या समस्या कशा पद्धतीने हाताळते व त्यांचे निराकरण कशा पद्धतीने करते याचे निरीक्षण करून माहिती स्पष्ट करावी.

**६.२१ संस्थेच्या कमतरता :**

एखादी संस्था कार्य करत असताना त्यांना कांही कमतरता किंवा उणिवा जाणवतात. या कमतरता / उणिवा वेळीच ओळखून त्या दूर करण्यासाठी संस्था प्रयत्नशील राहतात. उदा. संस्थेत सोई सुविधांचा अभाव, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची उणिव इ.

**६.२२ संस्थेला मिळालेले पुरस्कार / पारितोषिके :**

संस्थेस ते करत असलेल्या उल्लेखनीय सामाजिक कार्यास, शासनाचा अथवा खाजगी संस्थेचा पुरस्कार किंवा पारितोषिक प्राप्त झाले असलेस त्याची माहिती घ्यावी.

**६.२३ संस्थेच्या भविष्य कालीन योजना :**

विद्यार्थी समाज कार्यकर्त्याने संस्थेबाबत इतर माहिती घेत असतानाच संस्थेच्या भविष्यकालीन योजनांची माहिती घ्यावी. या योजना प्रकल्पांच्या अनुषंगाने असु शकतात. नवीन इमारत, कार्यालय इ. बाबत देखील असु शकतात.

**६.२४ विद्यार्थी समाजकार्यकर्त्याने नोंदविलेली निरीक्षणे :**

संस्थेला दिशादर्शक भेट देत असताना संस्थेची इतर माहिती घेणे गरजेचे असते. त्याचप्रमाणे विद्यार्थी समाज कार्यकर्त्याने निरीक्षण करून निरीक्षणे नोंदवावीत हे केल्याने विद्यार्थ्यांचे निरीक्षण कौशल्य वाढीस लागते. निरीक्षण कौशल्यामुळे संस्था देत असणारी माहिती व आपणास प्रत्यक्षात आलेले अनुभव या दोन्हीतली तफावत समजून घेता येईल.

**४.३.७ दिशादर्शक भेटीचा अहवाल नमूना :**

१) दिशादर्शक भेट क्र. :

२) दिशादर्शक भेटीची तारीख व वेळ :

३) विद्यार्थी समाज कार्यकर्त्यांचे नांव व वर्ग :

४) प्राध्यापक निरीक्षकांचे नांव :

५) संस्था निरीक्षकांचे नांव :

६) संस्थेचे नांव :

७) संस्थेचा पूर्ण पत्ता :

८) संस्था नोंदणी क्रमांक :

९) संस्थेचे ध्येय विधान :

१०) संस्थेचा प्रकार :

११) संस्थेची उद्दिष्टे :

१२) संस्थेचे कार्यक्षेत्र :

१३) संचालक मंडळ :

    १) अध्यक्ष

    २) सचिव

    ३) खजिनदार

    ४) संचालक

    ५) सदस्य

६) सदस्य

७) सदस्य

१४) संस्थेची संरचना :

| कर्मचारी स्थिती | संस्था | शिक्षण | कामाचे स्वरूप व पद |
|---|---|---|---|
| व्यावसायिक | | | |
| सहाय्यक | | | |
| स्वयंसेवक | | | |
| एकूण | | | |

१५) संस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

१६) संस्थेचे आर्थिक स्त्रोत :

१७) संस्थेची स्थावर मालमत्ता :

१८) दळणवळणाच्या सोई सुविधा :

१९) दूरसंचार सोई-सुविधा :

२०) दृकश्राव्य माध्यमे :

२१) संस्थेचे लाभार्थी :

२२) संस्था राबवित असलेले प्रकल्प :

२३) नोंदी ठेवणेची पद्धत :

२४) संस्थेच्या क्षमता :

२५) संस्थेला भेडसावणाऱ्या समस्या :

२६) संस्थेच्या उणिवा :

२७) संस्थेला मिळालेली पारितोषिके / पुरस्कार :

२८) संस्थेच्या भविष्यकालीन योजना :

२९) विद्यार्थी समाजकार्यकर्त्याने नोंदविलेली निरीक्षणे :

३०) विद्यार्थी समाज कार्यकर्त्याचे दिशादर्शक भेटीचे भविष्यकालीन नियोजन :

विद्यार्थी समाज कार्यकर्त्याची स्वाक्षरी

प्राध्यापक निरीक्षकांची स्वाक्षरी

## ४.४ सारांश :

व्यावसायिक समाजकार्याबद्दलचे आकलन होणेसाठी, तसेच क्षेत्रीय कार्याबद्दलची प्राथमिक तयारी ही दिशादर्शक भेटींच्या माध्यमांतून केली जाते. व्यावसायिक समाजकार्याचे शास्त्रीय तंत्र व पद्धती आणि कौशल्ये आत्मसात करण्याची प्रक्रिया ही दिशादर्शक भेटीच्या माध्यमातून केली जाते. सामाजिक संस्था म्हणजे काय? त्या कशा पद्धतीने समाजात कार्य करतात हे जाणून घेणेसाठी दिशादर्शक भेट उपयुक्त ठरते.

दिशादर्शक भेटीचे प्रात्यक्षिक कार्य करणेसाठी त्याचे सैद्धांतिक ज्ञान व अहवाल लेखनासाठी अपेक्षित असणारा नमुना या दोन्ही बाबींचे आकलन या घटकाच्या माध्यमातून करता येईल.

## ४.५ पारिभाषिक शब्द :

**१) व्यावसायिक समाजकार्य :** व्यवसाय म्हणून मान्य केलेले समाजकार्य.

**२) विद्यार्थी समाज कार्यकर्ता :** व्यावसायिक समाजकार्याचे शिक्षण घेणारा विद्यार्थी.

**३) परिवर्तन :** बदल.

**४) कृतीशिल :** कृती द्वारे.

## ४.६ चिंतन आणि कार्य :

१) तुम्ही वास्तव्य करत असलेल्या शहरातील अथवा गावातील अशासकीय अथवा शासकीय संस्थेस भेट देऊन अहवाल तयार करा.

२) तुमच्या गावातील ग्रामपंचायत कार्यालयास भेट देऊन गावात राबवित असलेल्या योजनांची माहिती घ्या.

## ४.७ संदर्भ ग्रंथ / साहित्य :


१. जाधव जगदीश, भालेराव अभिजीत – ''अभ्यासोनी प्रकट व्हावे.'' स्पंदन प्रकाशन (२०१४)

२. कुलकर्णी पी. के. – ''प्रगत समाजशास्त्रीय सिद्धांत'' श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर (१९९७)

३. Subhedar I. S. - "Field Work Training in Social Work" Rawat Publications - Jaypur and Delhi (2001)

४. Lawani B. T. - "Social Work Education and Field Instructions". (SRD, Bharati Vidyapeeth, Pune (2002)

५. School of Continuing Education - "Field work Journal" BSW Ist year, Indira Gandhi, National Open University, New Delhi (2004)


❖ ❖ ❖